
# माणूस

१४ एप्रिल ७३ । पन्नास पैसे



स. न. वि. वि.

७ एप्रिलच्या "माणूस"च्या मुखपृष्ठावर अनंत सालकर यांनी काढलेले मीनाकुमारीचे रेखाचित्र व आतील अरुणा अंतरकरचा त्यांच्याबद्दलचा लेख, दोन्ही अतिशय आवडले. प्रत्यक्ष ओळख नसतानाही या मुलीने केवळ कल्पनासृष्टीत मीनाशी जोडलेली मैत्री हृद्य वाटली. गेल्या वर्षात मीनाबद्दल पुष्कळ वाचण्यात आले, पण इतका मार्मिक लेख क्वचितच आढळला.

चित्रकार व लेखिका - दोघांनाही हार्दिक अभिनंदन!

आ.

गजानन जागीरदार

प्रवेश फी नाही : **युनिक पॉप्युलॅरिटी स्पर्धा** : बक्षीस मिळवा

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

पहिले बक्षीस : एक वेस्पा स्कूटर किंवा ऑलविन रेफ्रिजरेटर. दुसरे बक्षीस : एक टेपरेकॉर्डर किंवा ॲटोमॅटिक कॅमेरा किंवा रेडिओग्रॅम. तिसरे बक्षीस : (१००) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बॅंडचे टोयो ट्रॅन्झिस्टर्स किंमत २७५/-. चौथे बक्षीस : (१०) जपानप्रमाणे तयार केलेले ३ बॅंडचे टोयो ज्यूनिअर ट्रॅन्झिस्टर्स किंमत २५०/-

Entrance Fee : NO ENTRY FEE, This is only a' Populariry contes
LAST Closing Date : 18-5-73, RESULT Date : 20-5-73.

Specimen for help total 94
Using Figures 16 to 31

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | 23 | 26 | 2S |
| 27 | 24 | 21 | 22 |
| 29 | 30 | 19 | 16 |
| 18 | 17 | 28 | 31 |

स्पर्धेकरिता नियम : (१) साध्या कागदाचा वापर करा. (२) दुरुस्त केलेल्या, खाडाखोड केलेल्या प्रवेशप्रत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत. (३) प्रमोटर्सचा निर्णय अंतिम आणि कायद्याने बंधनकारक राहील. ही या स्पर्धेची महत्त्वाची अट आहे. (४) बिनचूकता अधिकृत सीलबंद उत्तराशी ताडून पाहून ठरवली जाईल. कोणतीही बक्षिसे रोख पैशात दिली जाणार नाहीत. (५) पहिले बक्षीस (एकच) : अधिकृत उत्तराशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकेला दिले जाईल. (६) दुसरे बक्षीस (पाच) : आडव्या वरच्या तीन रांगांशी तंतोतंत जुळणाऱ्या प्रवेशपत्रिकांना मिळेल. (७) तिसरे बक्षीस (शंभर) : अशा प्रवेशपत्रिकांना मिळेल की ज्यांची कोणतीही रांग किंवा कोणतीही संख्या कुठेही अधिकृत उत्तराशी जुळेल. (८) चौथे बक्षीस अशा दहा जणांना दिले जाईल की ज्यांची प्रवेशपत्रिका प्रमोटर्संना समाधानकारक वाटेल. (९) बक्षीसपात्र ठरणारांना त्यांनी मिळवलेल्या बक्षिसाबाबत पोस्टेज, पॅकिंग आणि लायसेन्स फी द्यावी लागेल. (१०) तिसरे आणि चौथे बक्षीस मिळवणारांना वरखर्चाशिवाय ट्रॅन्झिस्टरची निम्मी किंमत द्यावी लागेल आणि ते आमच्या नियमाप्रमाणे आणि अटींप्रमाणे बांधील राहतील. (११) निकाल जाहीर केल्यानंतर लवकरच विजेत्याला लायसेन्स फी. वगैरे भरण्यासाठी पत्र पाठविण्यात येईल. (१२) उत्तरासाठी ४५ पैशांचे तिकीट पाठवा. (१३) एक कुटुंब फक्त एकच प्रवेशपत्रिका पाठवू शकते. (१४) तुमचा पत्ता हिंदीत किंवा इंग्रजीत लिहा. (१५) हे कात्रण किंवा नियमावली तुमच्या मार्गदर्शनासाठी किंवा संदर्भासाठी पुढे उपयोगी पडावी म्हणून ठेवा.

**DIRECTOR, CONTEST DEPARTMENT**

**JAPAN AGENCIES ( MWP–98 )**

**P. O. BOX NO. 1194, DELHI-6**

संपादक
श्री. ग. माजगावकर

१४ एप्रिल १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा – अंक : पंचेचाळीस

**सप्रेम नमस्कार....**

□ बरेच दिवसांनी पत्र लिहिण्याचा योग येत आहे. सोसायटी (श्रीविठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्था, म्हैसाळ) हळूहळू प्रगती करीत आहे. आम्ही मनाशी ठरविलेला कामाचा पहिला टप्पा या वर्षी पूर्ण झाला आहे असे मानण्यास आता हरकत नाही. हरिजनांच्या ९०% जमिनी आता सावकारांचेकडून सोडवून घेतल्या असून त्याकरिता व कर्जवाल्या कुटुंबांना सोडविण्याकरिता उभारलेल्या दीड लाखाच्या ठेवी आम्ही जूनअखेर परत करीत आहोत. सर्व जमिनीवर पाणी आले असून शेतीची प्रगती बरी आहे.

आता दुसऱ्या टप्प्याला हात घालण्यास हरकत नाही, असे पंचांनी ठरविले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये, घरे, सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा व शेजारच्या पाच-दहा गावात या कार्याचे लोण पोहोचविणे, असा कार्यक्रम आखला आहे.

या कामाला सुरुवात यावर्षी म्हणजे १४ एप्रिल १९७३ रोजी 'डॉ. आंबेडकर' जयंती दिवशी करावी असे ठरविले आहे. १४ एप्रिलपर्यंत हे सर्व न जमल्यास एप्रिल अखेरपर्यंत केव्हा तरी कार्यक्रम पार पाडणेचा आहे. जयंतीचा कार्यक्रम सर्वसाधारण खालीलप्रमाणे राहील.

१. शेजारची १० ते १५ गावे निवडून काढून तेथून पाच ते सात लोक (प्रत्येक गावचे) पाच दिवस म्हैसाळ येथे राहण्यास बोलाविण्यात येतील. म्हैसाळ येथील पन्नास व बाहेरील शंभर असे दीडशे लोकांचा हा कार्यक्रम राहील.

२. पाच दिवस दररोज सकाळ-संध्याकाळ व्याख्यान (वेगवेगळ्या विषयांवर) व मधल्या वेळात चर्चा असा कार्यक्रम राहील.

३. शेवटच्या दिवशी 'डॉ. आंबेडकर' यांचे फोटोची मिरवणूक होऊन जाहीर सभा होऊन कार्यक्रम संपेल.

६ एप्रिल, ७३ मधुकर देवल म्हैसाळ, मिरज

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# पेरियर नदीचा काठ

श्री. ग. मा.

कोचिनपासून चाळीस मैलांवर पेरियर नदीच्या काठी एका सामुदायिक शेती सस्थेचे गेल्या आठवड्यात उद्घाटन झाले आहे. (टाईम्स ऑफ इंडिया–दिनांक ४ एप्रिल)

या प्रयोगाकडे प्रथमपासून आपण बारकाईने लक्ष पुरवायला हवे. या नव्या प्रयोगाचे सहानुभूतीने परीक्षण-निरीक्षण व्हायला हवे. आपल्याकडे, महाराष्ट्रात ही चळवळ रूजविण्याची शक्यता अजमावून पाहिली पाहिजे. सरकारी व बिनसरकारी अशा दोन्ही पातळींवरून या प्रयोगाची चिकित्सा, अभ्यास आपण सुरुवातीपासूनच चालू ठेवला पाहिजे. दिल्लीहून एखादा फतवा निघाला, की तेवढ्यापुरती थातुरमातुर धावपळ करून ग्रामीण भागात काही सुधारणा लागू करण्याची आपली पद्धत थोडी बदलायला हवी. दुष्काळ पडला की शंभर वर्षांपूर्वीची साहेबाच्या राज्यातली उपाययोजना हाती घेऊन दुष्काळावर मात करीत असल्याची फुशारकी आपण किती काळ मारीत राहणार आहोत? दुष्काळ आला की नको ते रस्ते करण्याचे, नको तेवढी खडी फोडून ठेवण्याचे अनुत्पादक काम आपण वर्षानुवर्षे चालूच ठेवलेले आहे. आता एकदम नवीन, क्रांतिकारक शोध लावल्याच्या अविर्भावात 'कामे उत्पादक हवीत' अशी हाकाटी चहूबाजूंनी सुरू झालेली आहे. गेल्या शतकाच्या अखेरीस न्या. रानडे यांच्या सार्वजनिक सभेनेही ही एक सूचना तात्कालिक ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे ठेवलेली आपल्याला दिसेल. तेव्हा या सूचनेतही नवीन, क्रांतिकारक वगैरे आता काही नाही. शब्द थोडे बदलले आहेत एवढेच. साधे व्यवहारज्ञान असलेला कुणीही नेता, अभ्यासक हेच सुचविल, की बाबांनो, ज्या कामांचा उपयोग नाही ती कशाला काढता? कशासाठी या कामांवर कोटचवधी रुपये खर्च करता? दुष्काळ पुन्हा येणार नाही अशी काही कामे काढा. ग्रामीण भागाचा कायापालट घडवून आणण्याची एक संधी, एक इष्टापत्ती या दृष्टीनेही दुष्काळाकडे पाहता येते. शासनकर्त्या पक्षाने ही संधी राबवली तर उत्तमच आहे. पण विरोधी पक्षानेही यादृष्टीने विचार करायला, चळवळ संघटित करायला हरकत नाही. त्यादृष्टीने केरळ राज्यातील वरील सामुदायिक शेती संस्थेच्या प्रयोगाचा आपल्याला खूपच उपयोग होण्यासारखा आहे.

महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजुरांना जमिनी वाटण्याचे काम गेली दोन-चार

वर्षे तुरळक प्रमाणात सुरूच आहे. पण २-४ एकर जमीन हाती येऊनही हसा शेतमजुरांचा फारसा फायदा होत नाही, तो पूर्वापारच्या कर्जबाजारीपणातून वर येऊ शकत नाही, पुन्हा जमिनी सावकाराकडेच जायला लागतात असा बहुतेक ठिकाणचा अनुभव आहे. जमीन मिळाली तरी साधने नसतात, साधने मिळाली तरी भांडवल अपुरे पडते. बँकांचे जरी राष्ट्रीयीकरण झालेले असले तरी कार्यपद्धती न बदलल्यामुळे या बँका लहान व अगोदरच कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्याला फारशी मदत करू शकत नाहीत. त्यामुळे फुटकळ वाटप करून भूमिहीनांना एका प्रकारे वाऱ्यावर सोडून दिल्यासारखेच होते. त्याऐवजी निवडक ठिकाणी अशा भूमिहीनांच्या सामुदायिक शेतीसस्था स्थापन करणे हा एक विचारात घेण्यासारखा पर्याय आहे. अगदी गरिबातल्या गरीब शेतमजुरालाही स्वतःच्या मालकीची जमीन असावी असे वाटते; हे खरे आहे. खाजगी मालकीचे आकर्षण आपल्याकडे आजमितीस जबरदस्त आहे, हा मनुष्यस्वभावही आपल्याला दृष्टिआड करून चालणार नाही पण आज, निदान महाराष्ट्रात तरी या गरीब माणसासमोर पर्याय काय आहे? गावापासून दूर, पाच-सात मैलांवर खडी फोडायला जाणे किंवा रस्त्यावरचे मातीकाम करणे. त्याचे मजूरपण काही संपत नाही. अशा अनुत्पादक व सक्तीने कराव्या लागणाऱ्या मजुरीकामापेक्षा, योग्य ते शिक्षण व प्रचार करून त्याचे मन सामुदायिक शेतीसंस्थेकडे वळविणे वास्तविक अवघड जायला नको प्रत्येक जिल्ह्यात हजारो एकर पडीक सरकारी जमीन आहे. तोडली गेलेली जंगले आहेत. केरळच्या प्रयोगात ५०० हेक्टर जमिनीवर २५० शेतमजूर कुटुंबे असे प्रमाण ठरविण्यात आलेले आहे. हे प्रमाण परिस्थितीप्रमाणे कमीजास्त होऊ शकते. नाहीतरी दोन-चारशे वस्तीची हजारो खेडी आपल्याकडे आजही आहेतच. तेव्हा किमान प्रमाण शंभर कुटुंबे व हजार एकर असेही ठरवायला हरकत नाही. हजार हजार एकरांचे सलग तुकडे अनेक तालुक्यातूनसुद्धा निघू शकतील. जमीनसुधारणा खरोखरच अंमलात आल्या तर त्यातूनही अशा शेतीसंस्थांसाठी जमीन उपलब्ध होऊ शकेल. धुळे जिल्ह्यातील पाटीलवाडी प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. या पाटीलवाडीच्या मालकांकडे आजही पाच-सहाशे एकर जमीन कायम आहे. लागूनही जमिनीचे पट्टे मोकळे आहेत. उघडयाबोडक्या डोंगरांवरदेखील जगलवाढीची दृष्टी ठेवून हा प्रयोग करायला हरकत नाही. नाहीतरी वर्षानुवर्षे गरीब आदिवासी शेतकरी डोंगरांवर शेती करतोच आहे नं? तेव्हा प्रश्न जमीन मिळण्याचा नाही. प्रश्न आहे तातडीने काही धाडसी व चाकोरीबाहेरचे निर्णय घेण्याचा व ते खंबीरपणे व तडकाफडकी अंमलात आणण्याचा. प्रवाहपतित व्हायचे की प्रवाहाला नवे वळण द्यायचे? नवे वळण द्यायची आपण हिंमत बाळगली पाहिजे. मग

मलपृष्ठ १ वर

मुक्काम मुंबई

# कोहीनूर मिलच्या फुटपाथवर :

## दिव्याखाली अंधार असतो तो असा

निळू दामले

दुष्काळाचे सर्व आदेश मुंबईहून सुटतात. चर्चाही मुंबईतल्या विधान सभेत होते. कोणत्या ना कोणत्या तरी समारंभाच्या निमित्ताने गंभीर मुद्रा करून मंत्रीगण दुष्काळाबद्दलची चिंता ह्या इथेच प्रगट करत असतात.

ह्याच मुंबईत दुष्काळग्रस्त गेले ६ महिने दुष्काळापेक्षाही वाईट अवस्थेत राहताहेत.

जागा : कोहीनूर मिलच्या १ व २ नंबरला लागून असलेला फूटपाथ.

मराठवाडा व विदर्भातून ही मंडळी इथे येऊन राहिली आहेत. पातळ किंवा एखादा कापडाचा तुकडा टांगून झाली आहेत घरे. ५-७ डबडी, ५-७ गाडगी, मडकी. पोचे आलेली गंजलेली एखाद-दुसरी ट्रंक. ॲल्युमिनीयमच्या थाळ्या आणि पेले. हा असा संसार. उरते पोराबाळांची फटावळ. ती घरात मावण्याएवढी लहान नाही. रस्त्यावर पसरलेली असतात. दोनशेच्या आसपासांची ही वस्ती. खरीपाने दगा दिल्यावर, दुष्काळी कामावरच्या भ्रष्टाचाराचा अनुभव घेऊन, रब्बीची वाट न पाहता मुंबईची वाट धरली.

खिशात 'पैका' नाही, वाटेत ३-४ वेळा टी. सी. ने पकडले. तेव्हढोच तुरुंगात खायची सोय होणार होती. पण तेथेही दैव आड आले. मंडळी इथे दादरला पोचली शेवटी. मुंबईच्या झोपडपट्टीत जागाच मिळाली नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातल्या दाऊदपूर इटले गावचा लक्ष्मण कोंडीबा भूमिहीन शेतमजूर. काम नाही. पोट चालवायला १५ माणसांचा संसार घेऊन शेवटी फूटपाथवर. गावच्या घराला रामराम. सोबत एक तान्हे मूलही आहे. त्याचे फार हाल होताहेत. त्याची रडारड चालू आहे. रस्त्यावरची ये-जा बिनदिक्कत चालू आहे. समोरच्या शारदा

थिएटरच्या 'लोफर' सिनेमाची काळ्या बाजाराची तिकिटे घेणाऱ्यांची झुंबड कमी नाही.

येरमाळ्याजवळच्या चोरखळीचा तुकाराम संतू डोंगरे स्वतःच्या नशीबाला दोष देतो आहे. कळंबला आठ दिवस राहूनही त्याला काम मिळाले नाही. त्याचाही सर्व 'बारदाना' मुंबईत पोचला आहे. मस्सा जोगचा (जि. बीड) मारुती गुलबा, मुकादम कसा पैसे खायचा, त्याचे पैसे बुडवून त्याला कसे हाकलून दिले गेले त्या गोष्टी सांगत होता. तावातावाने बोलत होता. त्या मारुती गुलाबाची ५ एकर जमीन आहे गावाकडे. मुंबईत हजारो लोक पोट भरतात. आपल्यालाही काम मिळेल अशा आशेने तो इथे आला.

मारुती गुलबाच्या बाजूला लक्ष्मण केरबा मांगाचा संसार. हा लक्ष्मण कडक लक्ष्मीचा खेळ करतो. माजलगाव तालुक्यातून आला. शेतकऱ्यांना खायला काही नसताना ह्याच्या खेळाला पैसे कोण देणार? आला मुंबईत अंगावर कडाकड चाबकाचे फटके मारून घ्यायला. सकाळची वेळ, कपाळावर हळद माखून खेळाचे कपडे–चिंध्या ल्यायला सुरवात झाली होती. खेळाची तयारी सुरू, ('कडक लक्ष्मी' बीडी ओढताना मजा वाटत होती!)

ह्या इतर जातींच्यात एक मराठाही आहे. कडकनाथ वाडीचा आरगडे. सहा माणसांचा संसार घेऊन आला आहे. मोठा मुलगा राहिला घर राखायला. ८ बैलांपैकी ६ मेले व दोनच शिल्लक राहिले. गायीचे मरण डोळ्याने पहायची पाळी येऊ नये म्हणून ४ गायी तशाच सोडून देऊन आला. हा आहे ५० एकरांचा शेतकरी! मुंबईत ५ फूट बाय ७ फुटात राहायला आला आहे. त्याच्यावर कोसळलेल्या दुर्दैवाची जाणीव त्याच्या डोळ्यांतूनच होत होती. चिडचिडा झाला आहे. ४ नोकर सालदारीवर ठेवणारा आरगडे धान्याची पोती वाहतो आहे. हातगाडी खेचतो आहे.

शेंबडाने करवडलेल्या तोंडाची पोरे जमतात. विटीदांडू खेळणार तरी किती दिवस. सूरपारंब्या खेळायला झाड नाही. कंटाळतात. दुमजली बसची मजा, सिग्नलचे डोळे मिचकावणे ह्यातले नावीन्य संपून गेले आहे. आता त्यांना गावाकडील आठवण यायला लागली आहे. ज्वारीची सवय, गव्हाच्या चपात्या पचत नाहीत. झणझणीत चटणी हवी वाटते, 'सपक' डाळ रुचत नाही. खूप कंटाळली आहेत. रडून-भेकूनही उपयोग नाही हे त्यांना जाणवले आहे. गावाकडे डॉक्टर आल्यावर आणि निवडणुकीच्या वेळी 'मतदानाची सबा' लावल्यावर जसे भरारा जमतात तसे कोंडाळे करून भोवती जमतात. तसेच टकमका बघत बसले आहेत. त्यातलाच शाहू केरबा तोरडमल. कडकनाथ वाडीच्या 'साळ'ला ४ थीत होता. त्याच्या बाजूचा 'टूपी'ल्यालेला दिलीप शिवाजी त्याच शाळेत 'पैलीला' होता. मास्तराफुडे बसावा तसा गुमान गप बसलाय.

कोणीतरी साहेब आलाय. सूट पँटीत. हातात चकचकीत पेटी घेऊन. गावाकडे नेणार आहे. असं त्यांना कळले म्हणून मोठ्या आशेने भोवताली जमले आहेत. शाहूला शाळा सोडावी लागल्याचे वाईट वाटतंय. धाकट्या दिलीपला पहिल्यांदा 'मास्तरच्या लिपडच्यातून' सुटलो ह्याचाच आनंद झाला होता. पण आता मात्र पुन्हा शाळेत जावे असे वाटू लागले आहे.

रेशनच्या दुकानावर लोकांच्या पिशवीला पडलेल्या छिद्रातून सांडणारा तांदूळ गोळा करायचा. मालट्रकमध्ये सांडलेला व रस्त्यावर सांडलेला गहू गोळा करायचा. शर्टाच्या झोळीत. ही बच्चे लोकांची कमाई. आपणही कमवतो ह्याचा केव्हढा आनंद ह्या पोरांना होतो.

पुरु माणसे सकाळी उठून कामाच्या शोधात फिरायला लागतात. आठवड्यातून जेमतेम २–३ दिवस काम मिळते. १० रुपये मिळाले म्हणजे 'बक्कळ' पैसा मिळाला. साधारणपणे ७–८ रुपयांवर आठवडा काढायचा. पोती उचलायची, हमाली करायची, बाबुलनाथच्या पायरीवर चपला राखायच्या. काय मिळेल ते काम करायचे.

कारभारीण रानात भाकर तुकडा घेऊन येण्याची प्रथा इथे बंद आहे! जमेल तशी मिसळ नी पाव 'हाटेलात' खाऊन राहावे लागते.

एक म्हातारा, कृश झालेला पटकुरावर झोपला होता. चौकशी करायला गेलो तो मोठ्या आशेने भिकेसाठी हात वर केलान. पोटात अन्न नव्हते. सुकलेले ओठ हलत होते–आवाज येत नव्हता. सरकारच्या आदेशातल्या म्हाताऱ्यांना, अपंगांना उपाशी मरू न देण्याच्या तरतूदीची एकदम आठवण झाली.

पाचोट्यासारख्या ह्या शरीराला 'शेवटल्या' यात्रेत नेतील तीच पहिली व शेवटली सरकारी मदत असेल. ह्या कोहीनूर मिलच्या 'पल्याड' 'उमाट्याच्या म्होरल्या बाजूला इंदीरा गांधी एका शाळेला लॉस ऐंजलीस शाळा नाव द्यायला आल्या होत्या. कोकाकोल्याच्या बटल्या फुटल्या होत्या. जेवणावळी उठल्या होत्या. कॅमेरे लकाकले होते.

परभणीच्या शाळेतली पोरे त्याचवेळी मुंबईच्या रस्त्यावर भीक मागत होती.

दिवाळी होऊन गेली. रस्त्यावर फटाक्यांच्या माळा आक्रंदून गेल्या. अनारांनी डोळे दिपवले. आत्तारांचे धुमोरे फुटले, मिठायांचे पुडे करकर आवाज करत उघडले गेले.

उस्मानाबादकरांना कधी चकीत होऊन, कधी व्यथित होऊन हे सर्व पाहिले.

रोषणाईच्या उजेडात रस्त्यावर जमवलेले धान्य साफ करून चूल पेटवली.

मुंबईकरांच्या लग्नाच्या वराती जाताहेत.

४१५ दिवसापूर्वीच राजेश खन्नाला पहायला लाखांनी शिवाजी पार्कवर गर्दी

पृष्ठ १६ वर



# एक सफर, वेदनांची !

अनिल बर्वे

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एस. टी. फुफाटा उडवीत बावड्याचा मार्ग धरते. तसे महाराष्ट्रात बावडे अनेक, कुठे एकीकडे खडाळा बावडा तर कुठे दुसरीकड गगन बावडा. पण इंदापूर बावड्याने मात्र फारच फुफाटा उडवला– ' बहिष्कार प्रकरणाचा ! '

– बावडा येते.

वाड्या मोजल्या तर बारा हजार माणूस रहात असेल. गावाशी घसट करीत गावाला विळखा घालूनच मांगवाडा आहे, चांभारवाडा आहे, जोशीवाडा आहे, वडारवाडा आहे आणि जरा सडक ओलांडली की लगेच महारवाडा आहे. महारवाड्यात पाचपंचवीस घरं तरी पक्की दिसतात. पण मांगवाड्यातील माणसं मात्र केळमाच्याच घरात राहतात. नुकतेच समाजकल्याण खात्याने पैसे मंजूर केल्याने काही मातगाची घरेही पक्का आकार घेऊ लागली आहेत.

आधीच इंदापूर तालुका निमदुष्काळी. त्यात ' गुदास्ता वाईच कोरडा गेला अन् औंदा तर पार दुष्काळच ! ' दुष्काळानं माणसांची आतडीही लहान झाली आहेत आणि हे हाल ' कावळा शिवे 'पर्यंत चालूच राहणार. कारण गेल्या पंचवीस वर्षातील प्रगतीचा वेग पाहता चालू पिढी मरेपर्यंत काही फार मोठा फरक पडेल असे वाटत नाही. मग एकेक गोष्टी कानावर पडतात–

–' गेल्या हप्त्यात भांडगावच्या रामोशाची बाई सरापवाडीच्या सडकेवर खडी फोडता फोडताच बाळंत झाली. '

पुरते दिवस भरले तरी पोटाची वितभर खळगी भरण्यासाठी सडकेवर खडी फोडत बसणाऱ्या त्या माउलीवरून ' सर्व भूत पिशाच्चयांच्या नावे, सर्व पुढारी नेत्यांच्या नावे भाकर तुकडा ओवाळून टाकावा. '

मग काही चेहरे दृष्टीस पडतात.

विलक्षण दीनवाणे आणि नजरेत लाचारी. मग मी त्यांची नावे पुसतो. नाव प्रकाश बापू कांबळे, शिक्षण F Y. B. A. अकलूज कॉलेजात शिकतो. नाव रामचंद्र शंकर कांबळे, शिक्षण F. Y. B. A. पंढरपूर कॉलेजात शिकतो. दोघेही विहिरीच्या कामावर जातात. कष्टाचे काम होत नाही. हाताला घट्टे पडले आहेत, तळव्याला भेगा गेल्या आहेत, डोळे जळजळतात. पण स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक भारताची ही तरणीताठी तरुण सुशिक्षित पिढी आज दोन घास अन्नासाठी लाचार-दीनवाणी झाली आहे !

पाऊसपाणी ठीक पडले तरी ऐंशी कोटी एकरांच्या या खंडप्राय देशात चाळीस कोटी लोक अर्धपोटी राहतात. त्यात या वर्षी तर दुष्काळ-म्हणजे ताटातच माशी पडली म्हणा की !

गरजेच्या मानाने अपुरी असली तरी, सरापवाडी-इंदापूर-नरसिंगपूर येथे सरकारने दुष्काळी कामे काढली आहेत. बावडयातील बाया माणसं तांबडे फुटताच भाकर बांधून दहा-दहा मैल सडक तुडवतात. दिवसभर उन्हात राबून बाप्प्या माणूस अडीच रुपये, बाई माणूस दोन रुपये रोजाला कमावतात. सांज झाली की माघारी फिरतात. इरिगेशन डिपार्टमेंटवाले आठवडयाच्या आठवडयाला हजेरी भरतात पण झेड. पी. वाल्यांचा खाक्याच निराळा. त्यांचा मस्टर दहा दिवसांचा अन् पगार हाती पडतो वीस दिवसांनी-तोही अपुरा. कारण काम कमी पडते. पण भुकेल्या पोटी कोस-कोस चालून काम पुरते व्हावे तरी कसे ?

असे एकंदरीत हाल चालले आहेत. आणि हे हाल काही केवळ नवबौद्धांचे नाहीत त साऱ्या गरिबांचे आहेत, मग तो शाहण्णव कुळी मराठा असो नाही तर मातंगवाडयातला मांग असो त्यात पुन्हा मार्चएंड आला. हिशोबासाठी कामे बंद पडली. कित्येक खोपटातून चार-चार दिवस निखारा पेटला नाही. तरी पण माणसं जगत आहेत. त्यापेक्षा जीव तगवून आहेत म्हणाना. कधी कधी आश्चर्य वाटतं-

-या देशाची बाळं जन्माला येताना टाळूवर एरंडीचे पान घालून जन्माला येतात की काय न कळे ? किती थंड. किती शांत. 'गोरी चिमाच्या कलेवरा इतकी !'

-तरी पण म्हणतात, 'दबे जाने पर चिटी भी काट लेती है।' कोणी सांगावं, असंतोषाचा वडवानळ घेऊन ही माणसेही कधी काळी रान पेटवीत चाल करतील. तेव्हा मात्र नगरहवेल्यातून, इमल्या-माडयातून राहणारे शुचिर्भूत सुखवस्तू अराजकऽऽ अराजकऽऽ म्हणून बोंबा ठोकतील.

तर ते असो.

□

महारांना गावकीनं वाळीत टाकलं म्हणून झालेला गलका अजून कानाआड गेलेला नाही. या गावात गेल्या वर्षभरात कोणताही सण साजरा झालेला नाही. म्हारवाडयातील विहिरीत

एंड्रीन टाकले जाईल या 'कपोल-कल्पित' भीतीने गेले दहा महिने पोलीस-पार्टी विहिरीवर पहारा देत उभी आहे. तेवढ्या खर्चांत नवी विहीर खोदून झाली असती. आणि सर्वात दुर्दैवाचा कळस म्हणजे महारावर बहिष्कार टाकल्याच्या अरोपावरून खटला भरला गेलेल्यात दोघेजण मातंग समाजाचे आहेत.

पण एकंदरीत एक गोष्ट बरी आहे. दलितावरील अत्याचाराने पुढाऱ्यांचे पुढारीपण पोसले जाते हे काय कमी आहे? आता पुढाऱ्यांच्या पुढारीपणाचे वानगीदाखल दोन किस्से ऐकण्यासारखे आहेत. किस्सा पहिला महापौर भाऊसाहेब चव्हाणांचा–

गतवर्षीचे आमच्या पुण्याचे मेयर भाऊसाहेब चव्हाण! पुण्याचा पहिला हरिजन मेयर म्हणून बराच उदोउदो झाला. हरिजनांच्याही अपेक्षा वाढल्या. भाऊसाहेबांनीही त्या पुऱ्या केल्या. कश्या त्या पहा–

बावड्यात महारांना वाळीत टाकल्याची तार आली. भाऊसाहेब लगबगीने बावड्याला जाऊन पोचले. आले तसे ते थेट म्हारवाड्यात जाऊन पोचले. तेथल्या म्होरक्यांची त्यांनी कैफीयत ऐकली. गावात महार आणि मातंग समाजात तेढ. मातंग समाजातील लोकांनी स्वतःची कैफीयत ऐकवायला भाऊसाहेबांना आपल्या वाड्यात बोलावले. पण भाऊसाहेब मांगवाड्यात गेले नाहीत. चांभारवाड्यातही गेले नाहीत. कारण दलित म्हणजे–हरिजन म्हणजे–केवळ महार!

गावातल्या गावकऱ्यांनी स्वतःची बाजू ऐकवायला भाऊसाहेबांना गावात बोलावले; पण भाऊसाहेब गावात गेले नाहीत कारण त्यांना स्वतःच्या जिवाची भीती वाटली म्हणे! (मग ही मंडळी नौखालीतल्या गांधीबाबांचे आदर्श ठेवतात तरी कशाला?) मग भाऊसाहेब तरातरा पुण्याला परतले. एक जोरकस निवेदन ठोकले. दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे नेते धावले. 'शहाजीराव पाटलांविरुद्ध पर्यायाने शंकरराव पाटलां' विरुद्ध उठलेल्या गदारोळात मातंग समाजाकडे दुर्लक्ष झाले. मातंगाच्या म्हणण्याप्रमाणे ते नेहमीच होते.

कालांतराने 'बावडा बहिष्कार प्रकरण' संपले. भाऊसाहेबांचे मेयरशिपचे वर्षही संपले. त्यानंतर पडला दुष्काळ. पण भाऊसाहेब पुन्हा म्हणून बावड्याला फिरकले नाहीत. त्यांनी ढुंकूनसुद्धा पाहिले नाही की, बावड्यातल्या दलितांना पोटापाण्याला तुकडा तरी मिळतो की पाण्याच्या लोट्याबरोबर नुसतेच फाके पडतात.

किस्सा दुसरा जनसंघाच्या सात्त्विकतेचा–

बावड्यातल्या महारांना वाळीत टाकल्याची न्यूज आली आणि आपण जातीयवादी नसल्याचे सिद्ध करण्याची जनसंघवाल्यांना संधी प्राप्त झाली. मग काय झाले, पदर घट्ट खोचीत जनसंघाच्या चार स्त्री-कार्यकर्त्या लगबगीने अँबॅसीडरमधून बावड्याला गेल्या. त्यांनी अंमळ म्हारवाड्यात

डोकावून पाहिलं, मग त्या लगबगीने भीमा-नीरेच्या संगमावर 'नरसिंहेश्वराच्या' क्षेत्राला गेल्या. तिथे त्यांनी सचैलस्नान करून शुद्धी केली व डायरेक्ट फूफाटा उडवीत त्या पुण्याला परतल्या. वाटेत बावड्याच्या म्हारवाड्याशी त्यांनी गाडीचा वेगदेखील कमी केला नाही. दुसऱ्या दिवशीच्या 'दैनिक तरुणभारता' त मात्र मथळ्यानिशी बातम्या झळकल्या—जनसंघाच्या स्त्री-कार्यकर्त्यांनी केलेली समाजसेवा. बावड्यातील महारांबरोबर त्यांनी फराळ केला. रस्ते झाडले. इत्यादी. इत्यादी. इत्यादी.

इकडे अकलूजच्या जनसंघ कार्यकर्त्यांना वाटले, आपणही काही करावे. मग त्यांनी काय केले, बावड्याच्या बाराशे महारांसाठी चवदा पायल्या म्हणजे छप्पन्न शेर धान्य वाटले. गणीत कच्चं असलेला शेंबडा पोरही दरडोई छटाकाला मापटं कमीच भरलं म्हणून सांगू शकेल. पण छाप्यात मात्र छापून आलं—'जनसंघाने बावड्यातल्या हरिजनांना धान्य वाटले.'

बावड्यात तशा चाळीस-पन्नास सभा झाल्या. प्रत्येक वक्त्याने 'काळजी करू नका, दोन वर्षं पुरेल एवढे धान्य देऊ' असे लंबेचवडे आश्वासन दिले. पण प्रत्यक्षात मात्र दोन वेळ चूल पेटेल ऐवढेही धान्य वाटले गेले नाही.

अशी सारी मजा आहे !

□

दलितांवरले अत्याचार ही गोष्ट आमच्या आता अंगवळणीच पडली आहे. दलितांवरील अत्याचाराच्या बातम्या पंधरवड्यातून एकदा तरी पेपरात झळकतात. पेरुमल कमिटीचा अहवाल वाचला तर डोळे बाहेर पडतील. पण अजून एक कोडं उलगडलं नाही की वादळ उठवून देणाऱ्या सर्व अत्याचार प्रकरणात महारच तेवढे प्रामुख्याने कसे काय असतात ? इतर दलित जातींजमातींवर अत्याचार होत नाहीत की काय ?

होतात, होतात. निश्चित होतात. पण ते महार नसल्याने त्यांच्यावरील अत्याचाराची कुठे ना होते हाक, कुठे ना होते बोंब ! वानगीदाखल उदाहरणच घ्या—बावड्यातल्या मातंगांना पाणी नाकारले गेल्याचे.

-बावड्याच्या मातंगवाड्याला स्वतःची विहीर आहे. त्यामुळे पाण्यासाठी त्यांना दुसऱ्या विहिरीवर कधी जावे लागत नाही. पण अठ्ठावीस ऑक्टोबर बहात्तरला मातंगवाड्यातील लोकांनी पाण्याने चूळ भरली नि ओकारी आली. विहिरीत डोकावून पाहिले तर आत मेलेले कुत्र पडलेले. पाणी खराब झालेले. मग मातंगांना दुसऱ्या विहिरीवर जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते सारे जण शेजारच्या पोलीस पाटलांच्या विहिरीवर गेल (हा पोलीस पाटील शहाजीराव पाटलांचा चुलत भाऊ आहे) पण त्यांच्या विहिरीवरचा पंप चालू नव्हता कारण वीज बंद होती. म्हणून.

रामा धर्मा गायकवाड, धंदा मजूरी. रामचंद्र नामदेव गायकवाड, धंदा मजुरी,

लक्ष्मण अप्पा साठे, धंदा मजुरी. अण्णा गुलाब आवारे धंदा मजुरी. चौघेही मातंग समाजाचे. ही सारी मंडळी पाणी भरायला स्वतःची गाडगी-मडकी घेऊन गावातल्या आडावर गेली. (स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक भारतातील गोरगरिबांना स्वातंत्र्योत्तर काळातील पंचवीस वर्षांच्या प्रगती-नंतरही, अश्मयुगीन मानवाप्रमाणे पाण्यासाठी मातीची गाडगी-मडकीच वापरावी लागावीत ना ?)

गावातला आड हा सार्वजनिक मालकीचा आहे असे गावकऱ्यांचे म्हणणे. पण हा आड प्रतापराव सूर्यवंशी नावाच्या गृहस्थांच्या घराला लागून आहे. त्यांनी त्या आडावर पाण्यासाठी हातपंप बसवला आहे. (हातपंप बसवून पाणी वापरण्यास गावकऱ्यांनी त्यांना आडकाठी केलेली नाही.) व त्या आडा-वर ते स्वतःची खाजगी मालकी सांग-तात. मातंग मंडळी पाण्यासाठी आडावर गेल्याचे पाहून त्यांचे पीत्त खवळले व त्यांनी गरजून धमकावले,

'बापाचा आड आहे काय? इथं पाणी भरायचं नाही. आमचा आड बाटवता काय ? पाणी भराल तर मारं खाल.'

—पण पाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. म्हणून मातंग पाणी भरायला पुढे झाले तेव्हा, प्रतापराव बळवंतराव सूर्यवंशी, वसंतराव घायगुडे, काशिनाथ काळे (बाकी दोघे धनगर) पुढे झाले व त्यांनी लाथेसरशी त्या गरीब मातंगांची गाडगी-मडकी फोडून टाकली.—अखेर 'बावडा बहिष्कार प्रकरणात' बदनाम झालेल्या शहाजीराव पाटलांनी जमला दिले जाणारे पाणी थांबवून या मातंग मंडळींना पाणी दिले.

माझ्यासमोर ते चौघे मातंग बसले होते व मी त्यांना प्रश्न विचारीत होतो—

: हा प्रकार केव्हा घडला ?

: झाले असतील चार पाच महिने, तारीख आठवत नाही. (पोलीस स्टेश-नच्या फिर्यादीप्रमाणे २८–१०–७२.)

: पोलिसात तक्रार नोंदवली काय ?

: हो. लगेच तीन-चार दिवसांनी फिर्याद नोंदवली. (पोलिस स्टेशनच्या नोंदीप्रमाणे २-११-७२ ला फिर्याद नोंदवली.)

: तक्रार चार दिवसांनी का नोंदवली ?

: इंदापूर बारा मैलावर. आणि विहीर लगोलग उपसून साफ करायची होती म्हणून दोन दिवस विहीर साफ केली. नंतर तक्रार नोंदवायला गेलो.

: विहीर साफ करायला गावकऱ्यांनी मदत केली का ?

: हो. पचायतीन इंजिन दिलं होतं. विहीर साफ होईपर्यंत गावातल्या लोकांनी पाणी देखील पुरवलं.

: तुमच्या विहीरीचं पाणी खराब झाल्यावर म्हारवाड्यातल्या विहिरीवर पाणी भरायला का गेला नाहीत ?

: इतर विहिरीपेक्षा ती विहीर लांब पडते.

: पण जर पाणी भरायला गेलात तर महार पाणी भरून देतात का ?

: होय. पाण्याला कधी नाही म्हणत

नाहीत. (मनाला जरा बरे वाटले.)

: तुमच्या तक्रारीची दखल घेऊन पोलिसांनी खटला भरला का?

: होय. पण फार उशीरा भरला. (पोलीस स्टेशनच्या नोंदीप्रमाणे १८ मार्च ७३ ला कोर्टात खटला दाखल झाला.)

अहो महाराष्ट्राचे तरुण, तडफदार राज्य गृहमंत्री शरद पवार, खटला भरण्यास झालेल्या चार महिन्या इतक्या दीर्घकालावधीचे कारण काय—ते जरा सांगाल का?

—विशेष म्हणजे बावडा बहिष्कार प्रकरणात शहाजीराव पाटलाविरुद्ध हिरीरीने भाग घेणारे प्रतापराव सूर्यवंशी हेच ह्या खटल्यातले प्रमुख आरोपी.

या प्रकरणाबाबत मातंग समाजाचे स्थानिक पुढारी व जिल्हा परिषदेचे सदस्य भगवानराव आवारे यांना मी विचारले—सदर वृत्त पेपर प्रसिद्धीसाठी पाठवले होते काय?

: होते. इदापूरमधल्या 'तरुणभारत'च्या बातमीदारांना (त्यांचे नाव मी टिपून घ्यायला विसरलो.) दिले होते.

इंदापूरात मी त्या वृत्तपत्रविक्रेता व बातमीदार (तालुक्याच्या ठिकाणी साधारणतः वृत्तपत्र विक्रेता व बातमीदार एकच असतो.) यांना पेपरला बातमी पाठवली काय म्हणून विचारले. ते म्हणाले 'तरुणभारत'ला बातमी पाठवली होती पण छापून आली नाही.

मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. पुण्यातल्या नळांना जरी पाणी उशिरा आले तरी त्याचे खापर कम्युनिस्टांच्या नाही तर मुसलमानांच्या डोक्यावर फोडण्यास जागरुक असलेल्या संपादक मंडळींनी एवढ्या महत्त्वाच्या बातमीकडे दुर्लक्ष केले तरी कसे? ◻

बावडा बहिष्कार प्रकरणी वृत्तपत्रांनी अनेक ठिकाणी विनाकारण 'ध' चा 'मा' केलेला आढळला. स्वतःची पोळी पिकवण्यासाठी आलेल्या पुढाऱ्यांनी शहाजीराव पाटलांना झोडपण्याच्या नादात इतर दलितांकडे आपले दुर्लक्ष होते आहे याचे भानही ठेवले नाही. महार आणि मातंग समाजात निर्माण झालेली तेढ कोणी मिटवायचाही प्रयत्न केला नाही.

'सकाळ'चे प्रतिनिधी श्रीयुत विजय नहार बावडचाला गेले. त्यांनी शहाजीराव पाटलांच्या दोन्ही ड्रायव्हरांची मुलाखत घेतली व एकतर्फी विपर्यस्त बातमी दिली की—केवळ जातीने महार म्हणून शिशुपाल मधुकर कांबळे यांस नोकरीवरून काढण्यात आले.' वस्तुतः या प्रकरणातील सत्यस्थिती अशी होती की,

शहाजीराव पाटील यांचे वडील आबा हे कॅन्सरने आजारी होते म्हणून त्यांना नेहमी मुंबईस न्यावे लागे. एस्. टी च्या प्रवासात त्यांना त्रास होऊ नये म्हणून पाटील यांनी फियाट गाडी खरेदी केली व इंदापूर येथील सोपान महादेव शिंदे यास ड्रायव्हरचे काम दिले. गाडी चांगली चालवतो व कामात तत्पर व प्रामाणिक असल्याने

त्यासच कामावर कायम केले. गाडी घेतल्यापासून आजपर्यंत तोच गाडीवर असून, त्याच्या एका हाती गाडी आहे. गेल्या वर्षी सोपान शिंदेने इंदापूर येथे आपले घर बांधायला सुरुवात केल्याने शहाजीराव पाटील यांनी त्यास पाचशे रुपये उचल व एक महिन्याची रजा दिली आणि महिन्यापुरता तात्पुरता ड्रायव्हर म्हणून 'शिशुपाल मधुकर कांबळे' यास कामावर घेतले. शिशुपाल मधुकर कांबळे याच्या कामाविषयी अथवा स्वभावाविषयी पाटील यांची कोणतीही तक्रार नव्हती. तरी पण सोपान शिंदे (जातीने फुलमाळी.) हा रजा संपवून स्वतःचे घराचे काम पूर्ण करून आल्यावर शिशुपाल कांबळे यास रजा देण्यात आली व पुन्हा सोपान शिंदे यांस काम दिले गेले. वस्तुतः इथे शिशुपाल कांबळेच्या जातीचा काहीच प्रश्न नव्हता. त्याला महार म्हणून कामावरून काढावयाचे असते तर आधी कामावरच ठेवण्यात आले नसते. तरी पण योगायोगाने त्याचवेळी बहिष्कार प्रकरण निघाल्याने विजय नहार यांनी विपर्यस्त बातमी प्रसिद्ध केली.

शहाजीराव पाटीलांच्या या सोपान शिंदे ड्रायव्हरने मला विचारले, 'विजय नहार यांनी माझीही मुलाखत घेतली होती. मग अशी एकतर्फी बातमी का दिली? उगाच वाईटपणा नको म्हणून शहाजीराव पाटील यांनी मला कामावरून काढून, त्याला (शिशुपालला) कामावर ठेवले असते तर माझी हक्काची नोकरी गेली असती की नाही?' त्याचा हा प्रश्न मोठा विचार करण्यासारखा आहे.

खरे पाहता, शिशुपाल कांबळे हा देखील, एक चांगला व सुस्वभावी ड्रायव्हर असताना आज बेकार आहे. आणि बेकारी हा पूर्णपणे आर्थिक प्रश्न आहे. असे असता शिंदे व कांबळे याच्यात जातीयवादाच्या निमित्ताने फूट पाडणे म्हणजे जातीयवाद निर्मूलन करणे नव्हे; तर जातीयवादाच्या नावाने श्रमिकांमध्ये फूट पाडून भांडवलदारांचे हात बळकट करण्याचे दुष्कृत्य आहे. □

'बावडा बहिष्कार' प्रकरण आता न्यायप्रविष्ट असल्याने त्याचा निकाल कोर्ट देईलच. शहाजीराव पाटील दोषी असतील तर शिक्षा होईल, निर्दोष असतील तर सुटतील. पण कोर्टातल्या निवाड्याने ज्या कारणांमुळे बावडा गावात फूट पडली ती सांधली जाणार नाही.

बावड्यातील महार व मातंग यांच्यातील मारामारी अतिशय जुनी. १९५५ मध्ये महार व मातंग समाजात तंटा व मारामारी होऊन कोर्टात दोघांच्या मिळून अकराजणांना किरकोळ दंड अथवा सजा झाली होती. पण गावकीच्या मध्यस्थीने हे भांडण शमले ते ७२ ला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीने पुन्हा उद्भवले.

इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषदेसाठी एकंदर पाच मतदारसंघ आहेत. त्यापैकी एक राखीव. ६२ साली 'वालचंदनगर' हा राखीव मतदार

संघ होता व तेथून चांभार समाजाचा सदस्य निवडून दिला गेला. ६७ मध्ये 'सणसर' हा राखीव मतदार संघ होता व तेथून महार समाजाचा सदस्य बिनविरोध निवडून दिला गेला. ७२ ला बावडा हा राखीव मतदार संघ झाला व तेथून काँग्रेसतर्फे भगवानराव आवारे या मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांना उभे करण्यात आले त्यांचेविरुद्ध रिपब्लिकन पक्षातर्फे भानुदास कांबळे या महार समाजाच्या कार्यकर्त्यांना उभे केले गेले.

—आणि याच कारणाने पुन्हा दोन जमातींमध्ये कुरबुरीला सुरुवात झाली. मातंग समाजाचे म्हणणे असे की, गेल्या खेपेला तुमचा माणूस बिनविरोध निवडून दिला गेला असताना या खेपेला आमच्या माणसाला तुमचा विरोध का?

भगवानराव आवारे यांचा नारळ शहाजीराव पाटील यांनी फोडला आणि निवडणुकात रंग भरला गेला. दोन्ही पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करणे, वेळप्रसंगी उचित-अनुचित शब्दप्रयोग वापरणे इ. प्रकार झाले व त्यातून पुढे बावडा बहिष्कार प्रकरण उद्‌भवले. रिपब्लिकन नेत्यांनी प्रचाराची जंगी मोहीम उभारली. काँग्रेसला झोडपावयास मिळते म्हणून विरोधी पक्षांनीही यात हात धुवून घेतले वृत्तपत्रांतून जबरदस्त प्रचार केला गेला–पण म्हणून शहाजीराव पाटलांच्या राजकीय स्थानाला काय धक्का बसला?

—काहीही नाही.

बावड्याची एकंदर वस्ती बारा हजार. बारा हजार वस्तीमध्ये पेपर येतात शंभर व तेही प्रामुख्याने पुढारी मंडळी आणि वरच्या वर्गाकडे तेव्हा वृत्तपत्रांतली टीका जनतेच्या कानावरसुद्धा पोचत नसताना काँग्रेसच्या स्थानाला काय धक्का पोचणार? (एवढ्या गदारोळातही शहाजीराव पाटील पंचायत समितीवर निवडून आले. त्यांना स्वतःला महार मतदारांची मते पडली असा ते आकडेवारीसह दावा करतात. भगवानराव आवारेही जिल्हा परिषदेवर निवडून गेले.)

जर ग्रामीण भागातून काँग्रेसचे उच्चाटन करावयाचे असेल तर आर्थिकदृष्ट्या शोषित (मग तो शहाण्णव कुळी मराठाही असेल.) व सामाजिक दृष्ट्या दुर्लक्षित अशा सर्व जातीजमातींची अभेद्य एकजूट उभारली गेली पाहिजे. पण बावडा प्रकरणातून काय साधले गेले?

—मातंग समाज जास्त कडवा काँग्रेसवादी बनला.

☐

मातंग समाजाने काँग्रेसमध्ये जाऊ तरी का नाही? जेव्हा रिपब्लिकन नेते (खरे म्हणजे महार नेते) त्यांची विचारपूसच करीत नाहीत व केवळ स्वतःचे जमातवादी धोरण पुढे रेटतात (ज्यातून महार जातीयवाद नामक नवा जातीयवाद जन्माला आला आहे) तेव्हा मातंग समाजापुढे इतर पर्याय तरी कोणता? आणि ही चूक थेट डॉ. आंबेडकरांपासून करण्यात आली आहे.

महारांचे प्रतिपरमेश्वर (इतर अस्पृश्यांचे नव्हेत) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांनी तीन चुका केल्या.

१ : ते सदैव स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहिले.

२ : विभक्त मतदारसंघामागून फुटीरतावादी व संसदीय पुढारीपण उभ.रले.

३ : सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध लढणाऱ्या कम्युनिस्टांचा त्यांनी भांडवल-दारांपेक्षा जास्त तिरस्कार केला.

वस्तुत: बाबासाहेबांची इतर पुण्याई एवढी थोर, की या चुका सहज निकालात निघाव्यात. पण आंबेडकरांच्या पश्चात खुळचा रिपब्लिकन नेत्यांनी आंबेडकरांचा पुण्याई 'पार्लमेंटाच्या सिटा' खरेदी करण्यात घालवून, त्यांच्या प्रतिमेआड दडत स्वत:चे जमातवादी आणि जातीयवादी धोरण तेवढे पुढे रेटले व पुढारीपणाच्या दिंड्या फिरवल्या.

सर्व दलितांचा एक पक्ष उभारावा या हेतूने आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्ष उभारला. पण रिपब्लिकन पक्ष केवळ 'महारांचा, महारांनी महारांसाठी चालवलेला पक्ष' ठरला. इतर दलित जाती-जमातींकड या नेत्यांनी सदैव दुर्लक्ष केले. मग जर मातंग-चांभार इ. जाती काँग्रेसकडे गेल्या तर त्यांना बाडग्या म्हणून हिणवण्यात काय अर्थ? (बावड्यातले महार मातंगांना बाडगे म्हणून हिणवतात. पण यांच्याच नेत्यांनी कांग्रसचो चुंबाचुंबी केली होती हे विसरतात.)

थोडक्यात बावडा प्रकरण दलितांच्यावरील अन्याय दूर करणारे नव्हे तर दलितांच्यातील फुटीवर शिक्का मोर्तब करणारे ठरले.

□

बावड्याची आजची परिस्थिती काय आहे? ती जरा जर्जर झालेल्या वृद्धासारखी आहे. गावात सण साजरे होत नाहीत, कारण अशांतता निर्माण होईल म्हणून डी.मॅजिस्ट्रेट १४४ कलम पुकारतात. म्हारवाड्यातील विहिरीवर पोलीस पार्टी पहारा देती आहे कारण एंड्रिन टाकले जाण्याची भिती आहे. मातंगवाड्यातल्या चावडीचे बांधकाम अर्धवट पडले आहे कारण गावात फूट पडली आहे. म्हारवाड्यात तक्या आहे. गावात चावडी नि धर्मशाळा आहे. पण मांगवाड्यात बसायचे ठिकाण नाही. म्हणून गेल्या जानेवारीत गावकऱ्यांनी श्रमदानाने चावडी बांधायला काढली दगड फोडन झाले आहेत. पाया खोदून झाला आहे; पण 'बहिष्कार प्रकरणा'-पासून काम अर्धवट पडले आहे.

'बहिष्कार खराच पडला होता काय?' याविषयी दोन्ही गट निरनिराळी हकीकत सांगतात. त्यातील खऱ्याखोट्याचा निवाडा कोर्ट करेल. पण शहाजी पाटलांच्या आजच्या वागण्यावरून ते जातीयवादी असल्याचे दिसत नाही. मातंग समाजाच्या दोन कार्यकर्त्यांसह त्यांच्या घरात बसून आम्ही जेवण घतले. त्यांच्या शेतावर महार मजूर काम करीत असल्याची स्वत: खात्री करून घेतली. जर कोणीही भूमिहीन शेतमजूर अथवा हरिजनास गावात घर बांधून राहावयाचे असेल व

त्यास जमीन नसेल, तर स्वत ची जमीन कोणाही हरिजनास घर बांधण्यास मोफत देण्याचे त्यांनी लेखी आश्वासन दिले आहे. सत्य बाहेर यण्यासाठी त्यांच्यावरला खटला जरूर चालावा अशी त्यांची इच्छा आहे. ते काहीही असो–

–शहाजी पार्टल म्हणजे आर्थिक, राजकीय, सामाजिकदृष्टचा गावातील बडे प्रस्थ. प्रचार बाजूने झाला काय, दुष्काळ पडला काय न पडला काय त्यांच्यावर काहीच विशेष परिणाम होणार नाही.

परंतु गावातील गोरगरीब मात्र दुष्काळाने हैराण झाले आहेत. पुरेशी मजुरी मिळत नाही, काम मिळत नाही, कित्येक घरातून चुली पेटत नाहीत तरी लोक संघटित होत नाहीत. त्यांचा सर्वांचा एक नेता नाही. आणि दलितांची एकजूट उभारण्याऐवजी त्यांच्यातील फुटीवर स्वतःचे जमातवादी नेतृत्व पोसायचे आणि त्यांच्यावरील अत्याचारांचा स्वतःची पोळी पिकवण्यास फायदा असे चालू आहे. हा सर्व दुहीचा शाप पाहून फार वेदना होतात.

● ●

## मुक्काम मुंबई

पृष्ठ ६ वरून

केली. राजेशच्या लग्नाची अलिशान वर्णने डोळ्यासमोर ठेऊनच ही जनता शिवाजी पार्कवर लोटली होती.

पण ही 'मराठी' माणसे अजूनही फूटपाथवर होतीच.

दुष्काळाला निसर्गच कारणीभूत आहे असे सचिवालयात दर मजल्यावर पोस्टर्स लावून सांगितले जात आहे. सरकारने केलेल्या कामगिरीचे वर्णन गुळगुळीत कागदाच्या पुस्तिकातून केले जात आहे. वसंतरावांचे आदेश सुटताहेत, स्वतःची पाठ थोपटून घेतली जात आहे.

अरुणी कडकनाथ वाडी पाऊस पडेल, आपण गावाकडे जाऊ अशी स्वप्ने पहात कोहीनूर मिलच्या फूटपाथवर गेल्या दसऱ्यापासून आहे.

ऐष-आरामी मुंबईला काहीच वाईट वाटण्याचे कारण नाही; तिला सवयच आहे.

● ● ●


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

# आलेपाक

■ पुण्यातील लिंगवाद निर्मूलन कृती समितीतर्फे विकृत वाङ्मय आणि विकृत रंगभूमी यांच्या निषेधार्थ भरलेल्या प्रचंड जाहीर सभेत ज्योत्स्नाबाई भोळे म्हणाल्या : मी 'सखाराम बाइंडर' पाहिले नाही; पण त्याविषयी जे काही ऐकले त्यावरून पाहण्याची इच्छाही होत नाही.

पाहणे आणि ऐकणे यात सत्य-असत्याइतके अंतर कधी कधी असते हे ज्योत्स्नाबाईंना ठाऊक असायला हरकत नाही.

■ या सभेत पु. भा. भावे म्हणाले : केळकरांच्या शब्दात सांगायचे तर लेखकाचे सामर्थ्य जेव्हा कमी पडते तेव्हा तो शिवीगाळ करतो.

आणि प्रेक्षकाचे 'पाहण्याचे' सामर्थ्य जेव्हा कमी पडते तेव्हा तो लिंगवाद कृती समिती स्थापन करतो !

■ या सभेत भालबा केळकर (रागावून) म्हणाले : सामोपचाराने समजावून सांगणे आम्हालाही मान्य आहे; पण तो मार्ग संपतो तेव्हा तोंडात मारून समजवावे लागते.

तोंडात मारण्याची भाषा बोलणाऱ्या भालबांचे तोंड थोडेच धरता येते ?

■ त्याच सभेत चित्तरंजन कोल्हटकर विचारतात : ज्यांना संस्कृती, स्त्री, अभिमान यांचा अर्थ कळत नाही त्यांना जोड्याने का मारू नये ?

स्वत: नट असून ज्यांना नाटक कसे पाहावे हे कळत नाही त्यांना उपेक्षेने का मारू नये ?

■ एका अग्रलेखात म्हटले आहे : धूली-वंदनाचा खरा अर्थ 'वंदे मातरम्' हाच आहे.

या अनुरोधाने, 'वंदे मातरम'वरून नुकती झालेली धुळवड मोठी अर्थपूर्ण मानली पाहिजे.

■ एक प्राध्यापक : शिक्षणाशिवाय जीवन सुखी होणे कठीण झाले आहे, हे खरे आहे.

आणि आम्ही : शिक्षणामुळे जीवन सुखी होणे कठीण झाले आहे, हेही तितकेच खरे आहे.

■ नव्याने सादर केल्या जाणाऱ्या 'सुंदर मी होणार' नाटकाच्या एका समीक्षणात म्हटले आहे : आपल्या टकलावर टोप न चढवता संजयची भूमिका करण्याचं धाडस दामू केंकरे यांनी करावं याबद्दल खेद होतो.

टकलाचे, म्हातारे टक्कल आणि तरुण टक्कल, असे दोन प्रकार असतात हे या समीक्षकांना माहीत नसावं या-

बद्दल खेद होतो.

पु. ल. देशपांडे यांनी संजयची भूमिका करण्याचं आणि आम्ही ती पाहण्याचं धाडस मागे केलेलें आहे बरे.

■ विधानसभेत डॉ. रफिक झकेरिया म्हणाले : म्हाळगीसाहेबांची अडचण एकच आहे की ते इस्लाम बगातवालांकडून समजून घेतात.

जनसंघाचे असूनही म्हाळगीसाहेब काहीतरी 'समजून घेतात' हेच पुष्कळ झाले हो. कोणाकडून समजून घेतात हा मुद्दा अगदी गौण आहे.

■ लोकसभेतील एका चर्चेच्या ओघात अविवाहित भूपेश गुप्तांना उत्तर देताना गृहखात्याचे राज्यमंत्री के. सी. पंत म्हणाले, जगातला अनुभव असा आहे की विवाहितांपेक्षा अविवाहित पुरुषांपासूनच स्त्रियांना अधिक धोका असतो.

आमच्या मते स्त्रियांना सर्वात अधिक धोका त्यांच्याच स्त्रीत्वापासून असतो !

●

## रंगभूमीचे कर्तव्यदक्ष लेकरू

भालबा केळकरांबद्दल आम्हाला अत्यंत आदर आणि अभिमान वाटतो. प्रभावी वक्ते, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, विज्ञानविषयक 'सृष्टिज्ञान' मासिकाचे एक 'शास्त्रज्ञ' संपादक, पी. डी. ए. या नाट्यसंस्थेचे माजी आणि आजी अध्यक्ष, अनेक नाटकांचे यशस्वी दिग्दर्शक, हे भालबांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे कर्तृत्वशाली पैलू आम्हीं जाणून आहोत. पण परवा 'घाशीराम कोतवाल' नाटकाच्या निमित्ताने भालबांचे जे ब्राह्मतेज आणि ब्राह्मणप्रेम प्रकट झाले त्याने आम्हीसुद्धा चकित होत्साते अतीव आनंद पावलो. आमच्या ब्राह्मणप्रेमाशी स्पर्धा करील असा समानधर्म आम्हाला प्रथमच पाहायला मिळाला. (ब्राह्मणाच्या अंगाला वेगळा सुगंधित घाम येतो, असे आम्ही प्रामाणिकपणे मानतो, यावरून आमच्या ब्राह्मणप्रेमाची 'जात' लक्षात येईल.)

'घाशीराम कोतवाल' हे नाटक फारसे प्रयोग न होताच धमाल प्रसिद्धी पावले आहे. मुंबईतील सवंगोलंकारी प्रेक्षकवर्गाची, या नाटकाबद्दलची प्रतिक्रिया तितकीशी तीव्र नव्हती; पण पुण्यातील ब्रह्मवृंद मात्र खवळून उठला. पेशवाईचा कोसळता डोलारा आपल्या विलक्षण शहाणपणाने सावरून धरणाऱ्या नाना फडणिसाचा लिंगपिसाटपणा दाखवणारे हे नाटक पुणेकरांनी भ्रुकुटी वक्र न करता कसे पहावे ? नाना फडणीस हा समस्त ब्राह्मणजातीचा दैदीप्यमान आदर्श. त्याच्या शहाणपणाचा वारसा आपल्याकडे आला आहे, अशी पुण्याच्या ब्राह्मणांची मनोमन श्रद्धा आहे. त्यामुळे 'घाशीराम कोतवाल' नाटकातील कामकंडम नाना फडणिसाला पाहताना त्यांच्या जिव्हारी जखम झाली.

भालबा केळकरांची परिस्थिती तर अगदीच चमत्कारिक झाली. कारण 'घाशीराम कोतवाल' सादर करणाऱ्या पी. डी. ए चे भालबा अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय छत्राखाली चालणारी बेशरम ब्राह्मणनिंदा त्यांना कशी सहन व्हावी? तरी भालबांच्या स्वभावात पळपुटेपणा नसल्यामुळे, कोणत्याही परिस्थितीत ते राजीनामा देतील अशी शक्यता नव्हती. त्यावरून तरी 'घाशीराम' करणाऱ्या पी. डी. ए. वाल्यांनी काही बोध घ्यायचा की नाही? पण त्यांना ब्राह्मणनिंदेचा कैफ चढला होता तेव्हा भालबांनीच, पळपुटेपणाचा आरोप पत्करून, पण ब्राह्मणजातीबद्दलच्या अभिमानाचा एक उज्ज्वल आदर्श निर्माण करून, बावीस वर्षे रक्त ओकून लहानाची मोठी केलेल्या पी. डी. ए. चा चक्क राजीनामा दिला. त्यानंतर 'घाशीराम'चा जाहीर समाचार घ्यायला ते मोकळे झाले. त्या अनुरोधाने, समजावून सांगणे थकते तेव्हा तोंडात मारून समजवायला हवे, हे नवे आचारसूत्र भालबांसारख्या रंगभूमीच्या कर्तव्यदक्ष लेकराने मराठी प्रेक्षकांना शिकवले. गेल्या कित्येक वर्षांत असा क्रांतिकारक नाट्यविचार रंगभूमीच्या जगात कोणी मांडलेला नाही, हे आम्ही मुद्दाम सगळ्यांच्या समोर आग्रहाने ठेवत आहोत.

त्यांचे हे रूप पाहून जब्बार पटेल आणि कंपनी पार भयभीत झाली. भालबांनी पी. डी ए. सोडू नये; पी. डी. ए. कोणी सोडायची असेल तर आपणच ती सोडावी, अशी उपरती होऊन जब्बार आणि त्याच्या नाच्या कंपनीनेच पी. डी. ए. सोडली. भालबांनी राजीनामा मागे घेतला; भालबा पी. डी. ए. च्या अध्यक्षपदी पुन्हा मोठ्या (अभि) मानाने विराजमान झाले आहेत.

भालबा आता एकपात्री प्रयोग करणार आहेत, अशी वदंता आहे.

एक सुस्थिर संस्था मोडली याचे दुःख ज्याला वाटायचे त्याला वाटो. आम्हाला मात्र, ब्राह्मणांच्या या पडत्या काळात, ब्राह्मणनिंदेविरुद्ध एक ब्राह्मणाभिमानी सत्पुरुष शीर्षासन करून ताठ उभा राहिला, याचे कौतुकच आहे.

● ● ●

---


पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन

रघू दंडवते
अशोक शहाणे

**दुःख दुसऱ्याचे जाणावे ।**
**ऐकोन तरी वाटून घ्यावे ।**
**बरेवाईट सोसावे ।**
**समुदायाचे ।।**

काम किती चांगलं चाललंय् हे आम्ही सरकारकडनं ऐकतोय्. काम किती वाईट चाललंय् हे विरोधी पक्षाकडनं ऐकतोय्. किती रोजगार दिला जातो हे सरकार सांगतंय्. किती कमी रोजगार दिला जातो हे विरोधी पक्ष सांगतायृत. वैद्यकीय मदतीची उत्तम सोय आहे असं सरकार सांगतंय्. वैद्यकीय मदतीची काहीच सोय नाही म्हणून विरोधीपक्ष ओरडतायृत. दुष्काळ आहे म्हणून विरोधीपक्ष म्हणतायृत. टंचाई आहे असं सरकार सांगतंय्. आम्ही पहातोय् चित्रं खडी फोडणाऱ्या आमच्याच भाईबंदांची....

स्वातंत्र्य मिळाल्यापास्नंच पाऊस कमी-कमी व्हायला लागलाय् का काय नकळे. पाउस कमी व्हायला लागलाय् हे तर गेली पचवीस वर्षं इथं मुंबईत बसल्या बसल्यादेखील लक्षात येत होतंच म्हणा. वर्तमानपत्रं वाचून. इकडेतिकडे बघून.

दुष्काळपण लहानमोठ्ठे पडतच होते. कधी अवर्षणाचे दुष्काळ. तर कधी महापुराचे दुष्काळ.

चारपाच वर्षांमागचा बिहारचा दुष्काळ हा तसा पहिला मोठ्ठा दुष्काळ. म्हंजे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा. ह्याचाच आवाज आम्ही खूप ऐकला. वर्तमानपत्रांतनं वाचला. थोडे पैसेपण खिशातनं दिले असतील-नसतील.

त्याच्यापुढचा राजस्थानचा दुष्काळ म्हंजे आम्हाला काहीच नव्हता. मुंबईत बसून त्याच्याबद्दल आम्ही थोडंफार वाचलं इतकंच.

पण तेव्हापास्नंच अनेक लोकांना देशभरच्या दुष्काळाच्या चाहुली लागल्या होत्या असे म्हणतात. तेही आम्ही निर्विकारपणान वाचलं होतंच. अगदी गेल्या वर्षातच महाराष्ट्रात दुष्काळ पडतापडता वाचला, हेहि आम्ही वाचलं होतंच. खरंतर ह्या सगळ्याच दुष्काळांच्याबद्दल आमच्या शहरातल्या माणसांना नुस्तं वाचून कळून घेण्यापलीकडे काहीच नव्हतं. कुठल्याच अर्थानं. आम्ही दुष्काळग्रस्तपण झालो नव्हतो. दुष्काळग्रस्तांना मदत द्या म्हणन कुणी आमच्यापर्यंत आलं पण नव्हतं. अन् आपणहून तर आम्ही काही करत नव्हतोच नव्हतो.

तर हे वर्ष. ह्या वर्षी मात्र दुष्काळ आला. इथून तिथपर्यंत पाय पसरून आला. आम्ही वाचतोय्-दुष्काळ आलाय्, जवळपास दोन-तृतीयांश देशात आलाय्. पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, आंध्राचा काही भाग, अन् कर्नाटकाचा पण काही भाग. बाकीच्या प्रांतातपण असेलच. आम्ही वाचतोय्-महाराष्ट्रात तो सगळ्यात भेसूर झालाय्.

आता महाराष्ट्रापुरतंच बोलायचं. अन् आपापल्या प्रांतापुरतंच बोलायची पद्धतपण आहेच. तर मुंबईत बसून आम्ही जेमतेम महाराष्ट्रापुरतं पहातोय् की सोलापूर-अहमदनगर जिल्हे न् सगळा मराठवाडा ह्या भागात दुष्काळानं कहर केलाय्.

महाराष्ट्र सरकारनं कंबर कसलेली आहे. जिकडेतिकडे दुष्काळासाठी कामं सुरू केलेली आहेत. रस्ते बांधायची, तलाव खोदायची, खडी फोडायची कामं. अन् आता कोकण रेल्वे. अन् आम्ही वाचतोय्-पहातोय् चित्रं खडी फोडणाऱ्या आमच्याच भाईबंदांची. म्हाताऱ्या-कोताऱ्यांची. आयाबहिणींची. पोरासोरांचीपण.

काम किती चांगलं चाललंय् हे आम्ही सरकारकडनं ऐकतोय्. काम किती वाईट चाललंय् हे विरोधी पक्षाकडनं ऐकतोय्. किती रोजगार दिला जातो हे सरकार सांगतंय्. किती कमी रोजगार दिला जातो हे विरोधी पक्ष सांगतायत. वैद्यकीय मदतीची उत्तम

सोय आहे असं सरकार सांगतंय्. वैद्यकीय मदतीची काहीच सोय नाही म्हणून विरोधी पक्ष ओरडतायत. दुष्काळ आहे म्हणून विरोधी पक्ष म्हणतायत- टंचाई आहे असं सरकार सांगतंय्. आम्ही पहातोय् चित्र खडी फोडणाऱ्या आमच्याच भाईबंदांची.

दुष्काळ नसता तर त्यांनी शेतात काम केलं असतं. दुष्काळ आहे म्हणून ते खडी फोडतायत. ह्याखेरीज त्यांच्याजवळ तिसरं काम नाही. सरकार त्यांना देऊ शकत नाही. विरोधी पक्ष देऊ शकत नाहीत. आम्ही शहरवालेपण देऊ शकत नाही, ह्या एकाच मुद्यावर आमचं सगळ्यांचं एकमत आहे--की दुष्काळ नसला की गावातल्या लोकांनी शेतावर काम करावं अन् दुष्काळ असला की खडी फोडावी. चोरी शाबीत झालेल्या चोराला जसं पूर्वी तुरुंगात खडी फोडायला लावायचे, तसंच काम दुष्काळ असला की गावातल्या सन्मान्य प्रतिष्ठित माणसाला करावं लागतं.

पण हे न करून सांगता कुणाला! हे करायलाच हवं. हा दुष्काळ संपेपर्यंत ह्या माणसाला जिवंत ठेवायलाच हवा. जमेल तितकं त्याच्या गुरांनापण जगवायला लागते. त्याला ती लागतात म्हणून. आता गुरं जगवणं हे काही माणसाला जगवण्याइतकं सोपं नाही. तर त्यातली काही मरतील. त्याला इलाज नाही. पण सध्या खिशात हात घातला पाह्यजे. एखाद्या दिवसाचा पगार काढून दिला पाह्यजे. दुष्काळ संपेपर्यंत. पाऊस पडेपर्यंत. म्हंजे हा दुष्काळ सुरू व्हायच्या आधीची परिस्थिती परत येईपर्यंत. की मग आपण मोकळे.

ह्या दुष्काळाच्या बाबतीत ह्याच्यापेक्षा जास्ती काही करण्याजोगं आमच्या हातात नाही. निदान असेल तर ते आम्हाला माहीत नाही. खरी गोष्ट अशी आहे की ही जी खेडी आहेत--जिथं दुष्काळ पडलेला आहे--त्यांच्याविषयी, त्या माणसांच्याविषयी आम्हाला फारशी माहितीच नाही.

आमची तुटपुंजी माहिती वर्तमानपत्रातनं येणाऱ्या बातम्यांच्यावर अवलंबून आहे. आम्ही वाचतो की महाराष्ट्रातच दोन-अडीच कोटी लोकांना दुष्काळाचा तडाखा बसलेला आहे. म्हंजे जवळ जवळ निम्मा महाराष्ट्र. सबंध देशातही वीस कोटींच्यावर माणसं दुष्काळग्रस्त आहेत म्हंजे जवळ जवळ निम्मा देश. ही आमची माहिती.

शिवाय कुठल्याही बाबतीत सरकारचं म्हंजे सत्तेवर बसलेल्या मंडळींचं म्हणणं एक असतं. अन् विरोधी पक्षांचं म्हंज सत्तेवर नसलेल्या मंडळींचं म्हणणं वेगळंच असतं. अन् मग आमच्यापैकी ज्याचा जसा कल असेल तशी तो बाजू घतो अन् बोलू लागतो

म्हंजे सत्तेवर असलेल्यांची बाजू घेणारा म्हणतो--हे संकट तर आता आलं. त्याला इलाज नाही आता त्यातनं सहीसलामत बाहेर कसं पडता यईल तेवढं बघायला हवं. अन् सरकार सर्व काही करतंय्च. पण संकट सरकारच्या ताकदीपेक्षा मोठं आहे. तेव्हा सगळ्यांनी मदत करायला हवी.

सत्तेवर नसलेल्या पण येऊ बघणाऱ्या लोकांची बाजू घेणारा म्हणतो—हे संकट आलं तेही सरकारमुळंच आलंय्. म्हंजे सरकारच्या चुकीच्या धोरणामुळं. अन् अजुनी सरकार फार हातपाय हलवत नाहीच आहे.

तिसराही एक पंथ आहे. कशाहीवर रामबाण इलाज म्हणून हुकुमशाही सांगत असतो.

आमची राजकीय चर्चा ही अशी असते. म्हंजे उदाहरणार्थ—-राजस्थानमधे ह्या दुष्काळात खरोखरीच भूकबळी पडलेयत का नाहीत, ह्याच्याविषयीची आमची मतं म्हणा किंवा माहिती म्हणा आम्ही कुठलं वर्तमानपत्र वाचतो किंवा कोणत्या पुढाऱ्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर अवलंबन असते.

एक गोष्ट मात्र नक्की. कारण ह्या एकाच गोष्टीबद्दल तस दुमत नाही. की देशातले ७५ ते ८० टक्के लोक ह्या खेडेगावातनं रहातात. २० ते २५ टक्केच लोक ह्या शहरातनं राहतात. पुन्हा शहरंदेखील लहानमोठी अशी. म्हंज सोलापूर–अहमदनगर हो शहर. किंवा पुणे हे एक शहरच. अन् मुंबई म्हंजे फारच मोठ्ठं, पण शहरच. त्यात पुन्हा अहमदनगर–सोलापूरच्या लोकांना आजूबाजूची खेडी बरीच जवळ. तेव्हा ह्या शहरांना खेड्यांची माहिती थोडी जास्त असणार. पुण जास्ती पुढारलेलं. म्हणून पुण्याच्या लोकांना ही माहिती थोडी कमीच असेल. अन् मुंबईची तर गोष्टच वेगळी. मुंबई हे काही नुस्तं शहर नाही. ते एक बेट पण आहे. शिवाय इथं इतर प्रांतातल्या लोकांचा भरणा भरपूर. तर इथल्या गुजराती, सिंधी, तमीळ, मल्याळी, हिंदी मंडळींना तर ह्या महाराष्ट्रातल्या खेड्यांची काहीच माहिती नाही. शिवाय इथल्या मराठी मंडळींचा त्यांच्यावर प्रभाव पडून त्यांचा ह्या ७५ टक्के महाराष्ट्राशी काही संबंध यावा, तर तेही शक्य नाही. झालंय् ते उलटंच: मुंबईत माणूस जितका जुना झाला, तितका तो बाकीच्या देशापास्नं दूर गेला. मग तो मूळचा महाराष्ट्रातला असू दे नाहीतर केरळातला असू दे.

तर इथल्या आमच्यासारख्या साधारण माणसाची साधारण समजूत अशी की, एक दिवसाचा पगार द्यावा. गाण्याबिण्याचे जलसे करून पैसे गोळा करावेत. श्रीमंत कारखानदारांच्याकडनं पैसे घ्यावेत. एखादी क्रिकेटची मॅचहि करावी. येनकेन प्रकरेण मुख्यमंत्री फंडात पैसा ओतावा की हे सगळं प्रकरण आटपेल. पाऊस पडेल. की मग आबादीआबाद.

अन् तरीदेखील नुस्तं ह्या मुंबईकडेच बघितलं तरी सगळं काही तसं ठाकठीक आहे असं वाटत नाहीच. काही शंका तरीपण डोकं जरा वर

## मुंबई एक 'बेट' पण आहे

काढतातच.

आता आज ही मुंबई जशी आहे तितकी मोठ्ठी तो पूर्वी–म्हंजे सत्तेचाळीस सालच्या आधी–नव्हती. इकडे शीवपास्नं मुलुंडपर्यंत–खरंतर ठाण्यापर्यंत–अन् तिकडे माहीमपास्नं दहीसरपर्यंतची मुंबई ही खास अलीकडली. म्हंजे आजच्यासारखी गजबजली ती अलीकडेच. निरनिराळे कारखाने निघाले. आधीचे मोठ्ठे झाले. मोटारींचा कारखाना, निरनिराळी इंजीनिअरिंग वर्क्स, औषधांच्या पावडरींच्या कंपन्या, नायलॉन – टेरिलीन – रे फ्रि ज रे ट र्स चे कारखाने.

तर हे सगळं सत्तेचाळीस सालानंतर झालेलं आम्ही पाह्यलं. मोठी गोष्ट झाली. मोठा उद्योग झाला. कितीएक लोकांना कामं मिळाली. पूर्वीपास्नंच मुंबई म्हंजे अख्ख्या देशाचं मायपोट म्हणायचे. आता तर काय–जिथं हजार होते, तिथं लाख झाले. पूर्वीच्या मुंबईची लोकवस्ती काय होती ठाऊक नाही. पण आता पन्नास लाखाच्याहि वर गेलीय्.

पण हे सगळं होत असतांनाच आणखीही एक गोष्ट झाली. झोपडपट्ट्यापण वाढल्या. जसे कारखाने वाढले, जशा इमारती वाढल्या–आधी होत्या त्याच्यापेक्षा ऊंचउंच होत गेल्या–तशाच ह्या झोपडपट्ट्यापण वाढल्या.

आता हे कारखाने झाले, बँका वाढल्या, न्हाव्याची दुकानं वाढली– ही म्हंजे झाली प्रगती. अन् ह्या झोपडपट्ट्यापण वाढल्या तर हा उभा झाला एक प्रश्न. हे कारखाने आम्हाला हवेयत. ते लोकांना काम देतात. निरनिराळ्या वस्तू पैदा करतात. ह्या बँकापण आम्हाला हव्यायत. त्या कारखान्यांना पैशाअडक्याची मदत करतात. ही कॉलेजं पण आम्हाला हवीयत. त्यातनं नवीन कारकून-कामगार-प्रोफेसर तयार होतात. ही न्हाव्याची दुकानंपण आम्हाला हवीयत. पण ह्या झोपडपट्ट्या मात्र आम्हाला नकोयत. त्यांची काहीतरी वेगळीच व्यवस्था आम्हाला लावायचीय्. तर हा एक आमचा प्रश्न.

आता दुष्काळातल्या लोकांच्याबद्दल बोलायला लागून मुंबईच्या झोपडपट्ट्यांची आठवण काय म्हणून यावी ? तर आम्ही वर्तमानपत्रातनं हे पण वाचलेलं आहे की गावागावातनं लोक बाहेर पडायला लागलेयत गाव सोडून. कारण गावात काम नाही. रेशन घ्यायला पैसे नाहीत. प्यायला पाणीदेखील नाही. मग काय करायचं ? बोचकी बांधायची न् चालू पडायचं. बायकापोरांना घेऊन. काम मिळेल तिकडे. काम मिळेल ह्या आशेनं. किंवा काहीच आशा न धरता; पण चालू पडायचं.

ही माणसं पुण्यात आली. मुंबईतपण थोडीशी आलीच. खरंतर मुंबईला चांगला लोंढाच यायचा. पण कल्याणला गाड्या तपासायला सुरुवात झाली. हे लोक मुंबईत येऊ नयेत म्हणून. मुंबईत येऊन त्यांनी घाण करू नये म्हणून. आमचं आहे तेच पुरे आहे, तुमची

आणची भर नको म्हणून.

पण ही आता आलेली माणसं निदान पाऊस पडल्यानंतर परत घरी गेली असती. निदान जातील असं म्हणूया. पण त्याच्याही आधी ही जी बाकीची-पण माणसं इकडे आली, तो काय म्हणून आली? त्यांच्यावर असं काय आभाळ कोसळलं म्हणून त्यांनी मुंबईकडे धाव घेतली? अन् येऊन तरी त्यांचं असं काय झालं? काम मिळालं, त्यांनी काम केलं. नाहीतर हमाली केली. नाहीतर भीक मागितली. नाहीतर चोरीशिंदळकी केली. अन् आमच्यापुढं एक प्रश्न उभा करून ठेवला. ज्यांना जागा मिळाल्या, ते नीट इमारतीतनं प्रशस्तपणानं राह्यले. नाही त्यांनी झोपडपट्ट्या गाठल्या.

का म्हणून ते मुंबईत आले? त्यांच्यापैकी सगळीच माणसं मुंबईला भार म्हणूनच आहेत का? का त्यांना काम मिळालं पण राह्यला जागा मिळाली नाही? अन् ज्यांना काही कामरण मिळालेलं नाही, त्यांचा भार तरी मुंबईनं काय म्हणून सोसायचा? का त्यांच्या झोपड्या जाळून टाकून त्यांना मुंबईतनं हाकून द्यायच नाही?

तेहा करता येईल. अन् तरीदेखील मुंबईत ते मुळात आलेच का?——ह्या प्रश्नाचं उत्तर काही मिळणार नाही. निदान मुंबईत बसल्या बसल्या आम्हाला तरी ह्या प्रश्नाचं उत्तर माहीत नाही.

पण वर्तमानपत्रातनं फक्त दुष्काळाच्याच बातम्या येतात असं नाही. मुंबईत बाहेरनं येणारे लोक फक्त गावच्या शेतीभातीच्याच गोष्टी बोलतात असेही नाही. ते आणखीही काही सांगतात. अन् मग ह्या वाचलेल्या-ऐकलेल्या गोष्टींचा एकमेकीशी मेळ घालायला बसलं की पंचवीस वर्षं ज्या गोष्टींच्यावर आपण डोळे मिटून विश्वास ठेवला, त्या गोष्टीच्याबद्दलच शंका यायला लागते.

देशात दुष्काळ पडला. कारण पाऊस पडला नाही. पाऊस का पडला नाही? तर गेल्या महिन्यातच मुंबईतच जाणकार मंडळींची एक बैठक भरली होती, तिथे असं निघालं की जंगलाची फार मोठ्या प्रमाणावर तोड झाल्यामुळंच हा दुष्काळ पडलाय्. म्हंजे जंगलं तोडली गेली हे एक कारण. एकमेव नसेल. पण सगळ्यात मोठ्ठं.

जंगलं कुणी तोडली? कशासाठी तोडली? अनेकांनी अनेक कारणासाठी तोडली असतील. मुंबईच्या कारखान्यांनी तर नाही तोडली?

तर केरळमधल्या एका मित्रानं सांगितलं——आमच्याकडे बिर्लांचं एक पल्प फॅक्टरी आहे म्हंजे लाकडाचा लगदा करायची. तर नंबुद्रीपादांनी बिर्लांना खूप सवलती दिल्या बांबूचं बनं कापायसाठी. सरकारात एक रुपाया भरून एकरभर जमिनीतले बांबू काटा म्हणाले. हे करताना नंबुद्रीपादांच्या मनात अर्थात चांगलंच होतं. लोकांना काम मिळावं. इथल्याइथं काम मिळत नाही म्हणूनच तर लोक परप्रांतात जातात तर लोकांना इथल्याइथं काम मिळालं तर किती बरं. पण लोकांना

काम मिळायचं तर काही उद्योगधंदा निघाला पाह्यजे. उद्योगधंदा काढायचा तर भांडवल हवं. तर म्हणून बिर्लांना बोलावलं. त्यांना सवलती दिल्या. लोकांना काम मिळावं म्हणून.

बिर्लांनी दिलदेखील काम. बनं कापायची. त्यांचा लगदा करायचा. त्याच्यातनं पाह्यजे ती रासायनिक द्रव्यं काढायची न् तो मुंबईला पाठवून द्यायची. नकली धाग्याचं कापड बनवण्याकरता.

पण केरळचे लोक. त्यांनी संप केला. बोनससाठी. ७५ टक्के बोनस हवा म्हणाले. मालकांनी फायदा किती म्हणून उठवावा ह्याला जर काहीच मर्यादा नाही तर आम्ही बोनस किती मागावा ह्यालाच तेवढी काय म्हणून! दोनशे दिवस संप चालला. शेवटी ४५ टक्के बोनस पदरात पाडून घेतला. शिवाय संपाच्या काळातला काही दिवसांचा पगारपण. परत सगळं ठाकठीक.

असं दहाएक वर्षं चाललं. बांबूची बनं पुरेशी कापली गेली असं बघून बिर्लांनी आटपतं घेतलं. कच्चा मालच नाही तर ते काय करणार? लोकांना कामा-वरनं काढायला सुरुवात झाली.

केरळची बांबूची बनं गेली. कामपण गेलं. 'बिर्लांचा मुंबईचा कारखाना चालूच राह्यला. चालूच राहील. त्यासाठी बिर्ला आता मध्यप्रदेशात बस्तरला जंगलं तोडायला जाणारायत म्हणे. पण आता केरळच्या लोकांनी काय तोडायचं?

—असं तो केरळमधला मित्र म्हणत होता.

बिर्लांनी बांबू तोडून लगदा केला. तो मुंबईत आणून त्याचं कापड बनवलं. देशात-परदेशात विकलं. परवाच 'दिनमान'च्या एका अंकात डॉक्टर शूमाखरसाहेबांची मुलाखत आली होती. डॉक्टर शूमाखर म्हंजे भलतेच मोठे अर्थशास्त्रज्ञ. तर मुलाखतीत ते म्हणत होते—बाबांनो, तुम्ही ही जी जोराजोरानं जंगलं तोडताय् ते बघून मला भीतीच वाटायला लागलीय्. जंगलं काढलेली उघडीवाघडी ज़मीन मुसळधार पावसाला, कडक उन्हाला न सोसाट्याच्या वाऱ्यांना काय तोंड देणार? सगळ्या देशाचं तुम्ही वाळवंट करायला निघालायत् का काय?

ह्या जाणकार मंडळींनी जंगलं तोडली हे दुष्काळाचं सर्वात मोठ्ठं कारण म्हणून सांगितलं अशा चार ओळी वर्तमानपत्रात आल्या अन् लगेच दुसऱ्याच दिवशी बातमी आली —— नकली कापड कारखानदारांनी मुख्यमंत्र्यांच्या फंडात बावीस लाख रुपये दिले म्हणून. ह्याचा अर्थ लागत असेल तर ज्याचा-त्यानं लावावा.

ह्या दुष्काळाच्या बातम्या यायच्याआधी मुंबईच्या असेंब्लीत काँग्रेसच्याच एका आमदारांनी सांगितलं होनं की महाराष्ट्रात अमुक हजार चांभार बेकार आहेत. तेव्हा त्यांना काम द्या.

आता इतक्या हजार लोकांना एकदम काय काम द्या? आम्ही तर काही कुठल्या चांभारानं बांधलेले जोडे वापरत नाही. आम्ही बाटा-करोनावाल्यांनी तयार केलेले जोडे वापरतो. प्लास्टिकच्या

चपलापण वापरतो ह्या कारखान्यातनं जोडे बनवायची यंत्रे आहेत, हेही आम्हाला माहीत आहे. माल बनवायची किंमत कमी पडावी म्हणून यंत्रं वापरली जातात. तेव्हा ह्या कारखान्यांनी जरूरीपेक्षा जास्ती कामगारांना काम द्यायचा प्रश्नच उद्भवत नाही. तेव्हा निदान आमचे जोडे बनवायचं काम ह्या बकार चांभारांना मिळायची सुतराम् शक्यता नाही.

तर बाटांनी गावागावातनं गुरं आणावीत. कसाईखान्यातनं त्यांना मारून घ्यावं. त्यांचं कातडं कमवावं. अन् शक्य तितके कमी कामगार कामाला लावून कमीत कमी खर्चात आम्हाला परवडतील असे सुबक जोडे तयार करून ते आमच्या पायात घालावेत. ज्या-ज्या गावातनं गुरं आणली असतील, त्या त्या गावच्या लोकांनाही विकावेत. देशोदेशींच्या इतरांनाही विकावेत.

आता ह्या गुरांच्या न् चपलांच्या ने-आणीचा खच ते किमतीत धरणार हे रास्तच आहे की. तर हा खर्च म्हणे एकूण किमतीच्या ३०–३५ टक्के असतो. आम्हाला काही हे माहीत नव्हतं. पण मध्यंतरी दोन फ्रेंच पत्रकार इकडे आले होते. चीनची फेरी करून परतताना त्यांना इथं हे दिसलं. अन् टाइम्समधे लेख लिहून त्यांनी हे आम्हाला सांगितलं. की वाहतुकीचा खर्च ३० ते ३५ टक्के असतो. अन् शिवाय गेल्या पंधरा वर्षांत बाटांच्या कारखान्यात किती कामगार वाढले ह्याचे आकडे मिळतात, पण खेड्यातल्या किती हजार चांभारांचं काम गेलं ह्याचे काहीच आकडे मिळत नाहीत.

आता बाटांच्या कारखान्यात इतक्या लोकांना काम मिळणं ह्या गोष्टीला कुठल्यातरी चांभारांचं काम जाणं अशी दुसरीही एक बाजू असते, हे तर आम्हाला अजिबातच माहीत नव्हतं. अन् हे जे काही हजार चांभार तिकडे बेकार पडलेयत, त्यांच्यातलेच काही जर काम शोधत मुंबईतच येऊन धडपडले न् त्यांनी झोपडपट्ट्यांची धन केली तर तो मात्र आम्हाला एक प्रश्न होऊन बसेल.

चामड्याचे तुकडे, आरी न् दोरा घेऊन मुंबईत फुटपाथवर फाटकेतुटके जोडे शिवून देणारा चांभार अलीकडे शेजारीच प्लास्टिकच्या चपलांचा ढिगपण विकायला ठेवायला लागलाय्. जमीन नसलेला आदिवासी वर्षाकाठी चारपाच महिनेच काम मिळून उरलेल्या दिवसात जंगलातले विषारी कंदपण पोटात ढकलतो असं म्हणतात. ह्या चांभाराची हालतपण नेमकी तीच म्हणायची ना? पण तो तरी काय करणार? नाविलाजाला विलाज नाही

मुंबईहून गावांत देऊळ बांधायला निघालेला एक मित्र परवा सांगत होता—

## जमिनींची वाळवंटं होत आहेत

'आमच्या गावातले बरेचसे कुणबी इथं असतात. त्यांचा पत्ता शोधत एका चाळीत गेलो. जुनाट चाळ. एका छोटयाशा खोलीत चाळीस माणसं अन् चार कोपऱ्यांत चार चुली. अशी परिस्थिती. सगळीच माणसं काही आमच्या गावची नव्हती. काही दुसरी-कडचीपण होती.

तिथंच एक म्हातारापण भेटला. आमच्याच गावचा. लहानपणी तो जागल्या म्हणून दाराशी यायचा. मुलगा मुंबईला आला. त्याच्या मागोमाग हा पण मुंबईला आला. काही दिवसा-मागं हा मुलगा वारला. त्याच्या दुःखानं म्हातारा भ्रमिष्ट झाला. सून विचारत नाही. आता तो भीक मागतोय. मी त्याला एक रुपया दिला.'

ही तर कोकणातनं इथं आलेल्या माणसाची गोष्ट. इथनंपण दर महि-न्याला कोकणात शेकडयांनी मनीऑर्डरी जात असतातच. निम्मं कोकण त्याच्या-वरच जगतं म्हणे. ह्या दुष्काळाचेच कोणतेही रिपोर्ट वाचले तरी सगळीकडे एक गोष्ट सारखीच दिसते. गावात शेतीखेरीज धंदाच राह्यलेला नाही. हा धंदापण ज्यांच्या नशिबात नाही किंवा त्याच्यावरच अवलंबून रहाणं ज्यांना परवडलं नाही, त्यांनी मुंबईचा रस्ता धरला. ज्यांना काम मिळालं, त्यांनी काम केलं. नाहीतर हमाली केली. नाहीतर भीक मागितली. नाहीतर चोरीशिदळकी केली.

अन् एकदा एखाद्याच्या कपाळावर भिकारी म्हणून लेबल चिकटवलं की मग त्याचा माणूस म्हणून विचार करा-यची आपल्यावर जबाबदारीच रहात नाही. अलीकडेच कुसुमाग्रजांनी ह्या दुष्काळावर लिहिलेल्या लेखात जुन्या बंगालच्या दुष्काळाची आठवण सांगित-लीय्. की बंगालच्या दुष्काळात लोक मरत होते अन् इकडे लोक म्हणत होते —"माणसं कुठं मरतायृत? तिकडे तर नुसते भिकारीच मरताय्त."

गेल्या महिन्यात नवभारत टाइम्स-मधं एक पत्र आलं होतं ते असंच बोलकं. गोष्ट राजस्थानातली आहे. तिथले हातमाग विणकर कापडाला झळाळी आणायला एक यंत्र वापरत होते. त्यांनीच बनवलेलं. हे यंत्र चालवायला वीज लागायची नाही की वाफ लागा-यची नाही. ते हातानं चालवता यायचं. अन् कापडाला अशी झळाळी यायची की मिलवाल्यांचं मर्सराइज्ड कापड ह्याच्यापुढ काहीच नाही कापड तयार होत होतं. नीट खपत होत. पण मधेच काय झालं कुणास ठाऊक. ह्या यंत्रावर मूळ किमतीच्या अव्वाच्या सव्वा कर बसवला गेला. म्हंजे बारा हजाराच्या यंत्रावर दरसाल साठ हजार रुपये 'उत्पादन शुल्क.'

एकीकडे असं सांगतात की विण-करांना संरक्षण द्यायचं सरकारचं धोरण आहे म्हणून. अन् प्रत्यक्षात हे असं. लोकांना काम देणं दूरच राह्यलं पण नीट काम करून राह्यलेल्या लोकांचा छळवाद. आता ह्या लोकांनी काय करावं? काहीच करू नाही म्हटलं तर निष्पन्न काय? तर बेकारी. इकडे

शहादे तालुक्यात आदिवासी मंडळीत काही काम चाललंय् त्यांना जमिनी मिळवून देण्याचं, त्यांची रोजी ठरवून देण्याच. तिथल्या कामाचा रिपोर्ट वाचावा तर मधेच येत—निव्वळ शहादे तालुक्यात पाचशे कोष्टी बेकार पडलेले आहेत.

ही अनास्था नुस्ती गावातल्या धंद्यांच्याचबद्दल नाही तर अगदी पिण्याच्या पाण्याच्या बाबतीतही हीच रडकथा आहे. पुण्या-मुंबईच्या प्यायच्या पाण्याची सोय ताबडतोब होते, तिथं दिरंगाई नाही. पण अहमदनगरसारख्या आडगावच्या शहराचीसुद्धा पाण्याची कायमची व्यवस्था पंचवीस वर्षांत होत नाही. मग बाकीच्या गावची तर गोष्टच सोडा. अहमदनगर जिल्ह्यातलाच पाथर्डी तालुक्यासारखा कायम कोरडा भाग. तिथली पाण्याची काय सोय ? तर काहीही नाही.

गेल्या पचवीस वर्षांत महाराष्ट्र सरकारनं दुष्काळी मदतीवर शंभर-सव्वाशे कोट रुपये खर्च केले म्हणे. पण पिण्याच्या पाण्याची कायम सोय करण्यासाठी खर्च किती ? त्याची काय व्यवस्था ? तर काहीही नाही.

पश्चिम बंगालमधेपण हीच अवस्था. दुष्काळी कामावर खर्च इतकाच झाला. लोकांच्या पिण्याच्या पाण्याचीपण सोय झाली नाही. ह्या बाबतीत ते न् आपण सारखेच. असं कदाचित् प्रत्येक प्रांताचंच असेल ना ?

ह्या बाबतीत सबंध देशाचीच काय हालत आहे तेपण वर्तमानपत्रातनं येतं. नाही असं नाही. १९६४–६५ सालची गोष्ट आहे. देशातल्या एक लाख गावात पाण्याची काहीच सोय नाही. दीड लाख गावात सोय आहे—पण अपुरी. चौथ्या योजनेत पाणी न् साफसफाईसाठी ३३९ कोट रुपयांची तरतूद होती. पैकी शहरांकरता २३९ कोट न् गावाकरता अवघे १०० कोट. म्हंजे शहरांच्या निम्म्यापेक्षाही कमी. हे १०० कोट-देखील सरकारचे न् गावकऱ्यांचे मिळून. गावकऱ्यांचे निम्मेअर्धे असतीलच. म्हजे सरकारचे झाले पन्नासेक कोट. म्हजे एकूण तरतुदीतले कसेबसे वीस टक्के ऐंशी टक्के लोकांच्याकरता. अन् वीस टक्के लोकांच्याकरता ऐंशी टक्के रक्कम. आहे का नाही लोकशाही ! बहुमताचा कारभार ! वगैरे वगैरे !

ह्याच्यात आणखी एक गंमत आहेच अजून. मुंबईची एखादी योजना असली की सरकार ती स्वतःच्या खर्चानं करून टाकते. मग कर म्हणून वसूल करून घेतहि असेल. पण गावात काही व्हायचं तर गावकऱ्यांनी आपल्या वाट्याचा निम्मा पैसा आधी रोख मोजावा. सरकारकडे त्याचा भरणा करावा. इतकं करूनहि प्रत्यक्षात काही लगेच होईलच अशी काही शाश्वती नाही. असा हा सगळा आवडती-नावडतीचा प्रकार

## शहादे : पाचशे कोष्टी बेकार

आहे. निव्वळ सरकारचाच नाही. आमचाही.

मग आश्चर्य वाटतं का नाही की मोगलांशी चक्क लढाई चालू असताना उदयपूरचा तलाव खोदला गेला ! वेढा पडलेला. चहूबाजूंनी नाकेबंदी. बाहेरून रसद मिळायची काहीच सोय नाही. ह्यातच आणखी दुष्काळ पडला तर मग हार पत्करायला लढाईची ही काहीच जरूर राह्यली नसती. म्हणून रजपूतांनी वेळीच बंदोबस्त केला.

आमच्याकडे एव्हांना तीन लढाया झाल्या. चार योजनाहि झाल्या. एक हरित क्रांति तर गेल्याच वर्षी होऊन गेली. अन् मग लगेच हा दुष्काळ.

मुंबईच्या वाटेवर लोकांना अडवून त्यांची छावणी टाकली ती भिवंडीला. काही आधीच मुंबईत आतपर्यंत आलेले होते, त्यांनाही भिवंडीला नेऊन टाकलं. अन् आता त्यांना काम काय दिलंय् तर ठाणं की कल्याणच्या पाणीपुरवठ्याची योजना बांधून काढायचं म्हंजे ह्या दुष्काळामुळं ठाणे-कल्याणकरांची पाण्याची सोय आपसुक होऊन जाईल. पूर्वीच्या वेठबिगारीत न् ह्या प्रकारात काय फरक आहे ?

सगळ्याच बाबतीत तराजूचा दांडा शहराच्याकडेच कसा झुकतो ? काही वर्षामागं कारभारी मंडळींच्या लक्षात आलं की शेतीकरता पैशाअडक्याची काहीच सोय नाही म्हणून. हिशेब करून बघितल्यावर कळलं की आदल्या वर्षी दिलेल्या एकूण कर्जात शेतीकरता हजारातले फक्त तीन रुपयेच दिलेयृत. आता आपला देश शेतीप्रधान अन जगभर पोटाची खळगी भरण्याकरता वणवण आहेच. हे सगळं थांबवण्याकरता बँकांनी शेतीकरता जास्त कर्ज दिली पाहिजेत अशी फर्मान निघाली.

बँकांनी ही कर्ज दिलीही. कशी दिली ? तर—तुम्हाला पाण्याचा पंप घ्यायचाय् ? विजेची मोटार घ्यायचीय् ? किंवा निदान रासायनिक खतं तरी ? तर आम्ही तुम्हाला पैसे द्यायला तयार आहोत. हा मदतीचा हात आम्ही पुढं करतोय्—वगैरे जाहिरातीही आल्या वर्तमानपत्रातनं. शेती पैशाअभावी वाळून जाऊ नये म्हणून बँकांनी कसून प्रयत्न केले.

पण म्हंजे प्रत्यक्षात काय झालं ? बँकांनी शेतकऱ्याला दिलेले पैसे परत सरळ शहरात आले. पंपवाल्याकडे, मोटारवाल्याकडे, खतवाल्याकडे. म्हंजे इतक्या आडवळणानं हा घास घ्यायच्याऐवजी जर बँकांनी ह्या पंपवाल्या, मोटारवाल्या-खतवाल्या मंडळींना परस्पर पैसे दिले असते तरी चाललं असतं की. नाहीतरी हे लोक बँकांचे खातेदार होतेच. तेव्हा खरंतर शेतकऱ्याला मधे घालायची काहीच जरूर नव्हती. पण तेवढीच मधल्यामधे व्याजाची भर पडली. शहरातला पैसा वाढला. आमची अर्थव्यवस्था भक्कम झाली.

किती भक्कम झाली ? तर ह्या दुष्काळात आम्हाला गाजावाजा न करता आगगाड्या तपासून दुष्काळी भागातनं येणाऱ्या लोकांना मधेच उतरवून भिवंडीला धाडावं लागलं. हो, नाहीतर

हे इतकाले लोक इथं येणार. त्यांना काम नाही धंदा नाही. इतक्या लोकांना देता येण्याजोगं काही कामही आमच्या-जवळ नाही. आधीच आम्ही कामाला कमीच माणसं लावावी लागतील असं सगळं आखून ठेवलय्. अन् मुळात आमच्या इथश्ण आधीपासनंच कामधंदा. नसलेली माणसं का कमी आहेत ? तर आणखी ह्यांचा बोजा कुठं घेता उरावर ?

इथं फक्त कामधंदा असणारा माणूसच राहू शकतो. बेकार माणसाचे हाल इथलं कुत्रदेखील खात नाही. पण पण काम करणारा माणूस इथं काही कमवू शकता. आठ तास काम करून पोटापुरत कमवू शकतो. मग हलकेहलके माणसामाणसातले मायेचे संबध उडून जातात. त्याला इलाज नाही. अन् त्यांच्या जागी पैशाचे संबंध येतात. पै-पैशाची अगणित चाकं इथं खडखडाट करत माणसांच्या अंगावरनं पुढंपुढं जात असतात. अन् उंच उच इमारतींच्या-सारखी भक्कम अर्थव्यवस्था इथं खडा होते. भक्कम अर्थव्यवस्था म्हंजे इथ फक्त 'अर्थ'च तेवढा भक्कम असतो. माणसं इथं कःपदार्थ असतात. इथल्या अर्थव्यवस्थेचं इंधन म्हणून असतात. पण इंधन नसलेली माणसच जास्ती जमा झाली तर मग कठीण आहे. मग ही भट्टीच विझून जाईल. मग ही भली-भक्कम अर्थव्यवस्था कोलमडून पडायला काहीच वेळ लागायचा नाही. अन् भ्रमाचा भोपळादेखील फुटताना बघायला कुणाला आवडतो ? तर दुष्काळात सापडलेल्या मंडळींनी आमच्या एखाद्या-अर्ध्या दिवसाच्या पगारावरच दुष्काळ धकवून न्यावा. त्यापेक्षा जास्ती आम्हाला परवडणारंच नाही मुळी. हो, अन् काही झालं तरी ही दुष्काळी मंडळी इथं नकोत. आमच्या अगदी समोर. त्यांची परिस्थिती कळवायला आमच्या इथली वर्तमानपत्र समर्थ आहेत.

शिवाय अलीकडे नाहीतरी हे शेतकरी गबर झालेच होते साखर काय महाग-लीय् पहा ना. अन् शिवाय शेतकऱ्यांना कवडीचा म्हणून इनकम टॅक्स भरायला लागत नाही. इथं आम्हाला मात्र त्यातन सुटका नाही. —असही एक आमच म्हणणं असतं.

इथं एक गोष्ट आम्ही भलत्याच नीटपणानं विसरून जातो. इतक्या नीट-पणानं की ती विसरलोय् हेही आमच्या ध्यानात येत नाही. गोष्ट अशी की उत्पन्नाच्या कराचीपण एक खालची मर्यादा असते. ह्या मर्यादेखालच्या लोकांना शहरातपण उत्पन्नावर काही कर द्यावा लागत नाहीच. गावात ह्याच्या उलटी परिस्थिती असते. जमीन कितीही कमी असली—त्यातनं शेतकऱ्याच्या पोटापुरतंच किंवा त्याहूनही कमी पीक येत असलं—तरी त्याला शेतसारा हा द्यावा लागतोच. शिवाय ह्या शेत-साऱ्याच्या मालकीवरनं उत्तरप्रदेशात काय घोळ झाला हा सगळा अलीकड-चाच इतिहास आहे की.

शेतसाऱ्यावरनं बरं आठवलं यंदाचं वर्ष म्हंजे स्वातंत्र्याच्या रजत जयंतीच वर्ष. देशाला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षं

पूर्ण झाली गेल्या १५ ऑगस्टला. तर त्या निमित्तानं सरकारनं काही बरे संकल्प सोडले. त्यातला एक असा की ज्या-त्या गावचा शेतसारा त्या-त्या गावावरच खर्च केला जाईल. म्हंजे इतके दिवस कुठं खर्च होत होता, कोण जाणे! पण असा चांगला संकल्प सोडायला न् दुष्काळ पडायला एकच गाठ पडली. आता तर दुष्काळात मदत म्हणून साऱ्याचे कितीतरी पटींनी रक्कम खर्च करायला लागतेय्. म्हंजे परत गावचा सारा गावावरच खर्च व्हायला स्वातंत्र्याची पन्नाशी उलटावी लागेल असं म्हणायला हरकत नाही.

शिवाय खेडेगावातनं असे इनकम टॅक्स भरायला लागेल असे सधन शेतकरी किती? त्यांची टक्केवारी काय? तसंतर शहरातनंदेखील हा टॅक्स भरणाऱ्या लोकांची टक्केवारी काय? अन् हे जे सगळे दर महिन्याला कोकणात मनीऑर्डरी पाठवत असतात, त्यांची पाळंमुळं खरंतर अजून गावातच आहेतच की.

अन् आणखी एक सवाल आहेच. शहरात कारखान्यातनं तयार होणाऱ्या वस्तूची बाजारातली किंमत ठरवताना काय काय गोष्टी लक्षात घेतात? लागलेलं भांडवल. त्याच्यावरचं रास्त व्याज. कच्चा माल. मजूरी. वाजवी नफा. अन् घसारा. शिवाय मग धंदा वाढवण्याकरता बाजूला काढून ठेवायचे पैसे. कच्च्या मालाचे भाव वाढतील म्हणून केलेली तरतूद. मजूरी वाढली तर त्याकरतापण. वाहतूक. किरकोळ विकणाऱ्याचा वाजवी नफा. अशा एक ना हजार गोष्टी.

धान्याचे भावपण असेच ठरू द्यायची आपली तयारी आहे का? म्हंजे आजच्या बाजारभावानं जमिनीची किंमत. तिच्यावरचं रास्त व्याज. घसारा. बियाण्याचा खर्च. खताचा खर्च. जगता यावं इतकी मजूरी अवजारांची किंमत.व्याज-घसारा. वाहतूक खर्च. बैलजोडीचा खर्च. दुष्काळाकरता तरतूद. अन् मग ह्या सगळ्यावर रास्त असा दहा टक्के म्हणा की पाच टक्के म्हणा नफा. हा सगळा खर्च पिकलेल्या धान्यावर लावायचा. मग यईल ती ठोक न् किरकोळीची किंमत. आहे कुणी तयार?

खरी गोष्ट अशी की आज आपल्याला धान्य मिळतं ते 'सब्सिडाइज्ड' असतं. ही 'सबसिडी' मोजतो ते धान्य पिकवणारा माणूस. विशेषत: स्वत:ची जमीन नसलेला शेतमजूर. त्याच्याजवळ उचलून देण्याइतके पैसे नसतात हे सगळ्यांनाच ठाऊक आहे. म्हणून आम्ही एक युक्ती काढलीय्. त्याला मजुरीच कमी द्यायची. त्यानं पोट बांधून काम करावं. धान्य पिकवावं. अन् आम्हाला ते स्वस्त द्यावं.

ही तशी निव्वळ हिशेबाचीच मखलाशी झाली ना? अशी हिशेबाचीच मखलाशी आम्ही शिकलेसवरले शहाणेसुरते लोक दरेक बाबतीतच करतोय्. हे कदाचित् आम्ही विलायतेतनं उचललं असेल. पण यंत्रांवर दरसाल दहा टक्के घसारा लावायची जी पद्धत आहे तिला

काहीएक शास्त्रीय—म्हजे सरळ साधं पटणारं कारण नाही हे गुन्नार मिर्डाल-साहेबाला ' एशियन ड्रामा 'ची जुळवा-जुळव करताना दिसून आल. छप्पन्न जणांना विचारून पाह्यलं. पण पटणारं उत्तर कुणालाच देता आलं नाही. कांही ताळमेळ बसणारा हिशेब मांडून दाखवता आला नाही. ज्याचं त्याचं म्हणणं एवढंच की—रिवाज आहे !

तर अशा एकेक गोष्टी आम्ही इथं राहून बघतो. वाचतो. ऐकतो. आमचे अन् आमच्याच देशातल्या बाकीच्या लोकांचे संबंध काय आहेत ? आहेत का तुटले आहेत ? हेही धड कळेनासं झालंय्. आम्हीही ह्या गोष्टीचा धड विचार करत नाही. अन् सांगणारंपण कुणी नाही. आम्ही ही मुंबईतली किंवा इतर शहरातली सामान्य माणसं. ही खडी फोडणारीपण सामान्य माणसच अन् दुष्काळ आलाय् तो देशभरच आलाय्. पण तरी त्यांच्यावर जितका प्रसंग आलांय् तितका तर काही आपल्यावर आलाच नाही. तर मग नेमका संबंध काय त्यांचा आमचा ?

फार पूर्वी वाचलेली एक गोष्ट अलीकडे नेहमी नेहमी आठवायला लागलीय्. गोष्ट स्वातंत्र्य मिळायच्या आधीची आहे. गोष्ट आहे खूप मोठ्ठी. चांगली दीडशे वर्षं चालली होती ती. त्या गोष्टीचं तात्पर्य सांगितलं होतं दादाभाई नौरोजींनी. आमच्या आधीच्या पिढीतले लोक दादाभाईंना पितामह म्हणायचे. आम्हाला त्यांचं नांव आपलं अंधुकअंधुकच माहित. तर ह्या दादाभाईंचा तसा इंग्रजी राजवटीवर अन् इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास. पण त्यांच्याच लक्षात आलं, की ह्या देशातल्या गरीबीला इंग्रजच जबाबदार आहेत. अन् तसं त्यांनी सगळ्यांना सांगूनपण टाकलं.

इंग्रजांनी सगळ्यात मोठ्ठा गुन्हा केला तो असा की खेड्यापाड्यातले साधेसुधे लोक जे पिढीजाद धंदे करत आले होते अन् ज्याच्यावर त्यांचं जगणं अवलंबून होते—ते सगळे धंदे इंग्रजांनी अजिबात बुडवून टाकले. आपला स्वतःचा धंदा नीट चालावा म्हणून. आपल्या मालाला हिंदुस्थानच्या बाजारात वाव मिळावा म्हणून. म्हंजे मोंगल बादशहांना देखील जे जमलं नव्हतं ते साहेबानं करून दाखवलं.—असं दादाभाईंचं थोडक्यात म्हणणं.

पण कुठ—दादाभाईंचं हे म्हणणं तर आज आपल्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या वाचनातपण येत नाही. इंग्लडमधली औद्योगिक क्रांती कशीकशी झाली हे तो वाचतो. पण त्याचे परिणाम इकडे गरीब हिंदुस्थानात काय झाले हे त्याला कुणी शिकवतच नाहीत. लहान पोरांनादेखील शिकवतात ते हे—की मुंबईला कापडाच्या गिरण्या जास्ती का ? शास्त्रीय कारण द्या. शास्त्रातलं

## मोगलांनादेखील जे जमलं नव्हतं

कारण काढून दिलं की तीनचार मार्क पक्के. कारण असं शिकवलेलं असतं--की मुंबईची हवा दमट आहे म्हणून. पोरगं बिचारं पाठ करून ठेवतं. तीन मार्कांकरता. आम्हीपण केलं होतं. आता स्वातंत्र्य मिळाल्यापासनं मात्र मुंबईत एकही नवी गिरणी निघाली नाही. उलट होत्या त्यांच मरायला टेकल्या. अन् तिकडे अहमदाबादेला धडाधड नव्या गिरण्या निघाल्या. चालल्याही. काय शास्त्रीय कारण ह्याचं? की अहमदाबादेची हवा कोरडी आहे?

हे असलं शास्त्रीय म्हणून शिकवत राहतात. दादाभाईंचं म्हणणं काही शिकवत नाहीत. प्रत्यक्षात काय झालं ते काही शिकवतच नाहीत. का म्हणून? असं तर नाही ना की खेड्यांतल्या लोकांचे धंदे बुडवायचं साहेबाचं कामच आम्ही पुढं चालवून राह्यलो आहोत? हेच तर नाहीत ना आमचे न खेड्यांचे संबंध?

आम्ही असंही ऐकतोय् की ही जी दुष्काळी कामं चाललीयत, ह्यातनंपण काही चांगल्या गोष्टी बाहेर पडणारायत. अगदी दुष्काळ ह्या वरदानच ठरला असं म्हणायची पाळी येणाराय्. म्हंजे नीट रस्ते बांधूनबिधून होतील. कोकण रेल्वेही तयार होऊन जाईल. पुढं पाऊस पडून गेला की ह्या सगळ्या गोष्टींचा किती चांगला परिणाम होईल ह्याचाच विचार करा.--अस कुणीकुणी म्हणतंय्.

ह्या भाषेचीही आता भीती वाटते. कारण अगदी हीच भाषा ब्रिटिशपण वापरत होतेच की.--आम्ही हिंदुस्तानात इतकी हजारो मैल रेल्वे बांधली. इतके रस्ते बांधले. पोस्ट न् तारखातं सुरू केलं.--आता ह्या सगळ्या सुधारणा होत्याच की! पण ह्या सगळ्या सुधारणा साहेबानं हिंदुस्तानचं हित मनात ठेवूनच केल्या होत्या असं काही टिळकांना वाटलं नाही. गांधींनापण वाटलं नाही. कारण त्यांना पक्कं माहीत होतं की ह्याच रेल्वेनं हिंदुस्तानचा कच्चा माल हिंदुस्तानच्या बंदरात येणाराय्. तिथनं पुढं तो विलायतेला जाणाराय्. विलायतेत त्याचा पक्का माल तयार होणाराय्. अन् तो परत ह्याच वाटेनं हिंदुस्तानात येऊन इथला बाजार काबीज करणाराय्. अन् ह्या सगळ्या प्रकारात देश आणखीच गरीब होणाराय्.

रेल्वे काय न् रस्ते काय--ही झाली निव्वळ दळणवळणाची साधनं. त्यांचा उपयोग आम्ही करू तसा होतो. आता आमचे न् खेड्यांचे संबंध जर हिंदुस्तानच्या न् विलायतेच्या सबंधांच्यासारखेच रहात गेले तर मग कोकण रेल्वे झाल्यावर काय होईल कोण जाणे. कोकणच्या आंब्याला मुंबईची चटक लागली अन् तिथनं पुढं त्याला परदेशची वाट सापडली तर कोकणातल्या कुणब्याला रायवळ आंबादेखील चाखायला मिळणं कठीण होऊन बसेल.

तर आतातरी आम्ही काही विचार करायला हवा. निदान एवढ्यासाठी की आम्हीदेखील तसे काही पिढीजाद मुंबैतच नव्हतो. आमचेही कुणी बापजादे असेच देशावरनं किंवा कोकणातनं किंवा

आणखी कुठनंतरी असेच ह्या-ना-त्या कारणानं मुंबईत येऊन धडपडले असतील. अन् आता आम्ही इतके इथले होऊन बसलोय् की आधीचं काय होतं तेही विसरलो अन् आत्ता काय आहे ह्याचापण विचार केला नाही. तर आतातरी कुणीतरी सांगा की ह्या दुष्काळात होरपळणाऱ्या न् तसंच ह्या झोपडपट्ट्यात सडणाऱ्या माणसांचे न् आमचे संबंध काय आहेत ? कसे असायला हवेत ? काहीतरी तर रूजवात घालून द्यायला पाह्यजे त्यांची-आमची ?

उभ्या पंचवीस वर्षांत हे आम्हाला कुणीच सांगितलं नाही. पण नाही, अगदीच कुणीच सांगितलं नाही असं नाही. १९६९ साल. खरंतर सत्तरच. खान अब्दुल गफारखान मुंबईत आले होते. परतीच्या वाटेवर नगरपालिकेतर्फे त्यांना मानपत्र द्यायचा कार्यक्रम होता नागरिकांना खुला. तर इतरांच्यासारखं आम्हीही गेलो. कुतूहलानं बघूया तरी काय म्हणतायत ते म्हणून. सत्तेचाळीस सालानंतर सतरा वर्षं पाकिस्तानच्या तुरुंगात काढलेला माणूस. तर काही नवीनच ऐकायला मिळेल कदाचित् म्हणून गेलो.

तर हा गृहस्थ निघाला सच्चा पठाण. साधा सरळ. अडाणी वाटावा इतका. अन् आत-बाहेर न करता ह्या पठाणानं भलत्याच गोष्टी सुनावल्या.

पठाणांचा हा बादशहा म्हणाला, --"आम्ही ज्या स्वातंत्र्याकरता लढलो ते हे नव्हे. आज तुमची काय हालत आहे ? देशात पुरेसं धान्य होत नाही. तुम्ही जगातनं भीक मागून ते आणता. पोटाला काहीतरी घालायलाच हवं तेव्हा धान्याची ही भीक एक मी समजू शकतो. पण तुम्ही धान्याबरोबरच पैशाचीपण भीक मागता ! तीही जपानसारख्या तुमच्यापेक्षा कितीतरी पटींनी लहान अशा देशाकडनंदेखील ! अन् तुमच्याकडे परिस्थिती अशी की उचउंच आलिशान इमारती एकीकडे न् आजूबाजूला झोपड्या. वही पुरानी टूटीफूटी झोपडी और वही पुरानी फटी चंपल !"

म्हंजे हे तर जवळपास वीस वर्षांनी देशात आलेले अन् ह्यांना इथं काहीच बदल झालेला दिसला नाही. त्यांचं बोलणं मधेच कुणी थांबवलंही नाही. म्हंजे मग हे सगळं खरंच का काय ? अन् तरी हे सगळं असंच चालू राहचंय् ? एकीकडे उंचउंच इमारती न् आजूबाजूला झोपड्या ?

आम्ही नोकरदार माणसं. दर महिन्याला आम्ही ठराविक पगार कमावतो. त्यातच भागवतो आमच्या मालकाला खूप पैसे मिळतात. त्यातनं थोडसे तो दरमहा आमच्या हातावर ठेवतो. म्हंजे मालकाच्या समोर आम्ही गरीबच. मालकान आम्हाला पगार दिला की पैसे श्रीमंत माणसाकडनं गरीबाच्या--म्हंजे--आमच्या हातात

# और वही पुरानी फटी चंपल

घेतात. आता ह्या पैशाचं आम्ही काय करतो ? गरजेच्या वस्तू घेतो. पैसे मोजून. ह्या वस्तू आम्ही आमच्यापेक्षा गरीब असलेल्या माणसाकडन घेतल्या तर पैसे त्याच्या हातात येणार. पण आम्ही पडलो इमानदार ! आम्ही आमच्या मालकालाच किंवा त्याच्या आणखीकुणा भाईबंदाला हे पैसे देतो न् त्याच्याकडनंच माल खरेदी करतो. आमचा मालक जास्तीजास्ती गबर होत जातो. त्याची इमारत जास्तीजास्ती उंच होत जाते. अन् खेड्यातल्या माणसाचं काम जातं. तो जास्तीजास्ती गरीब होत जातो. नाइलाजानं त्याला मुंबई गाठावी लागते. अन् आमच्या मालकाच्या उंच हवेलीशेजारी एक झोपडी तयार होते.

–असं तर नाही ना होत ?

जाऊ द्या. आपल्याला काही कळे-नासं झालंय्. पाऊस पडला नाही ही झाली अस्मानी आपत्ती. त्याचा दोष कुणावरच नाही. असं आम्ही म्हणतो. पण गावातले लोक आणखीपण काही म्हणतात. ते म्हणतात–पाप फार झालं म्हणून हे संकट आलं.

एकेक वेडगळ समजुती असतात झालं. काय पाप झालं, कुणी पाप केलं असं जर त्यांना विचारायला गेलं तर काहीदेखील सांगता यायचं नाही त्यांना. नुसतंच म्हणतील–पाप झालं. असली वेडगळ माणसं !

पण असं बघा की त्यांचे धंदे बुडव-णारे हे जे धंदे इकडे शहरात सुरू केले गेले, त्यांना कच्चा माल हवा म्हणून ही जी जंगलं काटली गेली, पैशाअड-क्याचे व्यवहार आम्ही शहाणे म्हणून कसे नीट आमच्याच ताब्यात ठेवले, बाजारभावाच्या गफलती करून त्यांचा कच्चा माल स्वस्तात पाडून घेऊन त्यांच्या बोकांडी कशा महागड्या गोष्टी लादल्या, त्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन कशी आमच्या पथ्यावर पडणारी कामं करून घेतली त्यांच्याकडनं कमी मजुरीवर, त्यांचं धान्य कसं आम्ही म्हणू त्या भावानं सक्तीनं विकायला लावलं अन् आमच्या वस्तूंच्या किंमती मात्र कशा आम्ही स्वतःच्याच ताब्यात ठेवल्या, ह्या शहरांचे सारे लाड केले, त्यांनाच संस्कृतीची केंद्रहि बनवलं अन् तिकडे ह्या लोकांच्या पिण्याच्या पाण्याचीदेखील धड चौकशी केली नाही !–ह्या सगळ्या गोष्टींना काही नावच द्यायचं झालं तर काय द्यावं लागेल ? पापच ना ?

अन् आज आम्ही दुष्काळात त्यांना सहानुभूति दाखवतोय्. पैसे गोळा कर-तोय् आमच्यातले काही तर खुद्द दुष्काळानं गांजलेल्या लोकातच जाऊन कामाला लागलेयत. हे सगळं खरं. पण हे सगळं कुठपर्यंत ? पाऊस पडेपर्यंत ! मग पुन्हा ये रे माझ्या मागल्या !

अन् हे सगळं जर असंच चालू राह-णार असेल तर मग पुन्हा चार वर्षांनी, पाच वर्षांनी केव्हातरी पण नक्की दुष्काळ पुन्हा पडेल.

● ● ●

आंतरिक भावसामर्थ्याने रसरसलेली सच्ची कविता

# योगभ्रष्ट

केशव मेश्राम

प्रत्यक्ष आयुष्य आणि काव्यात्म अनुभव यात फरक असल्याचा कृतक संकेत स्वीकारणारी कविता आता मागे पडली आहे. आपल्या वास्तवातील भाव-कल्लोळ शब्दबद्ध करणारी कविता प्रथम श्री. नारायण सुर्वे यांनी लिहिली. त्यांच्या 'ऐसा गा मी ब्रह्म' आणि 'माझे विद्यापीठ' या दोन्ही संग्रहातील कविता उपरोक्त एकात्मतेचा खराखुरा पुरावा म्हणावा लागेल. ह्या कवितेचे व्यापक आकलन आणि सोपेपणा, थोडचाफार फरकाने कलावंताचेच आयुष्य जगणाऱ्या; प्रत्येक रसिक वाचकाला हलवून गेले. पण कोणतीही आविष्कार पद्धती टवटवीत आणि नवी राहावयाची असल्यास तिच्यात बदल हा घडावाच लागतो. म्हणूनच आत्यंतिक व्यक्तिगत अनुभव प्रकट करणारी कविता जशी दुर्बोध होत गली व पुढे तेही अंगवळणी पडले; त्याचप्रमाणे असा जीवनोन्मुख अनुभव प्रकट करणारा कवीही त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीप्रमाणे आकलनास अवघड होऊ लागला. श्री. वसंत आबाजी डहाके या नव्या कवीचा 'योगभ्रष्ट' हा पहिलाच कवितासंग्रह वाचताना याचेच प्रत्यंतर येते. अर्थात कलावंत अस्सल असेल आणि आपल्या काव्यनिर्मितीबाबत जर तो काही निष्ठा मानत असेल तर त्याच्या कवितेला जिवंत आंतरिक उर्मी असते. आणि हे आंतरिक भावसामर्थ्य इतके रसरशीत असते की ह्या दुर्बोधतेच्या कवचावर मात करून ती जाणवत जाते. 'योगभ्रष्ट'मधील ऐंशी कवितांच्या रसग्रहणातही हाच अनुभव येतो.

आयुष्यातल्या पडझडीतही आपल्या असण्याची मातब्बरी प्रत्येक माणसाप्रमाणे कलावंतालाही असते. इतकेच नव्हे तर तिची तीव्रता जीवनोन्मुख कलावंताच्या बाबतीत अधिक असते. आपले स्वतःचे अस्तित्व, आपल्या व्यक्तिमनाला पडणारे पिळे यात त्याला सर्व मानवी मनाची चैतन्यमयताच पणाला लागल्यासारखी वाटते. म्हणून त्याच्या शब्दाशब्दातून तो क्षणाक्षणाच्या

ओळीने हेलकावत उमलणाऱ्या किंवा तात लागून व्याकूळतेने हवरणाऱ्या आपल्या अस्तित्वासाठी प्रखर झुंज देतो. अनेक पातळीवर ही प्रक्रिया चालू राहते. डहाके यांच्या तीन दीर्घ कविता या दृष्टीने बघता येतील.

## प्रदीर्घ चिंतनाचा सूर

'योगभ्रष्ट' मध्ये डहाके यांच्या प्रदीर्घ चिंतनाचा खोल सूर लागलेला आहे. तशी ह्या कवितेतली वर्तुळे आणि अंतर्वर्तुळे परिचित आहेत. पण ह्या ओळखीच्या पाण्यातही अनोळखी धुके दाटलेले आहे. हे धुके आहे कविमनातल्या किंवा मानवी मनातल्या अगम्य गुंतागुंतीचे. उध्वस्त मनोविश्वाची कातरता डहाकेंना ढवळून काढते. ह्या भरकटणाऱ्या वादळी लाटा कवीच्या मनाच्या कुंडात मावेनाशा झालेल्या दिसतात आणि त्यातूनच कवी समवेदनापीडितांचा शोध घेतो. "रस्त्याच्या कडेला मरून पडलेली नग्न भिकारीण, उन्हाने वाळून गेलेले बैल, रस्ते दुरुस्तीच्या कामावरल्या मजुराची विकलांगता हे कवीला दिसते आणि जाणवते. त्यातूनच ...अंतर्बाह्य उन्हाळा."

बाहेर राक्षसाचा डोळा.

...सूर्य दिवस चरचरा कापीत जातो." अशा ओळींची अर्थप्रतीती नव्या आशयाने उजळून निघते. 'कविता फुटू शकत नाहीत. चित्रेही, काळोख, चक्रे, आवर्तने." अशा कोंडीत कवी घुमसू लागतो आणि मग एक दाहक सत्य काव्यरूप घेते. आपणही जनावरेच आहो. आपणही जन्मभर उन्हातच तापत राहतो." 'सर्वत्र पसरलेली मुळं' ह्या कवितेच्या आरंभापासून आतापर्यंत त्यांनी 'वेटिंगरूम' ही प्रतिमा उपयोजिली आहे. आपले अस्तित्व आणि जगाचा अफाट पसारा यातल्या विरोधातून कविता गतिमान झालेली आहे. "ओसाड ओसाड वेटिंग रूम आणि एकाकी मैना" असे चित्र ते मांडतात. "कोरड्या डोळ्यांनी कोरड्या जगाकडे कोरडेपणाने पाहात," – बसताना एकाच वेळेला जिव्हाळा आणि पराकोटीचा द्वेष मनात जागवतात. ह्या 'अनौरस वेटिंगरूमच्या तजाड फरशीवर' ह्या गळतीच्या भावनेच्या आहारी गेलेले कवीचे मन मरगळीचा अनुभव प्रक्षेपित करताना दिसते. पण या कवितेत मर्ढेकरांच्या 'फलाटदादा'ची, मनोहर ओकांच्या 'आयत्या कवितांची, विंदा करंदीकरांच्या चिंतनाची आणि 'कोसला'तील रसरसत्या व्यक्तित्वाची अटळपणे आठवण होते. त्यामुळे निर्मितीच्या दृष्टीने ही कविता डावी वाटते.

'ओस झाल्या दिशा' ह्या तिसऱ्या दीर्घ कवितेत डहाके यांनी अनेक गोष्टी समर्थपणे साधलेल्या दिसतात. कवितेचे त्यांनी सात उपभाग केले आहेत. ह्या सात छदातून विकलांग आणि दुभंग व्यक्तित्वाची आदिम कहाणी ते ऐकवू लागतात. 'प्रत्येक वस्तूशी सुरूच असणारा सनातन संघर्ष' त्यांना अस्वस्थ करतो. नियतीचे 'पिवळे गढूळ डोळे' खुरपतात आमच्या पाठी.' तरीही निर्मितीच्या क्षणाचा सोस खुणावत राहतो. जमेल तसे

कवितेला रंगरूप येते. डाहाके लिहितात, 'आम्ही गातो असंबद्ध गाणी आणि आमचा सत्रस्त शरीरे विझवतो कवितेत.' ह्यातूनच सोशिकतेचा व समंजसपणाचा सूर लागतो. 'मी निमूट सोसतो भयाण घावासारखं प्राप्त झालेलं वास्तव' कारण 'जाणार आहेत आमच्याच छातीमधून भविष्यातील लक्षावधी युगांचे महामार्ग.' या श्रद्धेवरच ही सोसणी. हा ठणका.

### तीन दीर्घ बोलक्या कविता

डहाकेंच्या ह्या तीन दीर्घ कवितांनी ह्या 'योगभ्रष्ट'मधील कवितांच्या एकशेपन्नास पृष्ठांपैकी पंचावन्न पाने व्यापली आहेत आणि कवीच्या व्यक्तित्वाची, चिंतनाची झेप व आवाका, त्याची प्रतिके, त्याची लोकविलक्षण प्रतिभानिर्मिती व जीवनाभिमुखता आणि मर्यादा या सगळ्या दृष्टीने या तीन कविता खूप बोलक्या व परिपूर्ण उतरल्या आहेत.

प्रदीर्घ चिंतनाच्या नागमोडी रेखाकृतीवरून लवलवत जाणाऱ्या या कवितांचा आणखी एक प्रतीत होणारा खास गुण आहे. तो हा की, कवीला जे जे आपले वाटते ते ते सारे जसास तसे त्याला दुसरीकडे सापडत जाते. सापडण्याची शक्यताही जाणवते. 'आत जळतंय एक शहर' ही प्रतिमा खूप सूचक आणि भावतरल आहे. इतिहासाच्या व मानववंशशास्त्राच्या अभ्यासकांनी १९२४ मध्ये मोहोंनजोदारो चे उत्खनन केले. सर जॉन मार्शल, व्हिलर आणि मॅके यांच्या प्रयत्नांनी जशी एक दिशा मिळाली, तसे हे मनातले चेतनाशन्य नगर, डहाके शब्दान्वित करतात. डोक्यातला सूय, डोळ्यातले पोकळपण आणि चौफेर पसरलेले आकाश अशा वेधकपणे ही सगळी शोधभूमी समोर उलगडली जाते. 'हाडे हाडे...या हाडांना सुंदर वस्त्रात गुंडाळायचे...एकदम अश्लील!' असे अरूपाचे रूप डहाके पकडण्याची धडपड करताहेत आणि समर्थ व जिद्दीचा कलावत अशाच तरल क्षणांचा वेध घेत असतो.

वसंत आबाजी डहाके यांच्या दीर्घ कवितांप्रमाणेच त्यांच्या 'योगभ्रष्ट'मध्ये कितीतरी समर्थ अशा छोट्या कविताही आहेत. 'फ्रान्स काँफ्का, डिसेंबर '१९६७' ही एक कविता. चित्राच्या आणि रंगतकाकीच्या परिभाषेत त्यांनी उभे केलेले काफ्काच्या आविष्काराचे दृश्य—

'गळलेत महापापाचे ढलपे, चमचमते खवले पुण्याचे
आणि उघडी पडलीत आत्म्याची काळीभोर भोक'

किंवा कलावताच्या चिरशापित रस्त्याप्रमाणे होणाऱ्या अटळ शोकांतिका आणि अफाट विश्वचक्रात किंवा घडामोडीत कलावंताची उपेक्षा चितारताना 'एक अफाट बेढब बुटका हात शोकगीत लिहितो शापित कवटीवर या रस्त्याच्या' असे प्रभावी दृश्य ते कोरतात.

आमचे सलग जन्म, खुळ्या दैवतासारखा, बेईमान भूमीच्या शोधात,

जन्म, माझ्या लोकांचा आकांत, मातीचं शास्त्र व रक्तवाहिन्या आटताहेत' या कविताही अत्यंत आशयसंपृक्त आणि कवीमनातील व्यापक सूत्रांचे प्रभावी दिग्दर्शन करणाऱ्या आहेत. वैभवाच्या मागे लागून 'आम्ही बियांनी भरलेली गचाळ माणसं', 'दाराशी मोटारीची खुळी गाढवं' बांधण्यात पुरुषार्थ मानतो. परंतु मनासारखे दान पडत नाही. 'अनाकलनीय अस्तित्वाचे' जाते घरघरत राहते. 'शिव्या देता याव्या म्हणूनच समाजनिर्मिती झाली आहे.' अशा भाबड्या समजुतीने 'आमचे सलग जन्म' अंकुरतात आणि मातीआड होतात. सर्वत्र घोंघावणारे हे भावकल्लोळात निथळणारे क्षण; डहाके नेटकेपणाने याच कवितांतून बदिस्तपणाने टिपताना आढळतात.

आत्मशोधाच्या वणवणीत भरकटणाऱ्या या कवीचे भावजीवनही काही मोजक्या कवितातून प्रतिबिंबित झाले आहे. काही बाबतीत ते सांकेतिकतेचा आश्रय घेताना दिसतात 'स्वगत' सारखी कविता खूप सांकेतिक वाटते. तशीच चंद्रसूर्यातून जाणवणारी प्रेयसीची रूपे, वात्सल्य, मातृत्व याही बाबतीत डहाके एकाच परिघात घोटाळताना दिसतात. तरीही काही खूप नितळ आणि नीटस प्रेमकविता डहाक्यांच्या प्रतिभेने साकार केल्या आहेत, 'तुझं एकदाचे डोळे', 'एक अमानवी युगुल' 'दोन नुस्ते चेहरे', 'सर्वातून सुटा होऊन' आणि 'भयाणरिक्त आकाशाखाली' ह्या त्या कविता होत. 'वैरागी एकांतात' सुटा होऊन राहणाऱ्या वास्तववादी, कणखर आणि तरीही भावतरल स्पंदनशील मनाची ओळख, डहाके सामर्थ्याने पटवितात.

## काही सामान्य कविता

ह्या चांगल्या कवितांच्या जोडीला काही सामान्य कविताही आहेत. ह्या कवितात कवीच्या मनात एक वैचारिक कल्पनाबीज अंकुरलेले दिसते. आणि ह्या अर्थकच्च्या चतुरबीजाभोवती 'काव्य' म्हणून शद्बकुंज उभवला जातो. अर्थात बारकाईने वाचल्यास आणि डहाक्यांच्या प्रभावी कवितांतून आणि दीर्घचिंतनातून अभिव्यक्त झालेल्या अभ्यस्त मनाच्या गंभीर तुलनेने ह्या आस्वादिल्यास, त्यांचा अपुरेपणा, प्रकर्षाने स्पष्ट होते. 'विशेषणे', 'फणा', 'हाक', 'किटक', 'लोकशाही वगैरे', 'अभाग्याचे भाग्य', 'हात', आणि 'स्पर्श', ह्या कविता या पद्धतीच्या आहेत, असे मला वाटते.

डहाके यांची कविता वेधक प्रतिमांचा खूप आश्रय घेताना दिसते. 'किनारे, रस्ते, सूर्यफूल, योद्धा, शून्य नगर, डोळे, ओस दिशा, सापळ', अशा काहींना स्वतंत्र 'डहाकेस्पर्श' झालेला आहे. मराठीच्या नव्या स्वतंत्रप्रज्ञ कवींच्या यादीत डहाकेंचे नाव निर्विवादपणेच नोंदावे लागेल. इतकेच नव्हे तर त्यांची अनेक इतरही वैशिष्टये प्रकट झालेली दिसतात. अत्यंत गतिमान पद्धतीने व विशेषण-विशेष्याच्या शैलीने कवितेच्या अंतरंगात जोडशद्बाची पेरणी करण्याची त्यांची आवडती लकब आहे.

गढूळ सूर्योदय, मलूल सूर्यास्त, घोगरा सूर्य, कूकणारी पाखरे, तोतया हुतात्मा, खुरटे पापभीरू, बैरागी एकांत, मर्त्य सूर्य, झिजलेले योद्धे; अशा काही शद्बांनी त्यांनी कविता वेगवान केलेली दिसते.

आविष्काराच्या या वैचारिक व आंतरिक उर्मीतूनच काही नवी सुभाषितवजा अवतरणे डहाके सहजगत्या निर्माण करू शकतात. प्रतिकात्मकता व सुभाषितनिर्माणक्षमता या गोष्टी एकरूपतेने ते उपयोजितात. 'पाकळचा झडलेलं सूर्यफूल असं आयुष्य, महापुरात बुडत चाललेलं शहर, उंच इमारतीची छिनाल पिवळी बुब्बूळं, स्वैर लैंगिक व्यवहार लादलेल्या करासारखे' अशा संमिश्र अभिव्यक्तीतून अर्थांची कितीतरी वलये ते निर्माण करतात.

'योगभ्रष्ट' ही नव्या कवितेची एक चढतीवाढती कमान म्हणावी लागेल. त्यातच काही विवक्षित शब्दप्रयोगांची प्रादेशिक शब्दांचे व बोलींचे चैतन्यही त्यांच्या काव्यात्मतेला पूरकच ठरले आहे. 'गैदी माणूस, साठाचे फटकारे, पोतराज, च्युतिया', हे बोलीतील प्रादेशिक रंगरूप घेऊन येणारे शद्बही भेटून जातात.

नकारात्मक अस्तित्व असा विलक्षण संघर्षच हा कवी शद्बांतून प्रस्फुटित करताना आढळतो. अस्तित्वाच्या खुंटीला गच्च बांधल्या गेलेल्या रसरसत्या मनोवृत्तीचा हा प्रभावी आविष्कार आहे... खरा; पण अनुभवाला येणारे नकारात्मकच सगळे तो बेधडकपणे नोंदतो आहे. त्यामुळे नकारदर्शकांची खूप गर्दी 'योगभ्रष्ट 'ला सामोरी येते. 'निर्विकार, निर्हेतुक, निर्वात, निःशद्ब, निर्मनुष्य, निष्क्रिय, ओसाड, अभाग्य, अंधार' अशा शद्बांची येथे लयलूट होणे स्वाभाविकच झाले आहे. आणि हा आपल्या अंगाने जाणारा कवी असल्याने व अस्तित्वाच्या हरवलेपणाचे हे आदिसूत्र असल्याने, विरोधातून तो सारे साकार करू पाहतो आहे.

नव्या नवकवितेचा संभाव्य चेहरा आता हळूहळू स्पष्ट होत चालला आहे. त्याचे एक रूप स्वतःच्या मार्गाने जाणाऱ्या, मर्ढेकरी पद्धतीसारखी स्वयंदृष्टी असलेल्या श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांच्या 'डिसेंबर आणि इतर कविता' या संग्रहातून पुढे आले आहे. तर दुसरे आता 'योगभ्रष्ट' या वसंत आबाजी डहाके यांच्या रसरसत्या शद्बस्त्रोतातून जाणवते आहे. असली व्यक्तिमत्त्वे संथपणे; पण निश्चितपणे पूर्णतेकडे वाटचाल करीत असतात. श्री. डहाकेंना त्याबद्दल मुक्त दाद दिलीच पाहिजे. □

योगभ्रष्ट
वसंत आबाजी डहाके.
मौज प्रकाशन गृह.
पृष्ठे १५०.
किंमत १० रुपये.


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
SATHE
MALTex
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

एक स्तुत्य उपक्रम

# महाराष्ट्रीय कलोपासकांचे एकांकिका प्रयोग

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासक ही पुण्यातील एक प्रमुख नाट्यसंस्था. राज्य सरकारच्या नाट्यस्पर्धांमध्ये विविध स्तरावरची पारितोषिके मिळवणारी मान्यवर संस्था. नाट्यस्पर्धांच्यामध्ये भाग घेऊन आपल्या कार्याचे समाधान न मानता नवनवीन उपक्रम हाती घेणारी अशी ही संस्था!

ही संस्था एप्रिल महिन्यापासून दर महिन्याला एका एकांकिकेचे चार प्रयोग सादर करणार आहे. महिन्यातल्या प्रत्येक बुधवारी रात्री ९॥ वाजता, प्रतिभा मुद्रणालय या ठिकाणी प्रयोग होतील. असा कार्यक्रम वर्षभर चालणार आहे.

एका अर्थाने हा अभिनव, स्तुत्य असा उपक्रम आहे. यापूर्वी हौशी नाट्यसंस्थांनी एकांकिका सादर केल्या आहेतच. विशेषतः मुंबईच्या 'रंगायन' ने आणि पुण्याच्या पी. डी. ए. ने हा उपक्रम हाती घेतला होता. पण त्यांचा संपूर्ण वर्षाचा असा कार्यक्रम नव्हता. त्यात सातत्य नव्हते. पण नाविन्य होते. या दोन्ही संस्थांनी मोठी थिएटर्स न घेता आपले एकांकिका-प्रयोग शाळा-कॉलेजच्या हॉलमध्ये, खाजगी हॉलमध्ये किंवा घराच्या गच्चीवर वगैरे ठिकाणी सादर केले होते. कलोपासकांचीही कल्पना तीच आहे. अतिशय छोट्या, फारशा सोयी नसलेल्या जागेत, कमीत-कमी साधनांच्या साह्याने एकांकिका सादर करण्याचा त्यांचा मनोदय आहे. या उपक्रमात रंगभूमीच्या संदर्भातील अनेक औपचारिक गोष्टींना रजा देण्याचा त्यांचा विचार आहे.

या प्रकारच्या उपक्रमाला अनेक नावांनी संबोधता येईल. 'कॉफी हाऊस थिएटर', 'स्ट्रीट थिएटर', 'इंटिमेट थिएटर' 'बेनसडे थिएटर' इत्यादी. नाव कोणते असावे, हा मुद्दा गौण आहे. पण या उपक्रमाने संस्था आणि प्रेक्षक या उभयतांना लाभ तर निश्चितच

आहे. काही दिवसांपूर्वी सौ. पुष्पा भावे यांनी ('माणूस'मध्ये) परदेशात चालू असलेल्या 'लंचटाईम थिएटर'चा परिचय करून दिला होता. त्यावेळी त्यांनी आपल्याकडे अशा प्रकारची 'थिएटर मुव्हमेंट' का नाहीत, असाही प्रश्न केला होता. त्या संदर्भात कलोपासकांचा उपक्रम हे एक मर्यादित असे उत्तर आहे; प्रयत्न आहे.

रंगभूमीचे मूल्यांकन आपण बऱ्याचवेळेला व्यावसायिक रंगभूमीवरून ठरवतो. व्यावसायिक लोक रंगभूमीला अनेक दृष्टींनी स्थैर्य आणतात. परंपरा निर्माण करतात, ही गोष्ट सर्वमान्यच आहे. पण कोणत्याही नटाचा–दिग्दर्शकाचा प्रेक्षकाचा एक कलात्मकस्वरूपाचा प्रवास असतो. अभिरुचीचा प्रवास असतो. त्या अभिरुचीच्या प्रवासात हौशी नाट्यसंस्थांनी केलेल्या नाट्यकार्याला विशेष अर्थाने महत्त्व आहे. हौशी नाट्यसंस्थांना अनेकविध स्वरूपाचे 'प्रयोग' (Experiments) रंगमंचावर करणे शक्य असते. ते त्यांच्याकडून अपेक्षित असते. तसे प्रयोग करता करताच प्रेक्षकांची अभिरुची निर्माण करणेही शक्य होते. त्यातून तयार होणारा प्रेक्षक व्यावसायिक रंगमंचावर होणाऱ्या प्रयोगांना सामोरा जाऊ शकतो. नट-दिग्दर्शक यांनाही अनेक 'प्रयोग' करण्याची संधी हौशी स्तरावरच अधिक मिळते. आपला कस पणाला लावता येतो. अनेक गोष्टींचे शिक्षण आपले आपल्यालाच घेता येते. धडपडत नवी वाट शोधता येते. नवी दिशा सापडू शकते. प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीपर्यंतच्या प्रवासात हे 'प्रयोग' म्हणजे 'एक पूल' आहेत. म्हणूनच ते सतत होत राहिले पाहिजेत.

कलोपासकांच्या नवउपक्रमात प्रेक्षकांचा सहभाग नेमका किती आहे, याचा निश्चित अंदाज मला नाही. पण अपेक्षा अशी आहे की तो सहभाग



अधिक प्रमाणात असावा. प्रेक्षकाला बरोबर घेऊनच रंगभूमीचा प्रवास सुखाचा होणार असतो. याचा अर्थ प्रेक्षकाच्या आहारी जायला पाहिजे असे नव्हे. त्याच्यासाठी केवळ विनोदी—हलके फुलके, रंजनात्मक पातळीवरच काहीतरी सादर केले पाहिजे असे नव्हे. जे नटाकडून, दिग्दर्शकाकडून सादर होईल ते प्रेक्षकाला विश्वासात घेऊन व्हायला पाहिजे. प्रेक्षकाला एखादी एकांकिका समजणार नसेल तर काही वेळेला प्रारंभीच्या निवेदनाने, एखाद्या छोटयाशा पत्रकाने, चर्चेने त्याला समजावून सांगणे अगत्याचे आहे. तो प्रेक्षक कदाचित समोर घडणाऱ्या एकांकिकेला कंटाळेल, वैतागेल. तरीही बिघडत नाही. त्याच्यावर रागावून कार्य होणार नाही. अर्थात प्रेक्षकालाही समजावण्याच्या परी आहेत, पद्धती आहेत, मर्यादा आहेत. तेथपर्यंतच तो सहप्रवास घडणार आहे.

या उपक्रमात एकांकिकेला प्रेक्षक आला आणि एकांकिका पाहून गेला एवढेच स्वरूप राहू नये. शक्य झाल्यास एकांकिका झाल्यावर किंवा अन्य सोयीच्या दिवशी त्यावर चर्चा व्हायला पाहिजे. एकांकिकेच्या संदर्भात कोणाही सामान्य प्रेक्षकाला, कोणताही प्रश्न विचारण्याची मुभा पाहिजे विशेषत: दिग्दर्शकापेक्षा नट, तन्त्रज्ञ आणि सहाय्यक यांच्याशी प्रेक्षकांचा संवाद व्हावा. कलाकारांना अभ्यासाच्या दृष्टीने ही गोष्ट उपकारक ठरेल. प्रेक्षकाला एकांकिका प्रयोगात काहूं ना काही स्थान आहे. असे कळाले (किंवा अनुभवास आले) तर प्रतिसाद वाढता राहील.

कलोपासकांनी एक वर्षाचा धाडसी उपक्रम हाती घेतला आहे. तेव्हा आत्ताच अनेक शंका काढून, भीतीदायक वातावरण निर्माण करण्याचे कारण नाही. त्यांच्या हातून काही चुका होतील, उणीवा राहतील, त्याचा हिशेब वर्षअखेरीस पाहू. एका नाटयस्पर्धेपासून दुसऱ्या वर्षीच्या स्पर्धेपर्यंत प्रवास करणाऱ्या हौशी संस्थांना हा उपक्रम म्हणजे एक नवा आदर्श आहे. उपक्रम तर सुरू झाला आहे. त्यातली पहिली एकांकिका 'सामना' माधव वझे यांनी प्रयोग रूपाने सादर केली आहे. तो 'सामना' कसा झाला, ते काही दिवसांनी मी सांगणार आहेच. पण तत्पूर्वी हौशी नाटयसंस्थेच्या स्तरावर पुण्यामध्ये नवा उपक्रम सुरू केल्याबद्दल कलोपासकियांचे आणि त्यांचे सूत्रधार श्री. राजा नातू यांचे अभिनंदन !

● ● ●

# ५४ वे मराठी नाट्यसंमेलन एक उत्सव

**मध्यंतर**

पुष्पा भावे

मराठी नाट्यपरिषदेचे वार्षिक नाट्य-संमेलन या घटनेकडे नाट्यव्यवसाया-तील कलावंत (हौशी वा व्यावसायिक) फारसे लक्ष पुरवीत नाहीत किंबहुना परिषदेच्या अस्तित्वाची जाणीव नाट्य-वर्तुळात फारशी कधीच दिसत नाही. परिषदेने नियुक्त केलेले अध्यक्षही नेहमीच नाट्यवर्तुळाशी निकट संबंध असणारे असतात असेही नाही. ठराविक प्रकारच्या चर्चा, ठराविक वक्ते, असे नाट्यसंमेलनाचे स्वरूप ठरून गेले आहे. बदलत्या काळाबरोबर बदलणाऱ्या नाट्यजाणीवांचा निरभ्र मनाने गंभीर विचार करण्याचे प्रयत्नही कधी परि-षदेने केलेले नाहीत. हौशी नाट्य-निर्मितीचा विचार करणारा सुसूत्र परि-संवाद व त्यानिमित्ताने हौशी नट-मंडळींचा मेळावा, हे पुण्याच्या 'महा-राष्ट्र कलोपासक' वा 'मुंबई मराठी साहित्य संघ' या संस्थांनी स्वतंत्रपणे केले. परंतु नाट्यपरिषदेला मात्र अशा कर्तव्याची जाण क्वचितच दिसते. रंगभूमीवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या कलावंतांपैकी फार थोडे कलावंत नाट्य-परिषदेचे सभासद असतात. गेली दोन वर्षे मात्र नाट्यपरिषदेच्या संमेलनांकडे नाट्यव्यावसायिक व रसिक प्रेक्षक–दोघांचेही अधिक लक्ष वेधले गेले होते. दोन वर्षांपूर्वी कुर्ला येथील नाट्यसंमेल-नाचे अध्यक्ष सुविख्यात नाटककार वसंत कानेटकर होते. अपेक्षेप्रमाणे नाट्या-विषयी व नाट्यव्यवसायाविषयी अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांच्या अध्यक्षीय भाष-णात उपस्थित झाले होते. याच संमेल-नात सेन्सॉर बोर्ड रद्द व्हावे असा ठरावही पसार झाला होता. परंतु नंतरच्या दोन वर्षांत मराठी नाट्य-क्षेत्रात घडलेल्या घडामोडींच्या संदर्भात मराठी नाट्यपरिषदेने या ठरावाची जबाबदारी स्वीकारलेली दिसत नाही. गतवर्षीचे नटवर्य मामा पेंडसे यांच्या अध्यक्षतेखालील कल्याण येथील संमेलन प्रत्यक्षात 'बाइंडरच्या सावली-खालील संमेलन' या नावाने प्रसिद्ध आहे. एखाद्या वादग्रस्त विषयावरील सर्वसामान्य चर्चा आणि त्या विशिष्ट क्षेत्राच्या व्यासपीठावरील चर्चा वेगळी असावी अशी साहजिक अपेक्षा होती.

परंतु कल्याणच्या वादांमध्ये वादावादीच होती; त्यातून तत्त्वबोध तर झाला नाहीच, परंतु नाट्यक्षेत्राबाहेरच्यांना नाट्यविषयक चर्चा कशा असाव्यात याची दिशाही मिळाली नाही. यंदाचे नाट्यसंमेलन वस्तुत: औरंगाबाद येथे होणार होते. परंतु दुष्काळी परिस्थितीमुळे ते साहित्य संघातच भरवायचे ठरवले. अध्यक्षपदाची निवड जाहीर झाल्यानंतर सर्वांनाच काहीसे आश्चर्य वाटले. मराठीतील एका महत्त्वाच्या नाटककाराचे नाव बाजूला सारून संगीत दिग्दर्शक वसंत देसाई यांची निवड जरा अप्रयोजकच होती. या निवडणुकीविषयी नाट्यपरिषदेबाहेर पसरत गेलेली नाराजी लक्षात घेता वसंतरावजींची ' निवड काही खास कारणासाठी केली गेली असावी अशी अटकळ बांधायला हरकत नव्हती. प्रत्यक्ष नाट्यसंमेलन सुरू होण्यापूर्वीच नियोजित अध्यक्षांनी सरकारी नाट्यमहोत्सवाच्या पारितोषिकवितरण समारंभाच्यावेळी जे भाषण केले त्यावरून वारे कोणत्या दिशेने वहात आहेत हे समजण्यासारखे होते. कोणाही व्याख्यात्याला आपली मते (असल्यास) मांडण्याचा अधिकार केव्हाही असतो. परंतु केवळ टाळी घेणारी वाक्ये, टाळी घेणाऱ्या तुलना, म्हणजे मतप्रतिपादन नव्हे. वसंतरावजींनी ज्ञानेश्वराचा संदर्भ दिला, तात्कालिक घटनातील मिलोत मिसळलेल्या धोत्र्याचा संदर्भ दिला आणि टाळ्या मिळवल्या. पण त्यांना स्वत:चे असे फारसे मत नव्हते. तेंडुलकरांना ते चांगलेही म्हणत होते आणि लोकमताला कुरवाळण्याचाही प्रयत्न करीत होते. इकडे मनगटी पद्धतीने 'सखाराम 'चे प्रयोग बंद पडत होते, 'घाशीराम 'ला धमक्या मिळत होत्या, गणगवळणीवर निदर्शने होत होती आणि तरी नाट्यपरिषद आपला त्याचा काही संबंधच नाही असा अविर्भाव आणून शांत बसली होती. यामुळे रंगभूमीवरील अनेक तरुण हौशी कलावंत अस्वस्थ झाले होते.

## झोंबलेली निदर्शने

३० एप्रिलला सायंकाळी नाट्यसंमेलनाचे उद्घाटन होते. उद्घाटनाच्या वेळेपूर्वीच साहित्य संघाच्या तोरणाने सजलेल्या दारासमोर तरुण कलावंत गोळा होऊ लागले होते. त्यांच्या गळ्यात निषधाचे फलक होते. निषेधाच्या काळ्या रंगाचे ! कमलाकार सारंग, वसु भगत, विद्या आपटे, अशी तरुण मंडळी दारात उभी होती. वसंतरावजींनी क्षमा मागावी अशी त्यांची मागणी होती. तर कापऱ्यात 'उन्मेष'चे कलावंत, अरुण होर्णेकरादी तरुण नट एका ' Happening ' ची तयारी करीत होते. ' द्रौपदावस्त्रहरण ' या नाटकाचा छोटासा प्रयोग करून, त्याविरुद्ध होणारे निदर्शनही या नटांनी सादर केले. निदर्शन करणाऱ्यांनी ' नाटकनिर्मूलन समिती ' असे बिल्ले लावले होते. सूज्ञ प्रेक्षक समजायचे ते समजले. ही निदर्शने हळुवार मनाच्या वसंतरावांना फार झोंबली. एकीकडे आपण शरणागती पत्करू नये असे त्यांना वाटत होते तर दुसरीकडे स्वत: केलेल्या विधानांच्या

मागे निश्चित दृष्टिकोण नव्हता. मग त्यांनी मी मागे बोललो तेव्हा अध्यक्ष नव्हतो, आता मी असे बाष्कळ (शब्द त्याचाच, प्रसंग–अखेरच्या दिवशीचे खुले अधिवेशन) बोलणार नाही असा पवित्रा घेतला. संपूर्ण संमेलनात, आपण या नाटयपरिषदेत जुन्या-नव्यात नवे ऐक्य घडवणार आहोत असा आविर्भावही त्यांनी आणला.

साहित्य संघाच्या दारापाशी झालेल्या स्वागताने वसंतरावजी देसाई, स्वागताध्यक्ष बा. म. गोगटे व मधुकरराव चौधरी काहीसे अस्वस्थचित्त होते. १९७३ साली नाटयसमेलनाच्या स्वागताध्यक्षपदावरून भाषण करणारे बा. म. गोगटे नाटकात रंजन आणि बोध यांच्यात समप्रमाण असावे अशी भाषा बोलत होते. नाटयपरिषदेच्या व्यासपीठावरून बोलणाऱ्यांनाच नाटक हे एक स्वतंत्र आविष्कारमाध्यम आहे याची पक्की जाणीव नसल्यास इतरांविषयी काय व कसे बोलावे ? मधुकरराव चौधरींना तर आपल्या व्याख्यानात नेमकी कोणती भूमिका घ्यावी हे निश्चित कळत नव्हते. 'नोमोअर–वन्समोअर' अशा कोटीचा आधार घेणारे चौधरी एक विसरत होते की 'नो-मोअर' प्रेक्षक म्हणत नव्हते; आक्रमण करणारे दिग्दर्शक म्हणत होते. नाटक न पाहता नाटकात काय अश्लील असेल याविषयी आपल्या प्रतिभेला मुक्त वाव देणाऱ्या 'संस्कृतिवादी' व्याख्यात्यांप्रमाणे मंत्रीमहाशयही रंगभूमीवरील संभोगदृश्ये व नग्नता यांचा उल्लेख करू लागले तेव्हा श्रोत्यांमधून आवाज आला, 'नाटकाचे नाव...' अर्थात् या प्रश्नाला उत्तर नव्हते. असो. अध्यक्षांचे भाषण सुरू झाले. चित्त विचलित झालेले असल्यामुळे वसंतरावजी छापील भाषणापेक्षा अधिक भावविवश असे भाषण करू लागले. छापील वा प्रत्यक्ष भाषणात तात्त्विक मुद्दा जवळजवळ नव्हताच. त्यांचा सारा भर होता नाटयपरिषदेच्या वास्तुविषयक घोषणेवर आणि त्या घोषणेभोवती तीन दिवसांचे संमेलन फिरत राहील, त्यात वादविवाद, कटुता निर्माण होणार नाही, अशी अध्यक्षांनी सोय केली.

शनिवारी सकाळी 'नाटयपरिषदेकडून आमच्या अपेक्षा' या विषयावर चर्चा होता. गणेश सोळंकी, कमलाकर सारंग, रमेश चौधरी, अनंत ओक, पुणतांबेकर, दि. वि. आमोणकर यांनी या चर्चेत भाग घेतला. सोळंकींनी व्यावसायिक नटांचे काही प्रश्न मांडले. चौधरींनी त्यांच्या नेहमीच्या सडेतोड पद्धतीने मृत कलाकारांना हार घालायला फक्त नाटयपरिषद जिवंत होते, हौशी नाटयनिर्मितीकडे वा नाटयविषयक प्रश्नांकडे ती लक्ष देत नाही, अशी तक्रार केली. कमलाकर सारंग यांनी नाटयपरिषदेने कुर्ल्याला पसार केलेला ठराव एका निर्मात्याच्या प्रयत्नाने सिद्ध झाला (सेन्सॉरबोर्ड रद्द झाले) तरी परिषदेने एक अभिनंदनाची ओळ पाठवली नाही, हे निदर्शनास आणून दिले. परिषद, सभासद नोंदविण्याचे कार्यसुद्धा नेटाने

करीत नाही अशी तक्रार केली. नंतरच्या त्यांच्या भाषणात बरीच अस्पष्टता होती. परिषदेमधून नव्याजुन्यांनी एकत्र येऊन काम करावे ही सदिच्छा आणि त्यातील अडचणी ते स्पष्टपणे मांडू शकले नाहीत. परिषदेचा शब्द वजनदार झाला पाहिजे ही सदिच्छा ठीक आहे; परंतु त्या शब्दाच्या वडीलकीचा जाच झाल्यास अनस्था प्रसंग ओढवेल. ओक व पुणतांबेकर यांनी बाहेरगावच्या कलावंतांच्या अडचणी मांडल्या. आमोणकरांनी नव्या कलावंतांना आवाहन केले (ते वस्तुतः आव्हान होते) की तुम्ही पदाधिकारी व्हा आणि परिषदेचे कार्य करा. कलावंत एकत्र भेटू शकत नाहीत अशी एक रास्त तक्रार त्यांनी केली. या चर्चेचे संचलन मामा पेंडसे यांनी केले. परंतु पूर्वतयारीअभावी चर्चा अत्यंत पोकळ झाली. कार्य करण्याविषयीच्या आपल्या कल्पना किती पोकळ आहेत याचे उदाहरण म्हणजेच ही चर्चा! नाट्यसंमेलनातील चर्चा काही निबंधवाचनाच्या आधारे गंभीरपणे व्हायला पाहिजेत. नाट्यनिर्माता संघ आणि हौशी नटसंघ या दोन्ही संलग्न संस्थांना एकत्र आणणारा दुवा नाट्यपरिषदेच्या कार्यातच असावयास हवा. नाट्यपरिषदेने निबंधस्पर्धा व सरकारी स्पर्धेतील कलावंतांना पारितोषिके वाटणे यापलीकडे वर्षभर नियमित कार्यक्रम करणे अत्यावश्यक आहे. काही कार्ये सहज डोळ्यांसमोर येतात ती इथे नमूद करते :—

१) रंगभूमीच्या इतिहासाची साधने गोळा करून ठेवणे. प्रत्येक नव्या नाटकाचा प्रथम प्रयोग, पात्र योजना यांची यादी, नेपथ्याच्या छायाचित्रांचा संग्रह, निवडक कलाकारांचे ध्वनिमुद्रित संवाद जतन करून ठेवणे. काही स्लाइड्स् तयार करून ठेवणे. नाट्यसमीक्षेच्या कात्रणांचा संग्रह करून ठेवण.

२) नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा या तांत्रिक अंगाविषयी चर्चा घडवून आणणे. दर तीन महिन्यांनी त्या कालावधीतील नव्या नाट्यनिर्मितीची चिकित्सा करणे, अधिकाधिक आधुनिक यंत्रसामुग्रीचा संग्रह करणे.

३) संगीत, नृत्य, चित्रकला आदी पूरक कलांचा आस्वाद घेण्याची शक्ती व विचक्षण रसिकत्व दिग्दर्शक व इतर नटांत निर्माण होईल असे कार्यक्रम आयोजित करणे.

४) हौशी नाट्यनिर्मितीच्या नित्यनूतन स्वरूपाचे अवलोकन व संशोधन.

५) नाट्यविषयक अभ्यासमंडळ स्थापून त्यात नाट्यविषयक चर्चा घडवून आणणे. (चर्चा म्हणजे सभा गाजवणारे वादविवाद नाहीत.) नाट्यवाचने घडवून आणणे. वेळोवेळी नट, दिग्दर्शक, लेखक, समीक्षक यांच्यासाठी Refresher Course आयोजित करणे.

अन्यभाषिक रंगभूमीशी संपर्क ठेवून, परस्पर विचारविनिमयाची सोय करणे.

६) व्यावसायिक रंगभूमीवर नाट्यव्यवसायाची प्रतिष्ठा राखली जाते की नाही यावर लक्ष ठेवणे आणि हौशी नटांना नित्यनूतन प्रयोग करण्यास प्रोत्साहन देऊन, व्यावसायिकांचा

त्यांच्याशी संपर्क साधून देणे. असो. अशा अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत. त्यासाठी नाट्याचावर निष्ठा असणारे सदासतेज कार्यकर्ते व अभ्यासू सभासद लागतील.

### शनिवार दुपार

शनिवारी दुपारी 'नाट्यव्यवसाय व रंगभूमीचे भवितव्य' असा विषय परिसंवादाला निवडला होता. विषय संदिग्ध, वक्ते काही आधी नियुक्त केलेले, काही आयत्यावेळी आलेले, ज्याने-त्याने आपल्या समजुतीप्रमाणे विषयावर भाषण केले. नाटककार बाळ कोल्हटकरांनी आपले नेहमीचेच भाषण केले: 'एक मडुम आणा, तिला नऊवारी नेसवा'......इत्यादी टाळ्या घेणारी वाक्ये, कोट्या यापलीकडे न जाणाऱ्या अशा वक्त्यांना काही त्याच पातळीवरचे श्रोते भेटतात. सभा गाजवल्याच्या सात्त्विक समाधानात ही माणसे खुर्चीवर विराजमान होतात तेव्हा ती काहीच बोललेली नसतात. गणेश सोळंकींनी कोल्हटकरांचाच कित्ता गिरवला. पण नाट्यव्यवसायातील अर्थकारणाविषयी काही प्रस्तुत विचार मांडला. शशिकांत नार्वेकर यांना रंगभूमीच्या आजच्या स्वरूपाविषयी जे म्हणायचे होते ते योग्य होते; पण ते मांडत असताना ते अनेक कल्पनांचा गोंधळ करीत होते. माधव मनोहरांनी वसंतरावजींच्या अध्यक्षीय भाषणातील तर्कदुष्ट विधानांच्या समाचारापासून प्रारंभ केला; पुढे कोल्हटकरांनी केलेल्या विधानांचा परामर्श घेतला. ते म्हणाले की नाट्यपरिषदेने मनगटी निदर्शनाला विरोध केला पाहिजे कारण यामार्गाने कोणत्याही मुद्यावरून कोणीही कोणतेही नाटक बंद पाडू शकेल. नाट्यपरिषदेने राष्ट्रीय सन्मान मिळालेल्या तेंडुलकरांचे अभिनंदनही केले नाही अशी त्यांनी तक्रार केली. नाट्यव्यवसायाची शास्त्रशुद्ध आर्थिक पाहणी व्हावी अशी रास्त सूचनाही त्यांनी मांडली. समारोप करताना अनंत काणेकरांनी या सूचनेला दुजोरा दिला. ते म्हणाले; 'समाज धट्टकट्टा असतो. तो सहजासहजी बिघडत नाही; पुस्तक वाचून तर मुळीच नाही. जे बिघडायचे असतात ते पुस्तक न वाचूनही बिघडतात.'

सायंकाळी नाट्यपरिषदेचा पारितोषिक वितरणसमारंभ झाला. हौशी


# फिडेल, चे आणि क्रांती

ले. : अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन

कलावतांबरोबरच 'सरलादेवी 'कार वा वा. भोळे, श्रीपादराव नेवरेकर यांचा सन्मान झाला. काशिनाथ घाणेकरांनाही सन्मान मिळाला. नाटय-समीक्षेसाठी वसंत कानेटकरांनी दिलेले वि. स. खांडेकर पारितोषिक माधव मनोहर यांना मिळाले. [यानिमित्ताने पुढील अंकी 'नाटयसमीक्षक माधवराव' हा लेख लिहीत आहे.] सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक स्वीकारणाऱ्या जब्बार पटेलना प्रेक्षकांनी मनःपूर्वक दाद दिली--आग्रहाने दोन शब्द बोलायला सांगितले. जब्बार पटेल म्हणाले, 'रंगभूमीवर श्रेष्ठ काय, कनिष्ठ काय, बंगाली रंगभूमी पुढे आहे का मागे आहे, याचा विचार मी करीत नाही. एक कलावंत म्हणून मला जे म्हणायचे आहे ते प्रामाणिकपणे कष्ट-पूर्वक माझ्या माध्यमातून मी मांडतो आणि ते मांडण्याचे स्वातंत्र्य मला असले पाहिजे आज हौशी निर्मितीविरुद्ध निदर्शने झाली. त्यांचे प्रयोग बंद पडले तरी त्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही. परंतु ही प्रथा रूढ झाली तर व्यावसायिकांना कठीण दिवस येतील. तरी ही मनगटी निदर्शने बंद व्हावीत.'

शेवटच्या दिवशीचे खुले अधिवेशन वसंतरावजींनी वास्तूच्या भव्य कल्पने-भोवती फिरत ठेवले. सर्व भाषणे वसंत-रावजींची स्तुती करणारी, सहकार्याचा हात पुढे करणारी, देणगी देणारी अशी होती. टाळ्या वाजत होत्या. वसंत-रावजींमधला भाबडा सूर पुन्हा पुन्हा गहिवरत होता. सगळ्यांना कसे उदात्त वाटत होते.

नाटयपरिषदेला वास्तु हवी आहे, त्यासाठी सहकार्य हवे हे खरे आहे; परंतु नाटयाविषयीच्या मूलभूत कल्पना अस्पष्ट ठेवून केवळ इमारत बांधून रंग-भूमीचे भवितव्य भव्य होणार आहे अशी कल्पना असल्यास ती बालीश आहे 'बघा मी काय करतो ते' हा वसंतरावजींचा अहंकार अधिक महत्त्वाचा. हरकत नाही. नाटय-परिषदेला वास्तु मिळाल्यास आपण तो कशातून निर्माण झाली याकडे दुर्लक्ष करू शकू. प्रत्यक्ष वास्तु बांधायची वेळ येईल तेव्हा मात्र पुन्हा गहिवर बाजूला ठेवून ठाम, स्पष्ट विचार करावा लागेल.

एकूण संमेलन कटुतेने सुरू होऊन 'तुम्ही चांगले, आम्ही चांगले' या भावनेने संपल्यामुळे सर्वांनाच उदात्त वाटले. एकत्र कुटुंबातील मतभेदावर झाकण घालून एखादा समारंभ साजरा व्हावा तसा उसन्या अवसानात व खोटया समाधानात हे नाटयसंमेलन पार पडले.

○ ● ●



मीनाकुमारीच्या काव्यरचनेबद्दल बरीच उलटसुलट मतं आढळतात. अर्जुन देश रश्क वा अब्बास यांच्यासारखे साहित्यिक तिची काव्यरचना अभिजात मानत नाहीत; तर गुलजार, कैफी आजमी यांना तिच्यात अभिजात नव्हे तरी काव्य-गुणांची झलक अवश्य दिसते.

हे मूल्यमापन अर्थात् प्रत्येकाच्या दृष्टिकोणावर अवलंबून राहील. केवळ मीनाकुमारी थोर कलाकार होती या

मीनाकुमारीच्या अलौकिक अभिनयसामर्थ्याबद्दल बोलताना कुणीतरी म्हटलंय, की वैयक्तिक आयुष्यातल्या वणव्यानंच प्रत्ययकारी कलेचं लेणं तिला दिलं. खरं आहे. पण कलेतल्या एकेका नव्या विजयाबरोबर तिच्यातली स्त्री कडवा पराभव पत्करत आली—

# मीनाकुमारी

## उत्तरार्ध

अरुणा अंतरकर

आवडती अभिनेत्री होती म्हणून तिचं काव्यही 'ग्रेट' समजणं चुकीचंच ठरेल. पण केवळ तिचं काव्य म्हणून किंवा ती तुमची नावडती अभिनेत्री असेल म्हणून 'मामुली' या एका वाक्यात ते फुंकरीसरशी उडवून लावावं, इतकं तिचं काव्य निश्चितच वाईट नाही.

तिच्या कवितांबाबत गंमतीचा विरोधाभास म्हणजे केवळ तिच्या म्हणून त्या चांगल्या म्हणायच्या नाहीत हे खरंच. पण मीनाकुमारीतल्या व्यक्तीला ओळखल्याशिवाय तुम्ही त्यात रस घेऊच शकत नाही. तिच्या स्वभावाप्रमाणं ह्या कविता तिच्या स्वत:भोवती – अर्थात् दु:खाभोवती, अप्राप्य प्रेमाभोवती फिरतात. फार सखोल अभिव्यक्ती त्यात नाही. (कारण उघड आहे, काव्याकडे केवळ एक छंद, एक विरंगुळा या नात्यानं ती पहात होती.) पण शब्दांचा वापर कसा नि कुठं करावा. हे तिला कळतं. (हे अर्जुन देव रश्कदेखील मान्य करतो). तिची कल्पनाशक्तीही चांगली होती. अप्राप्य वाटणारी 'मुहब्बत' तिला नेहमी इंद्रधनुष्या-सारखी वाटे. आशाआकांक्षांच्या क्षितिजावर काही वेळ उगवून ते नेहमीच हातात येण्यापूर्वी दूर जातं. ह्या अनोख्या इंद्रधनुष्याची दोन्ही टोकं नेहमीच दु:ख आणि निराशा यांच्या काळ्या समुद्रात दडल्याचं ती (अनु-

भवावरून ?) सांगते. हृदयात उठलेल्या तिच्या प्रेमाच्या ज्वालामुखीवर दैव बर्फ बनून ओठ टेकवतं. निराशेची काळीकुट्ट रात्र मग प्रकाशाच्या शोधात निघते चंद्र तिला भेटत नाहीच. पण निदान (आठवणींच्या) काजव्यांची वरात भेटते, यावर ती समाधान मानते. अर्थात् हे क्षण टिकत नाहीत. पावसाच्या थेंबासारखे ते चटकन नाहीसे होतात. मग सकाळ (अर्थात आयुष्य) पुन्हा उदास धुवयात स्वतःला लपेटून घेते. 'त्या' कुणाच्या तरी येण्यानं मृतवत् झालेल्या शरीराच्या बर्फाळ धमन्यातून आयुष्य वाहू लागलेलं असत, ते पुन्हा एकदा विराण होतं. साऱ्या काळाच्या पापण्या या उजाडपणानं सुस्त झाल्यासारख्या वाटतात.

पण या दुःखाचं भय मीनाकुमारीतल्या कवयित्रीला वाटत नाही. ह्या सोबत्याची, ह्या शत्रूची संगतच तिला सदासर्वकाळ हवी असते. 'गम ही दुश्मन है मेरा, गम ही को दिल ढूँढता है, एक पलकी जुदाई भी अगर होती है' असं म्हणत, दुःखं हा 'त्या'नं दिलेला नजराणा मानून ती उलट याचना करते, 'खुदाके वास्ते गमको भी तुम न बहलाओ,'

इसे तो रहने दो, मेरा, यही तो मेरा है.।'

मीनाकुमारीच्या सगळ्या कवितेचा हा एकच शेवट आहे. कवितेतली तिची भूमिका चिरविरहिणीची असते. अशा स्वप्नाळू स्त्रीला पडद्यामागं प्रेयसीची हळुवार भूमिका जमावी; पत्नीची जमू नये, यात नवल नाही. मग कायम भूतकाळात रमणं ओघानंच आलं. भविष्यकाळाचा सूर्य इतका हातापलीकडचा वाटतो, की काजव्यांच्या प्रकाशाचं भूतकाळाचं ठेंगणं वरच आश्रयाला बरं वाटतं आणि या सगळ्यातून मग एकच वास्तव निष्कर्ष निघतो:

'अयादत' होती जाती है।'
(अयादत = शोक प्रदर्शन.)

इबादत होती जाती है.
मेरे मरनेकी देखो,
सबको आदत होती जाती है.'

माझ्या मते, दर्जाबद्दल फारशी घासाघीस न करता मीनाकुमारीच्या कवितांना किमान 'वाचनीय' म्हणायला हरकत नसावी. बरी-वाईट – कशीही असो, तिची कविताच पडद्यामागची मीनाकुमारी समजून घ्यायला थोडीफार मदत करते. तिच्याच एका कवितेचे शीर्षक उचलून सांगायचे तर ती 'काचेच्या दुनिये'त रहात होती. 'हयवदन'मधली पद्मिनी म्हणजे मीनाकुमारीचेच प्रतिबिंब वाटते. पद्मिनीला आपल्या पतीच्या बुद्धिमत्तेचे आकर्षण वाटते नि त्याच्या मित्राच्या शरीरसंपदेचेही. त्यांच्या आत्म्यांची आदलाबदल करून ती दोन्ही मिळवायचा प्रयत्न करते मीनाकुमारीच्या मनाची बहुधा हीच चलबिचल व्हायची. एकीकडे तिचे प्रेमाचे आदर्श खूप उच्च होते. आपल्यापेक्षा वयाने पंधरा वर्षांनी मोठ्या असणाऱ्या कमाल अमरोहीशी तिने लग्न केले ते उगीच नव्हे. बुद्धि-

मत:, रूप, नाव — सारे काही त्याच्याजवळ होते. कमाल अमरोहीच्या जीवनात मात्र मीनाकुमारी हे एक 'पॅशन'— एक 'आवेग' होता. तो संपल्यावर त्याचे पाय जमिनीला लागले. प्रेम या भावनेवरच प्रेम करणाऱ्या तिच्याबाबतीत हे अशक्य होते. 'महल' 'दायरा'च्या लेखक-दिग्दर्शकाकडून पुढे मात्र मीनाकुमारीप्रमाणेच आपल्याही वाट्याला निराशा येते. अकरा वर्षांच्या वैवाहिक जीवनात 'दायरा'चे दिग्दर्शन. आणि 'मुगले आझम'चे संवादलेखन (अनेक लेखकांच्या जोडीने), 'जिंदगी और ख्वाब' या मामुली कथेचे लेखन, या पलीकडे कमाल अमरोही या कलाकाराकडून काहीही कामगिरी दिसत नाही.

कमाल अमरोहीचे म्हणणे, या काळात तो मीनाकुमारीची 'करीअर' संभाळत होता. (अधिक सोप्या शब्दात सांगायचे तर अभिनेत्री मीनाकुमारीची तो मॅनेजरकी करीत होता.) मला नाही वाटत तिला कमालची ही भूमिका फार रुचली असेलसे. कुणीही कलाकार सहजासहजी आपल्या करीअरचा— त्यातून शिखरावर पोचलेल्या करीअरचा त्याग करणार नाही. पुरुष कलाकार तर नाहीच नाही. मीनाकुमारीने चित्रसंन्यास घ्यावा, अशी संसाराच्या सुरुवातीला कमालची खरीखुरी इच्छा असेलही. पण त्याच्या मूळच्या रइसी तबियतीला पुढच्या सहजप्राप्य वैभवाचा मोह आवरता आला नाही, हे सत्य आहे.

नाही! त्यान मीनाकुमारीचा सगळा पैसा खाल्ला, तो तिला उपाशी ठवत होता, वगैरे आरोपांवर माझा बिलकुल विश्वास नाही. तिची पुढची 'करीअर' उत्तम झाली, यात त्याचाही वाटा आहे. त्याच्या घरात असेपर्यंत मीनाकुमारीला करारमदारांच्या तांत्रिक बाजूंची कधीही फिकीर नव्हती. त्या वेळची मीनाकुमारी दिसायचीही कशी रसरशीत! नाही म्हटले तरी कमालच्या घरात तिच्यावर नियंत्रण होते, धाक होता, म्हणून जीवनाला एक नियमित रूप होते. कमालच्या घरात तिच्या पैशाचे वाटेकरी कमाल आणि त्याचे कुटुंबिय एवढेच होते, त्या घरातून बाहेर पडल्यावर तिच्या कमाईत नेमके किती वाटेकरी झाले त्यांची मोजदाद करणे कठीण!

एक होतं, मीनाकुमारीला आपली करीअर जिवापाड प्रिय होती. पण करीअरीस्ट स्त्रीच्या खंबीरपणाने तिची व्यावहारिक बाजू एकट्याने संभाळणे तिला कधीच जमले नाही.

नंतरच्या आयुष्यात रोख रकमेची अडचण पडू लागल्यावरही मीनाकुमारी रस्त्यावर आली नाही. याचे बरेचसे श्रेय कमाल अमरोहीला दिले पाहिजे. तिच्या पैशातून केलेल्या इस्टेटीतला अर्धा हिस्सा त्याने तिला दिला होता.

**'खुदाके वास्ते गमको भी तुम न बदलाओ'**

या स्थिर उत्पन्नावरच तिने पुढचे दिवस काढले असले पाहिजेत. म्हणूनच मी म्हणेन, त्याने जर तिचा पैसा घेतला असेल तर ती त्याच्या व्यवहार चातुर्याची, एका अर्थी श्रमाचीच किंमत होती. विसाव्या शतकात तरी, एका व्यवसायातल्या पतिपत्नींनी पैसा वाटून घेतला तर कुणी तक्रार करेलसे वाटत नाही.

मीनाकुमारीबाबत काही ठिकाणी मात्र त्याचे वर्तन तितकेसे न्याय्य वाटत नाही. 'मीनाकुमारीने मला घडवलं नाही,' मी तिला घडवले' ह्या त्याच्या दाव्यात काही तथ्य नाही. वस्तुस्थिती अशी आहे की त्या दोघांपैकी कुणीच कुणाला घडवलं नाही. कमाल त्यांच्या विवाहाअगोदरच ख्यात होता हे खरे. पण मीनाकुमारीला 'स्टार' बनवले विजय भट्टच्या 'बैजूबावरा'ने आणि तिला 'आर्टिस्ट' बनवले बिमल रॉयच्या 'परिणिता'ने. तिची करीअर उत्तम संभाळली, हे श्रेय कमालला कमी का वाटावे ?

मीनाकुमारीला न विचारताच 'देवदास' व 'घुंघट' या चित्रपटांचे करार त्याने धुडकावून लावले, हा मात्र मला गुन्हा वाटतो. 'देवदास'च्या पारूला सुचित्रा सेन या श्रेष्ठ अभिनेत्रीने पुरेपूर न्याय दिला हे मान्य; पण बिमल रॉयना त्या भूमिकेसाठी मीनाकुमारीच हवी होती. शरद्बाबूंच्या 'ललिते'ला पडद्यावर अजरामर करणाऱ्या मीनाकुमारीला त्यांची आणखी एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा साकार करायची संधी मिळणे हा योग्य न्यायच होता.

मीनाकुमारीवर 'टाइप'चा आरोप होतो त्याला आणखी कारण म्हणजे तिने व कमालनेही हाती घेतलेले भाराभार चित्रपट. ज्या वर्षी ती 'दिल अपना'मधे आपली उत्कृष्ट कामगिरी प्रकट करते, त्याच वर्षी 'जागीर'सारख्या स्टंटपटातही काम करताना दिसते, याला काय म्हणावं? वर्षात तिला तीन-चार चित्रपटातच काम करायला लावून तिच्या अभिनयसामर्थ्याची ही धूप टाळता नसती आली ? या काळात ती सूर्य उगवल्यापासून सूर्य मावळेपर्यंत कॅमेऱ्यासमोर उभी असे. 'आजचे आपले शेवटचे शूटिंग. ते संपल्यावर मोठी सुट्टी घेऊन परदेश-सफर करायची' असे घोकीत ती रोज कॅमेऱ्यासमोर जायची. प्रत्यक्षात आजारी पडल्याखेरीज सुट्टीच तिच्या वाट्याला येत नव्हती !

पुढच्या आयुष्यात मीनाकुमारीचे नाव कमालहून मोठे झाले, यात तिचा काय दोष होता ? ह्या काळात कमाल पडद्यामागे 'पाकीजा'त (आणि स्वतःच्या आयुष्याला आर्थिक स्थैर्य आणण्यात) गुंतला होता. 'महल पिक्चर्स' ही स्वतःची कंपनी, स्वतःचा स्टुडिओ आणि इतर इस्टेट–हे सारे मीनाकुमारी आयुष्यात आल्यानंतरच त्याला मिळाले. स्वतःच्या एकट्याच्या कमाइनं त्यानं ते मिळवले असते यात शंकाच नाही; पण इतक्या लवकर ते शक्य झाले नसते हे नक्की या सगळ्यात कमालचे स्वतःच्या करीअरकडे साफ दुर्लक्ष झाले. मीना-

कुमारीची मात्र घोडदौड चालू होती. कमाल मग 'श्रीयुत मीनाकुमारी' म्हणून ओळखला जाऊ लागला. उघड आहे, यानंतर दोघात दुरावा निर्माण होत गेला. एका समारंभात 'मीना कुमारीचा पति' म्हणून ओळख करून दिल्यावर एका प्रतिष्ठित महिलेची त्याने तिथल्या तिथे हजेरी घेतली, हे त्याच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने ठीकच झाले. पण स्वतःचा अहंकार जपताना मीनाकुमारीच्या भावनांची कदर त्याने फारशी केली आहे असे दिसत नाही. 'फिल्मफेअर'चे पारितोषिक स्वीकारताना, 'प्रीमियर'च्या वेळी कौतुक वाट्याला येत असताना या आनंदात सहभागी होण्यासाठी तिला प्रत्येक क्षणी कमालची आठवण आली नसेल? अशा कोणत्याच समारंभाला तो तिच्याबरोबर कटाक्षाने जात नसे म्हणे.

मीनाकुमारी घरातून बाहेर पडल्यावर, दोन चित्रपटांची घोषणा करून कमाल दोन रिळेही का पुरी करू शकला नाही? एवढी काय मीनाकुमारीची पत्रास होती, की तिच्या जागी दुसरी नटी घेऊन 'पाकीज़ा' पुरा करता येत नव्हता?

खरी गोष्ट अशी होती की, कमालमधल्या चोखंदळ कलाकाराला मीनाकुमारीसारखीच कसबी अभिनेत्री आपली स्वप्ने साकार करण्यासाठी हवी होती. एरवी मीनाकुमारीपेक्षा पंधरा पावसाळे जास्त पाहिलेल्या, तीन मुलांच्या या पित्याने तिच्याशी लग्न केले होते ते काय संसारसुख मिळत नव्हते म्हणून? आपल्या मनाजोगते चित्रपट काढायला त्याला आपली मनपसंत आणि हक्काची अभिनेत्री हवी होती. ती मीनाकुमारीच्या रूपाने त्याला गवसली होती. दुर्दैवाने पुढचे सगळेच आडाखे चुकले. पण त्यात त्याचाही दोष नव्हता नि तिचाही.

मीनाकुमारीवर त्याचे प्रेमच नव्हते का? नाही, तसे नव्हते. त्याने तिला आपल्या परीने प्रेम दिले; स्वातंत्र्य मर्यादित दिले, पण आपला विश्वास अजिबात दिला नाही. त्याने उघडपणे घातलेल्या बंधनांपेक्षा त्याच्या माणसांचा गुप्त पहारा मीनाकुमारीचा संताप संताप करायचा. तिने त्याला प्रेम दिले नव्हते, त्याचा मान राखला नव्हता असे कधी घडले नव्हते. पण काही झाले तरी आपल्या कर्तृत्वाचा तिलाही अभिमान होता, स्वतंत्र व्यक्तिमत्वाची तिलाही जाणीव होती. वयाच्या चौथ्या वर्षापासून स्वतःची कमाई खाणारी ती पोटासाठी कधीच कुणावर अवलंबून नव्हती. आपला मान आपल्या घरात राखला जात नाहीसे पाहिल्यावर ती कमालपासून दूर झाली. घराबाहेर पडताना तिच्यावर उठलेला हात कमालचा असता तर एक वेळ गैर

वाटले नसते. पतीच्या मामुली नोकराचा हात आपल्यावर उठावा याचा संताप मीनाकुमारीला काय, कोणत्याही मानी स्त्रीला येईल. शिवाय कमालचे म्हणणे, तिला भडकवायला तिचे नातलग होते, तसे कमाललाही भरीला घालायला त्याचे तथाकथित दोस्त होतेच. (कटु लागेल, पण हल्लीच्या भाषेत अशा लोकांना 'चमचे' म्हणतात.)

'कमाल अमरोही हाच खरा मीना-कुमारीच्या शोकनाट्यातला व्हिलन आहे' असे छातीठोकपणे सांगणारे चित्रसृष्टीतले एक परिचित आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र पडद्यामागे आहे आणि चित्र-वर्तुळात त्यांना अतिशय मान दिला जातो. मीनाकुमारी वा कमाल अमरोही यांच्याशी त्यांचे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध गुंतलेले नाहीत. ही पार्श्वभूमी लक्षात घेताही मी त्यांचे म्हणणे अमान्य करते. तिच्या शोकनाट्याच्या निर्मिती-दिग्दर्शनाची आणि अभिनयाची थोडी जबाबदारी परिस्थितीवर आणि बरो-बरीशी तिच्यावर आहे, असे मला वाटते. माझी सहानुभूती तिच्या बाजूने असली तरी कमालबद्दल मला द्वेष वा तिटकारा वाटत नाही. त्याच्याबाबत तिचा आणि माझा दृष्टिकोण एकच आहे—तटस्थ-पणाचा !

दोष कमालमध्ये होते, तसे मीना-कुमारीतही होते. ती फार स्वप्नाळू होती, रोमँटिक होती. विनोद मेहताने म्हटल्याप्रमाणे, एखाद्या शाळकरी मुलीच्या उत्कटतेने ती प्रेमात स्वतःचा अंशन् अंश देऊन टाकायची आणि तशाच परतफेडीची अपेक्षा करायची. तडजोड, शिस्त आणि संयम या शब्दांना तिच्या जीवनात स्थान नव्हते. अंगात धमक असल्यामुळे जे पाहिजे ते मिळवायचे ! मग त्यासाठी कसलाही विधिनिषेध पाळण्याची जरूरी तिला बहुधा वाटत नसे. कुठल्याही गोष्टीत माघार घेणे तिला मान्य नसे. 'कमाल अमरोहीकडे काम करणार असशील तर तुला आजपासून घराचा दरवाजा बंद होईल !' अशी धमकी बापाने देताच, थंडपणे स्वतः होऊनच तिने नेसत्या वस्त्रानिशी घर सोडले. थोडा वेळ जाऊन देऊन तंटा मिटवण्याची, सम-जुतीने घेण्याची तिला अशावेळी गरज भासत नसे. दहा-बारा वर्षांनी कमाल अमरोहीच्या घरून ती याच तऱ्हेने बाहेर पडली. एकदा एखाद्या गोष्टीवरून मन उडाले की, ती तिच्या-पासून संपूर्ण अलिप्त, संपूर्ण रिती होऊन जात असे. नंतर त्या गोष्टीचा ती चुकूनही विचार करीत नसे. (मीना-कुमारीचा हा दोष तिचा एक मोठा गुण वाटतो.)

सोशिकतेचा फार मोठा गुण तिच्या-जवळ होता. पण सहनशक्ती संपली म्हणजे ती एकदम एक घाव दोन तुकडे करून टाकायची. फेरविचार या गोष्टीला तिच्या मनात स्थान नव्हते. एका क्षणात तिचे निर्णय ठरत. 'इम्पल्सिव्ह' हा एकच शब्द तिच्या या स्वभावाचे वर्णन करू शकेल. तिच्या बुद्धीवर विचारांच्या नियंत्रणापेक्षा भावनांचा ताबा अधिक चालायचा. आपले

मनोविकार फार प्रबळ ठरतात; आपले मन फार कमकुवत आहे, याची उघड कबुली तिने दिली होती. 'तुमच्या हातून कधी चुका घडल्यायत का?' या प्रश्नाला उत्तर देताना तीव्र विनोदबुद्धी असलेल्या त्या अस्सल स्त्रीने पटकन् उत्तर दिले होते, 'छे: ! मी कधीच चुका करीत नाही.' आणि मग संवाद बोलतानाचा तो आपला खास 'पॉझ' घेऊन ती पुढे उत्तरली होती, 'मी घोडचुका करते !'

एक मात्र होते. ती फार जिद्दी होती, फार प्रामाणिक होती. कमालच्या घरून बाहेर पडताना आपले वाढते वय आणि भवितव्य यांचा विचार तिच्या मनात आला नसेल असे थोडेच आहे ? पण सुरक्षित भविष्यापेक्षा तिला आत्मसन्मान अधिक फार होता. 'आत्मसन्मान' हा शब्द मी 'अहंकार' या शब्दाऐवजी मुद्दामच वापरला आहे. अहंकार तिच्याजवळ असलाच पाहिजे पण तिच्या वागण्याबोलण्यात तो कधीच प्रगट झाला नाही. आपल्या अहंकाराला एक तर स्वतःच्या अभिनयात नाहीतर धर्मेंद्रसारख्या नटांना घडवण्यात तिने योग्य वाट करून दिली.

'रायन्स डॉटर'मधली रोझी पहाताना सारखी मीनाकुमारीची आठवण होत होती. आपखुशीने ही रोझी आपल्याहून कितीतरी मोठ्या वयाच्या शाळामास्तरशी लग्न करते. पण जेवढे मिळाले तेवढ्यावर हिचे समाधान कधीच होत नाही. तेव्हा गावचा धर्मोपदेशक तिला विचारतो, 'आता आणखी काय हवंय तरी काय तुला ?' 'ते मलासुद्धा सांगता येत नाही.' डबडबलेल्या डोळ्यांनी रोझी उत्तरते, 'बट् दॅट 'मोअर' इज देअर'! मीनाकुमारीसुद्धा हे काहीतरी अधिक, काहीतरी अप्राप्य शोधायला निघाली होती. कधीतरी ते हाती गवसल्यासारखे वाटायचे. पण योगायोग काय होता देव जाणे, तिने निवडलेले जोडीदार नेहेमीच अगोदर कुठेतरी बांधले गेलेले असायचे. परिचयाच्या मर्यादा नको तितक्या वाढल्या की बहुधा एकमेकांना कंटाळा यायचा. क्वचित् कुणी मीनाकुमारीवर अधिकार दाखवायचा प्रयत्न करायचे.

जिद्द, मानीपणा, हट्टीपणा — ज्या ज्या गोष्टींनी मीनाकुमारीला कलाकार म्हणून मोठे केले, त्याच गोष्टींनी स्त्री म्हणून तिला उदंड अपयश दिले. मीनाकुमारीच्या अलौकिक अभिनयसामर्थ्याबद्दल बोलताना कुणीतरी म्हटलंय्, की वैयक्तिक आयुष्यातल्या वणव्यानेच तिला प्रत्ययकारी कलेचे लेणे दिले.—खरे आहे. पण कलेतल्या एकेका नव्या विजयाबरोबर मीनाकुमारीतली स्त्री कडवा पराभव पत्करत आली.

त्या रोझीप्रमाणेच शरीर आणि आत्मा यांचा प्रबळ संघर्ष तिच्या मनात व्हायचा. तिच्याप्रमाणेच मीनाकुमारी मग अगदी विरुद्ध टोकाला जायची;

**दोष कमालमध्ये होते तसेच मीनाकुमारीतही होते...**

दुबळेपणाने शरीरापुढे शरणागती पत्करायची आणि मग सद्सद्विवेक-बुद्धीचे देणे चुकते करण्यासाठी तिला मदिरेचा आश्रय घ्यावा लागायचा.

कधी कधी वाटते, रुपेरी पडद्यावरचे रोमांचकारी स्वप्नाळू जीवन आणि आपले वैयक्तिक जीवन यात तिने भेद ठेवलाच नाही. आयुष्याची सुरुवात चार-चौघांपेक्षा वेगळ्या रीतीने सुरू केल्यामुळे की काय, तिला सतत काही-तरी 'थ्रिल' हवे असायचे. साध्या-सरळ, धोपटमार्गी जीवनाची चव तिने चाखली नव्हती म्हणून की काय, अस्थैर्यच तिला सदा मोह पाडायचे. तिच्या आयुष्यातले काही प्रसंग आणि चित्रपटातले काही प्रसंग कसे हातात हात घालून चालतात पहा.

'साहब बीबी'मध्ये एक सूचक प्रसंग आहे. भूतनाथच्या सांगण्यावरून छोटी बहू दारू सोडायला तयार होते. अगदी निरागसपणे हे कबूल करताना ती म्हणते, 'कलसे बिलकुल छोड दूंगी हाँ !' आणि त्याच वेळी तिचा हात पेला चाचपडत असतो. वास्तव आयुष्यातही ह्या प्रसंगाची अनेकदा उजळणी झाली असेल !

'दिल अपना'तल्या शेवटच्या प्रसंगाबद्दल संबंधित मंडळीत बरीच चर्चा झाली. त्याच्या शेवटात दाखवलंय् त्याप्रमाणे 'दोन स्त्रिया वास्तव आयु-ष्यात एखाद्या पुरुषासाठी एकमेकांचा असा सामना करतात का ?' असा प्रश्न पडला होता. 'सामना करतात एवढेच नव्हे; करायलाच पाहिजे !' मीना-कुमारीने ठासून सांगितले. आणि तो प्रसंग चित्रपटात तसाच ठवायचा आग्रह धरला. भविष्यातल्या एखाद्या प्रसंगाची एखादी झलक तर ती सांगत नव्हती ?

मीनाकुमारीचे दोष मोठे होते, तसे गुणही मोठे होते, दुर्मिळ होते. प्रसिद्धी आणि पैसा यांच्या वर्षावात तिच्यातली माणुसकी आणि नम्रता धुऊन गेली नव्हती. 'मीनाकुमारीने अडवणूक केली, नखरे केले' अशी तक्रार तिच्या एकाही निर्मात्याकडून ऐकण्यात आली नाही. तिचे हास्य, वागण्यातला गोडवा कधी हीरो वा दिग्दर्शक यांच्यापुरता मर्यादित राहिला नाही. सेटवर कधी 'मॅडम' या औपचारिक नावाने ती बोलावली गेली नाही. आपल्या मेकपमनच्या आजारी मुलीची चौकशी करायला तिला वेळ असायचा, आणि प्रोड्यु-सरच्या मुलीची परीक्षा कशी झाली याचीही तिला उत्सुकता असायची. एच. एस. रावल, सदाशिवराव जे. कवि या निर्मात्यांच्या कुटुंबियांना तुम्ही एकदा भेटा. मीनाकुमारीबद्दल बोलताना ते एकमुखी निर्णय देतात: 'शी वॉज ए वंडरफुल पर्सन !' तिच्या संवेदनशीलते-विषयी बोलताना गुलजारला एकच वाक्य सुचते: 'वो सरसे पाँवतक बस एक दिल थी !'

'डिग्निटी' (मला चांगलासा मराठी शब्द सुचत नाही) हा एक खास मीनाकुमारी-गुण आहे. आयुष्यात होऊन गेलेल्या प्रकरणांबद्दल ती ओठ घट्ट मिटून घ्यायची. मग तो

कमाल अमरोही असो की धर्मेंद्र. त्यांच्याशी तिचे बेबनाव का झाले हे अद्याप नक्की असे कुणालाही ठाऊक नाही. कमाल अमरोही कमी पडतो तो इथंच. मीनाकुमारी गेल्यानंतर तिच्या प्रेमप्रकरणाची जाहीर चर्चा करून या 'कविहृदयाच्या' माणसाला काय मिळते? दुसऱ्या दिवशी मीना-कुमारीच्या बहिणी याची सवाई कुलंगडी बाहेर काढतातच!

आपल्याला जे हवे त्याची जबर किंमत द्यायची तिची तयारी असे. परिणामांना ती कधी घाबरली नाही. स्वातंत्र्याची किंमत बदनामी होती हे तिला कळले, तेव्हा तिने ती निमूट पचवली. कोणतेही खुलासे-प्रतिखुलासे ती करीत बसली नाही. 'रस्ता बंद' अशी पाटी असलेली आडवळणेच तिला आवडली हे खरे. पण तिच्या आयुष्याला 'मागचे दार' नव्हते हेही तितकेच खरे. तिचे सर्व व्यवहार उघड असत.

या उत्कटतेने मीनाकुमारीचे सारे जीवन व्यापले होते. फिरायला बाहेर पडायची तेव्हा कारमधला शेवटचा पेट्रोलचा थेंब आणि पर्समधले अखेरचे नाणे ती उडवूनच ती घरी यायची. मध्ययुगातल्या रसिकाला शोभेलसे जीवन ती चवीने जगली. फुले खरेदी करायची झाली तर टोपल्यांनी घ्यायची. यंत्रयुगातले, धावपळीचे जीवन सुरू झालेय्, विसावे शतक उजाडलेय् याची तिला कल्पना तरी होती की नाही देव जाणे!

कीट्सची 'ईव्ह ऑफ सेंट ॲग्नेस' वाचताना मीनाकुमारीची हटकून आठवण व्हायची मेणबत्तीच्या प्रकाशात, सोनेरी 'केशसंभार मोकळा सोडून, दिवसभर वाचीत बसलेल्या त्या मुलीच्या डोळ्यांपुढे सारखी स्वप्ने तरळत असतात.' मीनाकुमारीचे सारे आयुष्य त्या मुलीहून काय वेगळे होते?

स्वप्नाळूपणे कधी कधी खूप गोड बोलून जायची. सूर्याखालचे सगळे प्रश्न नटीला विचारले पाहिजेत, या न्यायाने की काय, एकापत्रकाराने तिला एकदा विचारले, "स्त्री आणि पुरुष यात तुम्ही श्रेष्ठ कोण मानता?'

'कुणीच श्रेष्ठ नसते. सगळ्या काळात दोघे समान होती.' मीनाकुमारी ठासून उत्तरली,' 'स्त्रीने समानता मागणे म्हणजे मुळात आपण कमी असल्याचे मानण्यासारखे आहे. एक मात्र आहे: 'आपला पुरुष आपल्यापेक्षा वरचढ असावा, असे खऱ्या स्त्रीला वाटते.'— 'वुइमेन्स लिबरेशन'च्या समर्थकांनी आणि विरोधकांनीही ह्या उत्तराची नोंद घेण्यासारखी आहे. असे तुम्हाला नाही वाटत?

आपल्या उत्तराचा पूर्वार्ध पुरा करताना ती म्हणाली होती: 'माझा पुरुष माझ्या समोर एकांतात रडला: तर मला काही वाटणार नही. पण चारचौघात त्याने अश्रू ढाळले तर मला मरणप्राय दुःख होईल. मी त्याला मर्द मानणार नाही.'

(हे वाक्य वाचले नि मीना-कुमारीच्या अंत्ययात्रेत सामील झालेले कमाल अमरोही ओक्साबोक्शी रडत होते,

हे वर्णन, उगीचंच, आठवलं )...

व्यक्ती म्हणून कदाचित तिने कमालचे नुकसान केले असेल; कलाकार म्हणून तिने त्याचे काही वाकडे केलेले नाही. दिग्दर्शक म्हणून त्याच्याबद्दल तिने नेहमी जाहीरपणे गौरवोद्गारच काढले आहेत विनोद मेहताला ही तिची धूर्त खेळी का वाटावी कळत नाही. अखेर धूर्तता हासुद्धा गुणच आहे. 'पाकीजा'मधे तिने विनामूल्य काम केले, हे त्या सद्भावनेचेच प्रतीक होते; काहीसे केलेल्या चुकीचे परिमार्जन होते. कमाल मात्र स्याडपणे 'पाकीजा'च्या श्रेयात तिचा वाटा नाकारतोय्. एकटया मीनाकुमारीमुळे वा तिच्या मरणामुळे 'पाकीजा' चालला नाही, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. कमाल अमरोही, गुलाम महमद व जोसेफ वर्चिंग या साऱ्यांचे हे सांघिक यश आहे, आणि त्यात मीनाकुमारीचाही वाटा—फार मोठा वाटा—आहे हे कबूल करण्याऐवजी कमाल काय करतो ? तर 'कोण म्हणते मीनाकुमारीच्या मृत्युमुळे पाकीजा चालला ? लंडन-आफ्रिकेतही त्याने भरपूर कमाई केली!'अशा शीर्षकाखाली आपले हारतुरेमंडित फोटो छापून आणतो. ( 'लंडन आफ्रिकेत स्थायिक भारतीयांची संख्या मोठी आहे आणि तिथे मीनाकुमारीचा फार मोठा चाहता वर्ग आहे.' अशी कोपरखळी यावर कुणीतरी मारली आहेच.) बाकी 'दिल अपना' हा आपला चित्रपट पडेल ठरेल म्हणून त्याचा निर्माता म्हणून प्रथम आपल्या सेक्रेटरीचे नाव लावणाऱ्या आणि दहा आठवडे त्याने हाऊसफुल गर्दी खेचल्यावर, रातोरात पोस्टरवर निर्मात्याच्या जागी आपले नाव टाकणाऱ्या माणसाकडून याहून वेगळी अपेक्षा तो काय करायची ?

मीनाकुमारीचं आणखी एक वैशिष्टय होते. 'अमुक एका आगामी भूमिकेबद्दल तुमची काय प्रतिक्रिया आहे ?'—या प्रश्नाला तिचं एक ठराविक पण नम्र उत्तर असे. 'ते चित्र प्रकाशित झाल्यावर माझ्या अभिनयाद्वारा तुम्हाला कळेल, नाही का ? माझ्या भूमिकेबद्दल इतरांनी काय ते बोलावं हे बरं.' आगामी भूमिकांबद्दल बोलण्याच्या निमित्तानं प्रसिद्धीचा एक उत्तम मोका हाती लागला होता खरं म्हणजे. पण कमी बोलणं—किंबहुना जपून बोलणं हा मीनाकुमारीच्या एकंदर जमान्याचा गुण होता म्हणा ना !

अर्जुनदेव रश्कच्या मते मीनाकुमारी म्हणजे एक कधी न उलगडणारं कोडं होतं. कधी ती आठदहा वर्षांची निरागस छोकरी वाटायची, कधी, चक्क वेडी वाटायची; पण त्याच्या निरीक्षणानुसार ही गूढ रमणीयता हीच तिची खरी शक्ती होती. तिच्याकडं अनेक नावं आकर्षित व्हायची ती याचमुळे. पित्याचं प्रेम न मिळाल्यामुळं तिला 'फादर कॉम्प्लेक्स होता' येथपासून तो तिला 'सेक्स स्टार्व्हड्' ठरवणारे सारे निष्कर्ष चित्रव्यवसायातली मंडळी बोलतात, आणि रश्कच्या विधानाला नकळत पुष्टी देतात.

तिच्या निकट सहवासात आलेल्या धर्मेंद्रला तरी तिचं मन कळलं होतं

काय ? पण एकाच भेटीत, विशेष काही न बोलताही धर्मेंद्रचं व्यक्तिमत्व मला कळालं, आणि मीनाकुमारीबद्दल त्याला काही विचारावंसच वाटलं नाही. हा एक सुस्वभावी आणि अतिशय 'प्रॅक्टिकल' माणूस आहे. मेहनती आहे, पण याची कुवत मर्यादित आहे. त्यावेळी देवयानी चौबळचा त्याच्यावरचा 'तो' लेख प्रसिद्ध झाला नव्हता. पण धर्मेंद्र-मीनाकुमारीच्या मैत्रीचं स्वरूप धर्मेंद्रला एकदा पाहूनही कळण्यासारखं आहे. आपली करीअर, आपलं घर यांच्यावर जराही आच न येऊ देता; सगळ्यांना संभाळून हा रहातो. मीनाकुमारीबद्दल त्याला सहानुभूती होती; कृतज्ञता आहे; पण याहून खोल भावना मात्र नाही, फार काय, आपल्या मैत्रीचं स्वरूप आणि ती किती काळ टिकणार, याची त्या दोघांनाही कल्पना असावी.

परवा मात्र धर्मेंद्रकडून नव्हे पण त्याच्या सेक्रेटरीकडून 'मीनानं धर्मेंद्रवर एकनिष्ठा दाखवली नाही' वगैरे विनोदी विधानं वाचून खूप करमणूक झाली. निष्ठेची अपेक्षा – आणि धर्मेंद्रनं करायची ?

धर्मेंद्रचा आणखी एक युक्तिवाद म्हणजे, मीनाकुमारीची बदनामी होऊ नये म्हणून तो तिच्यापासून दूर झाला. बदनामी व्हायची आणखी काय राहिली होती, तर पुढे ती टळणार होती ? त्यापेक्षा 'आमच्या दोघांची चूक माझ्या ध्यानात आली म्हणून मी दूर झालो,' असं धर्मेंद्रनं म्हटलं असतं तर अधिक योग्य झालं असत. दोघांच्या आयुष्यातला धहा अध्याय संपत आला तेव्हा मीनाकुमारी उताराच्या वाटेवर होती, आणि धर्मेंद्र चढतीच्या. आयुष्यात एकदाच येणारी ही संधी पकडण्यासाठी धर्मेंद्रला आणखी कुठे वेळ घालवणे परवडणारे नव्हते, असं स्पष्टीकरण चित्रसृष्टीतल्या एका परिचितानं दिले, तेच खरे वाटते. आणि याकरताही धर्मेंद्रवर दोषारोप ठेवावे असं मला बिलकुल वाटत नाही.

मीनाकुमारी कमालच्या घरातून बाहेर पडली नसती तर तिची पुढची शोकांतिका टळली असती का ? दुसरा विवाह केला असता तर ती सुखी झाली असती का ?...कोण जाणे ! खरे म्हणजे मीनाकुमारीसारख्या मनस्वी माणसांबाबत 'जर-तर'चे तर्कशास्त्र अगदी चुकीचे वाटते. वाऱ्याच्या स्वच्छंद झुळकीसारखी ही माणसे आपल्या आयुष्यात येतात नि जातात. त्यांना आपल्या सामान्य मर्यादांच्या चौकटीत पकडू पहाणे म्हणजे वीज हातात पकडण्याइतके निष्फळ वाटते. 'लिव्ह डेंजरसली' हा पं. नेहरूंनी कुणालातरी दिलेला संदेश खरे म्हणजे मीनाकुमारीने जरा ज्यादाच उत्साहाने अमलात आणला खरा. पण तिच्या आयुष्यात काही तिरस्करणीय होते असे मला वाटत नाही. ते आयुष्य मी अनुकरणीय मुळीच म्हणणार नाही. पण त्याचे मी काही समर्थन वा बचावही करणार नाही. खरे म्हणजे

बेचव जिंदगी – अळणी किस्से, कुणाचे ?....तिचे ?

मीनाकुमारीसारख्या माणसांबाबत आपल्याला पड खावी लागते आणि ती असतील तशाच स्वरूपात स्वीकारावी लागतात. त्यांच्यावर तुम्ही एक तर प्रेम करू शकता, नाहीतर त्यांचा तिरस्कार तरी. तिच्याबाबत तटस्थ वा थंड रहाणे मात्र कठीण आहे.

मीनाकुमारीची सगळीच कहाणी एखाद्या अद्भूत परीकथेसारखी वाटते. एक व्यक्ती इतक्या थोड्या आयुष्यात इतकी उलथापालथ करून जाईल हेच कधीकधी अविश्वसनीय वाटते. एकदा ती म्हणाली होती, 'बेतकलुफ जिंदगीके किस्से है फिके फिके, तुम क्या करोगे सुनकर मुझसे मेरी कहानी ?'– बेचव जिंदगी – अळणी क़िस्से ? कुणाच्या–मीनाकुमारीच्या आयुष्याचे ? आपल्या जित्या देहाला सोन्याचांदीचा भाव होताच; पण आपले मरणही सोन्याच्या भावाने विकले जात आहे हे कळले असते तर तिने हे उद्गार काढले नसते. 'लाइफ अँड लव्हज् ऑफ मीनाकुमारी' अशी थेट, अमेरिकन बेस्ट सेलरवरून उचललेल्या शीर्षकाची आपली मसालेदार कहाणी छापली गेलेली तिने पाहिली असती तर तिने स्वत:च हे उद्गार मागे घेतले असते.

'मीनाकुमारीचे मरण तिच्या दृष्टीने अगदी योग्य वेळी झाले' या मताशीही मला सहमत व्हावेसे वाटते. अभिनेत्री म्हणून पुन्हा एकदा सिंहासनावर बसल्यावर तिची अखेर झाली, या दृष्टीने तिचे जीवन सफल झाले. ती याहून अधिक जगती तर हिंदी रजतपटाला एक जबरदस्त चरित्र-अभिनेत्रीचा लाभ झाला असता, हे 'दुष्मन' आणि 'मेरे अपने'मधल्या तिच्या सुरेख कामगिरीने सिद्ध केले. पण तिच्या दुर्धर आजारपणाने तिला तिच्या प्रिय कॅमेऱ्यासमोर पुन्हा उभे राहू दिले नसते. आणि मीनाकुमारीकरता हे दुःख मरणाहून वाईट होते.

ती म्हातारी होऊन मरती, सुखासमाधानाच्या संसारात देह ठेवती तर ती सुखी झाली असती पण मीनाकुमारी झाली नसती ! मग कोणत्याही खातून बेगम वा भागीरथीबाईंपेक्षा तिचे जीवन वेगळे झाले नसते. आणि मग आपल्या आयुष्यात तरी उसने का होईना 'ॲड्व्हेंचर' कुठून आले असते ?

मरणामुळे नव्हे तर जिवंतपणीच आख्यायिकांची बनलेल्या मीनाकुमारीच्या आयुष्याची अद्भुत कहाणी पुढेही पिढ्यान् पिढ्या वाचली जाईल. कारण मीनाकुमारीसारखा कलाकार, मीनाकुमारीसारखी व्यक्ती आणि मीनाकुमारीसारखे अपघात आयुष्यात एकदाच घडत असतात !

## पेरियर नदीचा काठ

पृष्ठ ३ वरून

भले काही चुका होवोत, काही नुकसान सोसावे लागो.

तसा हा प्रयोग महाराष्ट्राला अगदी अपरिचित आहे असेही नाही. सामुदायिक नाही, पण संयुक्त सहकारी शेतीचा एक अभिनव प्रयोग मिरज-जवळील म्हैसाळ या गावी शंभरएक हरिजन कुटुंबांनी यशस्वी करून दाखविलेला आहे. पण सरकारचे, तज्ज्ञांचे, विरोधी पक्षांचे--कोणाचेच या प्रयोगाकडे अद्याप लक्ष गेलेले नाही. सातपुड्यात शहादे भागात जंगल-जमिनीवर हा प्रयोग आम्ही सुरू करतो अशी तेथील आदिवासींची आज वर्षभर मागणी आहे. त्यासाठी सत्याग्रह, शिष्ट-मंडळे वगैरे सर्व मार्ग हाताळूनही झालेले आहेत. अशी अनुकूल लोकमानस असलेली दहा-वीस ठिकाणे महाराष्ट्रात निवडून काढणे अशक्य आहे काय? मालकीचे आकर्षण कायम राहील, सामुदायिक प्रकल्पाचे सर्व फायदेही पदरात पाडून घेता येतील असा एखादा नवीन पर्यायही हुडकणे अवघड नाही. शिवाय ध्येयवादी तरुणांची शक्तीही या प्रयोगाकडे वळवता येईल. आज सक्तीने म्हणा, आवडीने म्हणा शेकडो तरुण खेड्यांकडे जात आहेत. योजना व निश्चित कार्यक्रम या अभावी या तरुणशक्तीची आज अनेक ठिकाणी विनाकारण उधळपट्टी होत आहे. लोकसेवक, सामाजिक कार्यकर्ते, शासनाचे प्रतिनिधी, राजकीय नेते या सर्वांनी एकत्र येऊन या शक्तीचा उपयोग विधायक नवनिर्मितीसाठी करून घेतला पाहिजे. यासाठी सामुदायिक शेतीसंस्था हे नवे उभारणी केंद्र ठरू शकते. पूर्वी देवस्थानाभोवती समाज संघटित होत असे. आता नवीन जनस्थाने उभारली पाहिजेत. लोक-सेवक, युवक यांचा या उभारणीत हात-भार लागला, की ही जनस्थाने केवळ सरकारी सत्तास्थाने न राहता लोकांची नवी श्रद्धास्थानेही ठरतील. स्वयंभू देवस्थानांची जागा अशी नवी स्वयंभू जनस्थाने घेतील. यासाठी निःस्पृह व निःस्वार्थ कार्यकर्त्यांनी जेथे भूमि अगोदरच अभिमंत्रित करून ठेवलेली आहे, अगोदरच जेथील लोकमानस संस्कारित झालेले आहे अशा जागा प्रयत्नपूर्वक हुडकून तेथे हा नवनिर्माणाचा प्रयोग हाती घेणे अधिक उचित ठरेल. ठाणे जिल्ह्यात सर्वोदयी कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे. पुणे जिल्ह्यातील मावळात संघ-स्वयंसेवक आहेत. नगर जिल्ह्यात डावे पक्ष आहेत. जिथे जिथे लोकशिक्षणाचा पहिला पाठ व्यवस्थित दिला गेलेला आहे, किंवा दिला जाईल अशी खात्री वाटेल तिथे तिथे हा प्रयोग ताबडतोब हाती घेण्यासारखा आहे. हा जर लोक-सेवक या प्रयोगात नसला तर मात्र हा केवळ एक नोकरशाहीवाढीचा प्रकल्प ठरेल. ज्याचे भवितव्य सांगण्याची फारशी आवश्यकता नाही. नोकरशाहीने क्रांतीची वाफ साठवून ठेवण्याचे कार्य करायचे असते. वाफेची निर्मिती हा एखादा लोकसेवक किंवा अशा सेवकांच्या लोकसंघटनाच करीत असतात. म्हणून नोकरशाही, सरकार जागे होईल तेव्हा होईल. लोकसेवकांनी तरी पेरियर नदीच्या काठच्या प्रयोगाची शक्यतो लवकर दखल घ्यावी असे आग्रहाने सुचवावेसे वाटते. ● ● ●

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

यंदाची महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिके मिळवणारी
आमची दोन विशेष प्रकाशने

डॉ. सुधीर फडके

# कोठे आणि कधीतरी

किंमत : दहा रुपये

अनिल अवचट

# पूर्णिया

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर